




# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ अमरावती, शनिवार २८ मार्च २०२६ ■ मूल्य ४.०० ■ पृष्ठ १०







## ‘लॉकडाउन’बाबत अफवा पसरवल्यास फौजदारी कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :**मध्य पूर्वेतील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जगभरात इंधनाचे दर गगनाला भिडले असताना आणि अनेक देशांमध्ये आणीबाणीची स्थिती असताना, भारताने मात्र आपले इंधन व्यवस्थापन अत्यंत चोख ठेवले आहे. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले असून, सध्या सोशल मीडियावर पसरवल्या जाणाऱ्या लॉकडाउनबाबतच्या अफवा फेटाळून लावल्या आहेत.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ‘जगभरात युद्धाची परिस्थिती असताना इंधन दरवाढीचे संकट उभे ठाकले आहे. अशा कठीण काळात भारत सरकारने पेट्रोल आणि डिझेलवरील उत्पादन शुल्कात घट करण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला, त्याबद्दल मी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानतो. आपल्या शेजारील देशांमध्ये इंधनाच्या कमतरतेमुळे शाळा, कार्यालये आणि संस्था बंद करण्याची वेळ आली आहे, मात्र भारताने उत्तम व्यवस्थापनामुळे अशी वेळ येउ दिली नाही.‘



**देवेंद्र फडणवीसांचा नागरिकांना इशारा-**सोशल मीडियावर देशात लाकडाउन लागू होणार असल्याची अफवा पसरवली जात असल्याने पेट्रोल पंपांवर नागरिकांच्या रांगा लागल्या आहेत. यावर स्पष्टीकरण देताना फडणवीस म्हणाले की, ‘मध्य पूर्वेतील युद्धामुळे भारताच्या शेजारच्या देशात शटडाउनची परिस्थिती आली आहे. मात्र, आपल्या केंद्र सरकारने उत्तम व्यवस्था केली आहे. लोकांनी विनाकारण पेट्रोल पंपांवर गर्दी करू नये. आपल्याकडे एक महिना पुरेल एवढा इंधन साठा आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये. लाकडाउन लागणार नाही, असे केंद्र सरकारने स्पष्ट केले आहे. याबद्दल खोटी माहिती पुरवणे गुन्हा ठरेल‘, असाही त्यांनी इशारा दिला आहे.

**नागरिकांना खबरदारीचे आवाहन-** मुख्यमंत्र्यांनी जनतेला विनंती केली आहे की, त्यांनी दररोज ज्याप्रमाणे आवश्यक तेवढेच इंधन भरता, तसेच भरावे. कोणत्याही अधिकृत माहितीशिवाय सोशल मीडियावरील अफवांना बळी पडू नये. देशात घरगुती गॅस किंवा पेट्रोल-डिझेलची कोणतीही कमतरता भासणार नाही, याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली.

## टीम इंडियाप्रमाणे काम करावे लागेल

### इराण युद्धावर पंतप्रधान मोदींची मुख्यमंत्र्यांसोबत बैठक





**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पश्चिम आशियातील परिस्थितीसंदर्भात राज्यांच्या मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेतली. त्यांनी सर्व राज्यांना 'टीम इंडिया' म्हणून एकत्र काम करण्याचे आणि आपली तयारी अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले. ही बैठक व्हिडिओ कान्फरन्सिंगद्वारे घेण्यात आली. पंतप्रधानांनी राज्यांच्या तयारी आणि योजनांबद्दल विचारपूस केली. या विषयावर पंतप्रधानांनी मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्याची ही पहिलीच वेळ आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह आणि गृहमंत्री अमित शहा हेही उपस्थित होते. निवडणूक आचारसंहितेच्या अंमलबजावणीमुळे, निवडणुका होणाऱ्या राज्यांचे मुख्यमंत्री या बैठकीला उपस्थित राहिले नाहीत. यापूर्वी, सरकारने देशव्यापी लाकडाउन होणार नाही असे म्हटले होते. केंद्रीय मंत्री किरेन रिजिजू यांच्यासह तीन मंत्र्यांनी लाकडाउनच्या बातम्या खोट्या असल्याचे फेटाळून लावले आहे.

पश्चिम आशियामध्ये सुरू असलेल्या संघर्षामुळे भारताच्या कच्च्या तेलाचा, तसेच एलपीजी आणि एलएनजी चा पुरवठा प्रभावित झाला आहे. परिणामी, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कच्च्या तेलाच्या तसेच इतर पेट्रोलियम उत्पादनांच्या किमतींमध्ये वाढ झाली आहे. देशांतर्गत पातळीवर, सध्या देशाकडे पुढील दोन महिने पुरेल इतका कच्च्या तेलाचा साठा उपलब्ध आहे; तसेच एलपीजी आणि पीएनजी च्या पुरवठ्याची स्थिती समाधानकारक आहे. भारताचे आयातीवरील अवलंबित्व खूप जास्त असल्याने आणि एलपीजीच्या एकूण आयातीपैकी सुमारे ९०% आयात 'हार्मुझ सामुद्रधुनी' मार्गे होत असल्याने शासनाने देशांतर्गत ग्राहकांना (पान २ वर)

## झिरवाळांना तूर्तास दिलासा

### व्हिडिओची शहानिशा करून कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी :**मंत्री नरहरी झिरवाळ यांनी मला दूरध्वनीवरुन संपर्क केला, ३-४ व्हिडिओ जोडत चुकीच्या पद्धतीने समोर आणले आहेत. त्यामुळे, या संदर्भात त्यांना सांगितलं आहे, तक्रार करा. व्हिडिओची शहानिशा करण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी झिरवाळांना सांगितले. आम्ही आणि सुनेत्रा पवार त्यांच्यासंदर्भात कारवाई करू, मात्र सत्यता पडताळली जाईल. झिरवाळ यांचे व्हिडिओ गंभीर, सत्यता पडताळून पाहिली पाहिजे, असेही फडणवीसांनी म्हटले. ते मुंबईत माध्यमांशी बोलत होते. देवेंद्र फडणवीस यांनी खरात प्रकरणावरूनही भूमिका स्पष्ट केली. पहिल्यांदा त्यांचे फोटो व्हिडिओ येतात, त्यावरुन गोष्टी निश्चित करता येणार नाही.



सहभाग असेल तर कारवाई होईल, कोणालाच सोडण्याचे कारण नाही. येत्या काळात आणखी कारवाई होण्याची शक्यता आहे, आर्थिक फसवणूक झाली म्हणून लोकं पुढे येत आहेत. ह्या प्रकरणात दुर्दैवी महिला पीडित (व्हीक्टिम) आहेत, त्यांचे व्हिडिओ सोशल मीडिया साईटवर टाकले आहेत. जर कोणी व्हिडिओ अपलोड केले असतील तर कारवाई होईल. यातील गोपनीयता भंग करण्यात येत आहेत, त्यांना कारवाईला सामोरे जावे लागेल, असा इशारा फडणवीस यांनी दिला.

## बापाने दोन मुलींना उलटे टांगले; एकीने पाणी पाणी म्हणत जीव सोडला

### सांगली जिल्ह्यातील संतापजनक घटना

**आटपाडी :** सांगली जिल्ह्यातील बनपुरी (ता. आटपाडी) येथे माणुसकीला काळिमा फासणारी आणि अंगावर शहारे आणणारी घटना गुरुवारी उघडकीस आली. केवळ चोरीच्या संशयावरून दोन निष्पाप मुलींना रात्रभर हात-पाय बांधून उलटे टांगून त्यांचा अमानुष छळ करण्यात आल्याने दहा वर्षीय सानिकाचा मृत्यू झाला, तर तिची ११ वर्षीय बहीण अनुजा गंभीर जखमी अवस्थेत सध्या खासगी रुग्णालयात उपचार घेत आहे. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात संतापाची लाट उसळली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, नाना हैबत यमगर या निर्दयी बापाने पोटच्या दोन मुलींना अमानुष मारहाण करत जीव घेतला आहे. केवळ शेजारच्या घरात चोरी केल्याचा संशय शेजाऱ्याने घेतल्याने संतापाच्या भरात या दोन चिमुकल्यांचा निर्दयी छळ करण्यात आला. घटनास्थळावरून मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी सायंकाळी सुमारे ५




वाजण्याच्या सुमारास वडिलांनी सानिका आणि अनुजा या दोन्ही मुलींना हात-पाय बांधून घरातील पर्त्याच्या अँगलला उलटे टांगले.

**मृतदेहाखालीच निर्धास्तपणे झोपले रात्रभर** -त्या निष्पाप मुली वेदनेने तडफडत पाणी, पाणी म्हणून ओरडत होत्या. मात्र, त्यांच्याच आई-वडिलांनी त्यांना पाण्याचा थेंबही दिला नाही. मुलींना वरती बांधून निष्ठूर आई-वडील घरातच निर्धास्त झोपले होते, तर बाहेर आजी-आजोबा झोपले होते. रात्रभर असह्य वेदनेने सानिकाने रात्रीच प्राण सोडला होता. तर आई-वडील पोटच्या मुलीच्या मृतदेहाखालीच निर्धास्तपणे झोपले होते.

**आजोबांनी मुलींना खाली सोडले-** मात्र..गुरुवारी सकाळी सुमारे ६ वाजता मुलीच्या आजोबांनी मुलींना खाली सोडले. मात्र, तोपर्यंत खूप उशीर झाला होता. सानिका ही मृतावस्थेत आढळली, तर अनुजा बेशुद्धावस्थेत होती. तिला तातडीने खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तर मृत सानिकाला दुसऱ्या एका खासगी रुग्णालयात नेण्यात आले. मात्र तेथे ती मृत असल्याचे डॉक्टरांनी सांगितल्यावर नातेवाईकांनी सानिकाचा मृतदेह घरी आणला.

**गुपचूप अंत्यसंस्कार करण्याचा प्रयत्नही -** घटना बाहेर येउ नये म्हणून संबंधित कुटुंबीयांनी मयत सानिकाचे अंत्यसंस्कार गुपचूप करण्याचा प्रयत्न केल्याची धक्कादायक (पान २ वर)

## विवाहित पुरूषाचे लिव्ह-इनमध्ये राहणे गुन्हा नाही

**प्रयागराज/वृत्तसंस्था :** लिव्ह-इन रिलेशनशिपच्या प्रकरणी अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे. उच्च न्यायालयाने लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहणाऱ्या एका जोडप्याच्या याचिकेवर सुनावणी करताना म्हटले की, एखादा विवाहित पुरुष जर एखाद्या सज्ञान व्यक्तीसोबत लिव्ह-इन रिलेशनशिपमध्ये राहत असेल, तर तो गुन्हा ठरत नाही. परस्पर संमतीने असे करणे गुन्हा नाही. न्यायालयाने म्हटले की, असे केल्यास त्याच्याविरुद्ध गुन्हेगारी खटला चालवला जावा, असे होउ शकत नाही. न्यायालयाने स्पष्ट केले की, नैतिकता आणि कायद्याला वेगळे ठेवले पाहिजे. जर कायद्यानुसार कोणताही गुन्हा घडलेला दिसत नसेल, तर नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी न्यायालयाच्या कारवाईला सामाजिक मत किंवा नैतिकता मार्गदर्शन करणार नाही. (पान २ वर)



उच्च न्यायालयाचा निर्णय नैतिकता आणि कायदा वेगळे आहेत

## मुंडन करून घरी परतताना पिकअप ट्रेलरमध्ये घुसली

### 8 जणांचा मृत्यू: मृतांमध्ये 5 महिला आणि 3 मुले

**प्रयागराज/वृत्तसंस्था :**-कौशांबीमध्ये भाविकांनी भरलेली एक पिकअप ट्रेलरला धडकली. यात ८ लोकांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ५ महिला आणि ३ मुलांचा समावेश आहे. २९ लोक जखमी झाले आहेत. सर्वजण प्रयागराज येथून मुंडन करून आपल्या घरी फतेहपूरला जात होते. हा अपघात इतका भीषण होता की जखमी पिकअपमधून उडून रस्त्यावर पडले. बराच वेळ ते जमिनीवर पडून तडफडत होते. घटनास्थळी पोहोचलेल्या लोकांनी पोलिसांना फोन केला, तसेच स्वतःही जखमींना सांभाळले. पोलिसांनी जखमींना रुग्णवाहिकेतून रुग्णालयात पोहोचवले. दोन लोकांची प्रकृती गंभीर असल्याने त्यांना प्रयागराज येथे रेफर करण्यात आले आहे. २७ जखमींवर जिल्हा रुग्णालय आणि CHC मध्ये उपचार सुरू आहेत. हा अपघात शुक्रवारी संध्याकाळी सुमारे ४ वाजता राष्ट्रीय महामार्गावर डोरमाजवळ झाला. मुख्यमंत्री योगी यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २-२ लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा केली आहे. तसेच, जखमींना प्रत्येकी एक-एक लाख रुपये दिले जातील. फतेहपूर जिल्ह्यातील जाफरगंज पोलिस ठाण्याच्या हद्दीत कुरोली गाव आहे.



येथे राहणाऱ्या राजनच्या २ वर्षांच्या शुभम नावाच्या मुलाचे शुक्रवारी मुंडन संस्कार होणार होते. यासाठी कुटुंबीयांनी भाड्याने पिकअप बुक केली. त्यानंतर सुमारे ३७ लोक पिकअपमधून प्रयागराज येथील संगमावर मुंडन करण्यासाठी पोहोचले. येथे मुंडन कार्यक्रम झाल्यानंतर, घराकडे परतत असताना डोरमा पेट्रोल पंपाजवळ रस्त्याच्या कडेला एक ट्रेलर उभा होता. याच दरम्यान, भरधाव वेगातील पिकअप अनियंत्रित होउन त्या ट्रेलरला मागून धडकली. धडक इतकी जोरदार होती की पिकअपचा चक्काचूर झाला. मिळालेल्या माहितीनुसार, पिकअप चालकाला डुलकी लागल्याने हा अपघात घडला. आजूबाजूचे लोक मदतीसाठी धावले- रस्त्यावर जखमींच्या किंकाळ्या ऐकून स्थानिक लोक मदतीसाठी धावले.

## भारतीय मुलांनी केलेली आर्थिक मदत कधीही विसरणार नाही- इराण

**तेल अवीव/वृत्तसंस्था :** इराणने इस्त्रायलवर ८३ व्यांदा क्षेपणास्त्र हल्ला केला. या वेळी, पाठवण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांवर ‘धन्यवाद, भारत’ असा मजकूर लिहिलेला होता. समाजमाध्यमांवर प्रसारित होत असलेल्या व्हिडिओंमध्ये, इराणी सैनिक या क्षेपणास्त्रांवर ‘धन्यवाद, भारतातील जनता‘ असे लिहिलेले दिसून आले.त्याचप्रमाणे, स्पेन, पाकिस्तान आणि जर्मनी या देशांसाठीही संदेश कोरण्यात आले होते. ज्या राष्ट्रांनी इराणला पाठिंबा दिला आहे, त्या राष्ट्रांप्रती कृतज्ञता व्यक्त करणे हा या कृतीमागील उद्देश असल्याचे इराणने स्पष्ट केले. इराणच्या 'रिव्होल्युशनरी गार्ड'च्या माहितीनुसार, हा ८३ वा हल्ला होता; ज्यामध्ये दीर्घ- आणि मध्यम-पल्ल्याची क्षेपणास्त्रे, तसेच ड्रोनचा वापर करण्यात आला.या हल्ल्यांमध्ये केवळ इस्त्रायलमधील ठिकाणेच नव्हे, तर आखाती प्रदेशात स्थित अमेरिकेच्या लष्करी तळांनाही लक्ष्य करण्यात आले. 'पॅट्रियट' हवाई संरक्षण प्रणालीशी संबंधित, बहरीनमधील एका तळावर हल्ला करण्यात आल्याचा दावाही करण्यात आला आहे.

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दावा केला आहे की, इराणने १० तेल टँकरना जाउ देउन भेट दिली. ते म्हणाले की, या टँकरवर पाकिस्तानचा झेंडा होता आणि इराणला यातून विश्वास जिंकायचा होता. ते म्हणाले की, इराणने विश्वास दाखवण्यासाठी ८ मोठे तेल टँकर जाउ दिले आणि नंतर आणखी २ पाठवले. व्हाईट हाउसमध्ये झालेल्या कॅबिनेट बैठकीत ट्रम्प म्हणाले की, इराणने स्वतःच प्रस्ताव दिला होता की, तो ८ मोठे ऑइल टँकर जाउ देईल, जेणेकरून चर्चेबाबत गांभीर्य दाखवता येईल. त्यांनी दावा केला की, नंतर इराणने माफी मागून आणखी २ टँकर पाठवले.

## भोंदुबाब खरात चौकशीच्या चक्रव्युहात

**नाशिक/प्रतिनिधी :** भोंदू अशोक खरातचे कोट्यवधीचे आर्थिक उद्योग बघता आता त्याच्या मागे ईडी, विदेशी चलन (फारेक्स) आणि कस्टमचाही ससेमिरा लागण्याची चिन्हे आहेत. खरातच्या व्यवहाराची कागदपत्रे आता सक्तवसुली संचालनालयाकडे (ईडी) देण्यात येणार असल्याचे समजते. तसेच त्याच्या विदेश दौऱ्यांची व विदेशी चलन व्यवहारांची फारेक्सकडून चौकशी होणार आहे, तर दुसरीकडे त्याने तुर्कस्तानमधून आणलेल्या फर्निचरप्रमाणेच मोठ्या प्रमाणावर विदेशातून आणलेल्या अन्य साहित्यावर कस्टम ड्युटी भरली किंवा नाही याचीही तपासणी करण्यात येणार असल्याचे वृत्त आहे.



भोंदू खरातचे एकेक कारनामे उघड होत असून, महिलांच्या शोषणापलीकडे आर्थिक फसवणूक, खंडणी असे प्रकारदेखील समोर येत आहेत. काही तक्रारीत याचा उहापोह झाला असला तरी त्याच्या स्थावर-जंगम मालमत्तांमधील तरतूद, गुंतवणूक तसेच अन्य आर्थिक व्यवहार बघता ही अचंबित करणारी खरात फाइल्स श्रीमंती तक्रारीच्या रूपाने बाहेर पडत आहे. नाशिक आणि नगर मिळून ५२ मिळकतींची माहिती आहे.

काही ठिकाणी तो स्वतः मिळकतीचा मालक आहे, तर कुटुंबासह भागीदारीत जमिनी आहेत. दुर्मीळ भासणारे बनावट खडे, रत्न, पालिश केलेले चिंचोके, बनावट मध विकून मिळवलेली माया आता चौकशीला पात्र ठरली आहे. हा आकडा प्रचंड मोठा असल्याने आयकर विभागापाठोपाठ पोलिसांकडून सक्तवसुली संचालनालयालादेखील कागदपत्रे देण्यात येणार आहेत. तसेच पुण्यातील बांधकाम व्यावसायिक राजेंद्र जासूद यांनी बुधवारी (दि. २५) रात्री नाशिक पोलिसांकडे तक्रार केली. त्यात जासूद यांच्या पैशावर २१ देशांत सहली केल्याचे म्हटल्याने फारेक्स चलनाशी संबंधित विभागही तपासणी करणार आहे.

**कस्टम विभागाचाही फेरा**

खरातच्या कारनाम्यामुळे अनेक शासकीय यंत्रणांप्रमाणेच कस्टम विभागाच्याही तो रडारवर असल्याचे समजते. तुर्कस्तानातून तब्बल २० लाख रुपयांचे फर्निचर आणून त्याने सिन्नर तालुक्यातील मिरगाव येथील फार्म हाउस सजवले. तुर्की टेबलसह अनेक प्रकारचे साहित्य त्याने विदेशातून आणले आहे. त्याची कस्टम ड्युटी भरली किंवा नाही त्याचीही आता तपासणी होणार असल्याचे (पान २ वर)

## सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, सर्वसमावेशक तंत्रज्ञानाधारित करणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### ‘पल्स’ परिषद आरोग्य धोरण, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रम एकत्र आणणारे महत्त्वाचे व्यासपीठ




**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी राज्य शासन कार्यरत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने राज्यात दुर्धर आजारांचे लवकर निदान, कमी खर्चाची उपचार पद्धती विकसित करणे आणि दर्जेदार आरोग्य सुविधा पुरविण्यात येणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. ते पल्स वैद्यकीय परिषदेत बोलत होते. वैद्यकीय क्षेत्राला जागतिक स्तरावर अधोरेखित करण्याच्या उद्देशाने दोन दिवसीय पल्स वैद्यकीय परिषद २०२६ वांद्रे-कुर्ला संकुल येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद राज्याच्या वैद्यकीय धोरणाला आणि आरोग्यसेवा व्यवस्थेला नवे दिशा-दर्शन मिळवून देण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण मानली जात आहे. असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. यावेळी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री माधुरी मिसाळ, वैद्यकीय शिक्षण विभागाचे सचिव धीरज कुमार, आयुक्त अनिल भंडारी, सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल, उद्योग विभागाचे प्रधान सचिव पी अन्बळगण, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी वेलारसू आदी उपस्थित होते. प्रत्येक नागरिकाला गुणवत्तापूर्ण आरोग्य सेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची जबाबदारी असल्याचे अधोरेखित करत, या सेवा नागरिकांच्या निवासस्थानापासून आठ ते दहा किलोमीटरच्या परिसरात उपलब्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. सार्वजनिक आरोग्य व्यवस्थेमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ते (एआय) चा प्रभावी वापर करण्यावर राज्य शासनाचा विशेष भर असून, यामुळे आरोग्य सेवा अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवताना गुणवत्ताही टिकवून ठेवता येईल, असा विश्वासही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपल्याला केवळ अधिक डाक्टर घडवायचे नाहीत, तर भविष्यातील आरोग्य आव्हानांना समर्थपणे सामोरे जाणारे सक्षम डाक्टर तयार करायचे आहेत. राज्यातील जिल्हा रुग्णालये, तालुका रुग्णालये आणि महापालिका रुग्णालये बळकट करण्यावर सरकारचा विशेष भर असून, आरोग्य व्यवस्था मजबूत करण्यासोबत वैद्यकीय शिक्षणाच्या एकूण परिसंस्थेला बळकटी दिली जात आहे. पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाची गुणवत्ता वाढविण्यासोबतच पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणाच्या जागा वाढविण्यावर शासन लक्ष केंद्रित करत आहे. विकसित महाराष्ट्र २०४७ या दृष्टीकोनात आरोग्य क्षेत्र हे केवळ सामाजिक जबाबदारीपुरते मर्यादित नसून, नावीन्य, गुंतवणूक आणि आर्थिक वाढीचा एक महत्त्वाचा आधारस्तंभ ठरणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आरोग्य व्यवस्थेचे प्रभावी सनियंत्रण करण्यासाठी नागपूर येथे विशेष संस्था स्थापन करण्यात येणार आहे. तसेच महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेच्या माध्यमातून नागरिकांना परवडणारी आणि सुलभ वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देत आहोत. पल्स व्यासपीठातून गुणवत्ता, सातत्य आणि परवडणारी आरोग्यसेवा यावर भर दिला जात असून, वैद्यकीय शिक्षणात गुणवत्ता, संशोधन व स्वायत्तता वाढविण्यासाठी शासन प्रयत्नशील आहे. महा केअर मॉडेल व वाधवानी एआयच्या मदतीने आरोग्य व्यवस्था उपचार केंद्राकडून प्रतिबंधक व प्री-केअर दिशेने वळत आहे. (पान २ वर)




# राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांची विविध खेळांमध्ये उत्तुंग भरारी

**अमरावती/प्रतिनिधी:-** शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विविध क्रीडा स्पर्धांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाचे नाव लौकिक उंचावलेले आहे. त्यामध्ये तायक्वांदो या खेळामधील आंतरविद्यापीठ स्पर्धेमध्ये बी.पी.एड. दुतीय वर्षात शिक्षण घेत असलेल्या अनामिका डेका विद्यार्थिनीने सुवर्णपदक पटकावले, तर नम्रता तायडे विद्यार्थिनीने कांस्यपदक मिळवून उत्कृष्ट कामगिरी नोंदवली. त्याचबरोबर आंतर विद्यापीठ सॉफ्टबॉल खेळामध्ये वैष्णवी गिरी ही सुवर्णपदक ची मानकरी ठरली. त्याचप्रमाणे बी.पी.एड प्रथम वर्षामध्ये शिकत असलेली दिव्या सावरकर हिने खो-खो या खेळामध्ये आंतर विद्यापीठ पश्चिम झोन स्पर्धा, अश्मेघ तसेच तेलंगणा राज्यामधील काजीपेठ येथे झालेल्या सीनियर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभाग नोंदवला. त्याचप्रमाणे खो-खो या स्पर्धेमध्ये बी.पी.ई.एस तृतीय वर्षात शिकत असलेला लख्खूराम वड्डे हा सुद्धा सीनियर राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी झाला तसेच बी.पी.एड. द्वितीय वर्षातील आदेश वरखडे याने वडोदरा येथे झालेल्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेमध्ये विदर्भाचे प्रतिनिधित्व केले व त्याची २०२६ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय पुरुष कबड्डी संघाच्या सराव शिबिरासाठी निवड झाल्याने महाविद्यालयाच्या यशात आणखी भर पडली आहे.तसेच छत्तीसगड येथे होणाऱ्या 'खेलो इंडिया ट्रायबल गेम्स २०२६' अंतर्गत मल्लखांब स्पर्धेसाठी



बी.पी.एड. प्रथम वर्षातील नेहा दारशिंबे विद्यार्थिनीने प्रथम क्रमांक मिळवून, तर निलाक्षी दारशिंबे विद्यार्थिनीने सहावा क्रमांक प्राप्त करून महाराष्ट्र संघात स्थान मिळवले आहे.या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांनी मिळालेल्या या घवघवीत यशाबद्दल व उत्कृष्ट कामगिरीबद्दल श्री शिवाजी शिक्षण संस्था चे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख व कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले तसेच संस्थेचे सन्माननीय सर्व कार्यकारिणी पदाधिकारी व सचीव , श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे सोबतच महाविद्यालयाचे आय क्यू ऐ सी समन्वयक डॉ. पुष्पलता देशमुख , महाविद्यालयामधील सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून अभिनंदन त वर्षाव करण्यात आला. राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेमध्ये यशस्वी स्पर्धकांना भावी आयुष्यामध्ये होणाऱ्या स्पर्धेसाठी व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. सोबतच भावी आयुष्यामध्ये देशपातळीवर राज्याचे, अमरावती जिल्हाचे व श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे नावलौकिक करेल असा विश्वासही त्यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यावेळी महाविद्यालयाचे विजय स्पर्धकांचे प्राचार्य डॉ. सुभाष गावंडे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्राचार्यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करताना सांगितले की, 'विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात मिळवलेले हे यश इतरांसाठी प्रेरणादायी असून महाविद्यालयाच्या उज्वल परंपरेला साजेसे आहे.' या यशामुळे महाविद्यालय परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून सर्व स्तरांतून विद्यार्थ्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.



## प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च बडनेरा येथे होणार रोबोटिक्स लॅबचे उद्घाटन

**रंग ओळखणाऱ्या अत्याधुनिक रोबोचे विशेष आकर्षण**

**अमरावती/प्रतिनिधी:-** विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी संचलित प्रा. राम मेघे इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी अँड रिसर्च (PRMIT&R), बडनेरा येथे अत्याधुनिक Yaskawa Center of Excellence (रोबोटिक्स लॅब) चे उद्घाटन उद्या सकाळी १०.३० वाजता मेकॅनिकल इंजिनिअरिंग विभागाच्या सेमिनार हॉलमध्ये संपन्न होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे भूषविणार असून, प्रमुख अतिथी म्हणून अजय गुर्जर (COO, Yaskawa India Pvt. Ltd.) उपस्थित राहणार आहेत. तसेच उपाध्यक्ष ॲड. उदय देशमुख , कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख सचिव युवराजसिंग चौधरी ,तसेच कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनम चौधरी, पंकज देशमुख, प्रा. विनय गोहाड आणि प्रा. गजानन काळे यांची उपस्थिती लाभणार आहे. कार्यक्रमास प्राचार्य डॉ. गजेन्द्र आर. बमनोटे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या रोबोटिक्स लॅबमध्ये महाराष्ट्रातील पहिला बॉटलिंग प्लांट कार्य करणारा रोबो सादर करण्यात येणार असून उद्योग क्षेत्रातील प्रत्यक्ष प्रक्रियेचे प्रात्यक्षिक पाहण्याची संधी उपलब्ध होणार आहे. तसेच रंग ओळखणारा (Color Sorting) अत्याधुनिक रोबो हे विशेष आकर्षण ठरणार आहे.ही अत्याधुनिक लॅब रोबोटिक्स, ऑटोमेशन व आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रांतील प्रत्यक्ष प्रशिक्षणासाठी महत्त्वाची ठरणार असून विद्यार्थ्यांना उद्योगाभिमुख कौशल्ये विकसित करण्यासाठी मोठी संधी उपलब्ध करून देणार आहे.या उद्घाटन सोहळ्यास उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवावी, असे आवाहन प्राचार्य डॉ. गजेन्द्र आर. बमनोटे यांनी केले आहे.

पान १ व १० वरून

## टीम इंडियाप्रमाणे काम

प्राधान्य देण्याचा निर्णय घेतला. सुरुवातीला, व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा स्थगित करण्यात आला होता; मात्र, त्यानंतर टप्प्याटप्प्याने हा पुरवठा पुन्हा सुरू करण्यात आला: सुरुवातीला २०Տ पासून सुरुवात झाली, त्यानंतर (पीएनजी नेटवर्कच्या विस्ताराचा विचार करून) त्यात आणखी १०Տ वाढ करण्यात आली, त्यानंतर ५०% पर्यंत वाढ झाली आणि सध्या हा पुरवठा ७०Տ पातळीवर पोहोचला आहे. १४ मार्चपासून आतापर्यंत, सुमारे ३०,००० टन व्यावसायिक एलपीजीचा पुरवठा करण्यात आला आहे. या उपाययोजनांची अंमलबजावणी करताना, रेस्टॉरंट्स, ढाबे। (रस्त्यावरील खानावळी), हाटेल्स, औद्योगिक आहारगृहे (कँटीन्स) आणि स्थलांतरित कामगार यांना प्राधान्य दिले जाईल, याची शासनाने खात्री केली. याव्यतिरिक्त, पोलाद (स्टील), वाहन (ऑटोमोबाईल), वस्त्रोद्योग, रंग (डाई), रसायन आणि प्लास्टिक या क्षेत्रांमधील उद्योगांसाठीही प्राधान्यक्रमाने पुरवठा वाटप निश्चित करण्यात आले. तसेच, स्थलांतरित कामगारांच्या वापरासाठी विशेषत्वाने सुमारे ३०,००० लहान (५-किलो वजनाचे) एलपीजी सिलिंडर्स वितरित करण्यात आले. देशामध्ये कच्च्या तेलाचा, पेट्रोलचा आणि डिझेलचा साठा मुबलक प्रमाणात उपलब्ध असल्याचे; तसेच एलपीजी, एलएनजी आणि पीएनजी यांच्या पुरवठा साखळ्या पूर्णपणे सुरक्षित असल्याचे शासनाने स्पष्ट केले. काही ठिकाणी अफवांमुळे पेट्रोल पंपांवर वाहनांच्या लांब रांगा दिसून आल्या असल्या, तरी प्रत्यक्षात कोणत्याही प्रकारची टंचाई अस्तित्वात नाही. भारताच्या 'कच्च्या तेलाच्या बास्केट'ची (सरासरी किमतीची) किंमत प्रति बॅरल सुमारे ७० डालर्सवरून वाढून १०० डालर्सपेक्षा जास्त झाली असली, तरी कोणत्याही पेट्रोलियम उत्पादनाची टंचाई निर्माण होणार नाही, याची खात्री करण्यासाठी शासनाने आवश्यक पावले उचलली आहेत. त्यांनी सांगितले की, कालच्या दिवशी सुमारे ३,००० ठिकाणी छापे टाकण्यात आले, ज्यामध्ये १,५०० एलपीजी सिलिंडर्स जप्त करण्यात आले. तसेच, ३५० वितरकांना 'कारण-दर्शवा नोटिसा' बजावण्यात आल्या आहेत. आपल्याकडे इंधनाचा पुरेसा साठा उपलब्ध आहे; त्यामुळे, कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नका आणि तुम्हाला खरोखरच जितकी गरज आहे, तितकेच इंधन खरेदी करा. पेट्रोल पंपांवर लांब रांगा लावू नका.

## एकीने पाणी पाणी म्हणत

बाब समोर आली आहे. आई-वडील, आजी-आजोबा तसेच काही नातेवाइकांनी मिळून हा प्रकार दडपण्याचा प्रयत्न केल्याचे बोलले जात आहे. जखमी अनुजाने रुग्णालयात शुद्धीवर आल्यानंतर डॉक्टरांना दिलेल्या जबाबात संपूर्ण प्रकार सांगितला. आम्हाला वडिलांनी हात-पाय बांधून उलटे टांगले आणि मारहाण केली, असे तिने सांगितल्याने डॉक्टरांनी तातडीने याबाबत पोलिसांना माहिती दिली आणि प्रकरणाचा भांडाफोड झाला.

**आजोबांवर मुलाचा कोयत्याने जीवघेणा हल्ला-**घटनेनंतर आणखी एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मुलींना सोडणा-या आजोबांवरच मुलीच्या वडिलांनी कोयत्याने हल्ला करत त्यांना धमकावले होते. यामुळे कुटुंबातील अंतर्गत वाद आणि क्रौर्याची परिसीमा स्पष्ट होत आहे.

**निर्दयी आई-बापाला कठोर शिक्षा द्या-**सध्या पोलिसांकडून घटनेचा सखोल तपास सुरू असून, संबंधित आरोपींवर खून व खुनाचा प्रयत्न यासह गंभीर गुन्हे दाखल होण्याची शक्यता आहे. बनपुरीसारख्या शांत गावात घडलेल्या या घटनेमुळे संपूर्ण तालुका हादरला असून, अशा निर्दयी लोकांना कठोर शिक्षा झालीच पाहिजे, अशी तीव्र प्रतिक्रिया सर्वसामान्य नागरिकांतून व्यक्त होत आहे.

## विवाहित पुरूषाचे लिव्ह-

न्यायालयाने पुढील आदेशापर्यंत याचिकाकर्त्या जोडप्याच्या अटकेला स्थगिती देत पोलिसांना त्यांना अटक न करण्याचे आदेश दिले आहेत.याचिकाकर्त्यांचे वकील शहंशाह अख्तर खान यांनी सांगितले-लिव्ह-इन रिलेशनशिपच्या प्रकरणावर अलाहाबाद उच्च न्यायालयाने महत्त्वाचा निर्णय दिला आहे.

**कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवू शकत नाहीत**

न्यायालयाने आदेश देताना, याचिकाकर्त्या महिलेच्या कुटुंबातील सर्व सदस्यांना जोडप्याच्या जीवाला किंवा शरीराला कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवण्यापासून रोखले आहे. तसेच, कुटुंबाने जोडप्याच्या वैवाहिक घरात प्रवेश करू नये आणि त्यांच्याशी मोबाईल किंवा इतर कोणत्याही व्यक्तीमार्फत संपर्क साधू नये, असेही म्हटले आहे. न्यायालयाने म्हटले आहे की, शहाजहानपूरचे पोलिस अधीक्षक याचिकाकर्त्यांची सुरक्षा आणि संरक्षण सुनिश्चित करण्यासाठी व्यक्तिशः जबाबदार असतील. या प्रकरणाची पुढील सुनावणी न्यायालय आता ८ एप्रिल रोजी करेल. हा आदेश न्यायमूर्ती जे.जे. मुनीर आणि न्यायमूर्ती तरुण सक्सेना यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्या अनामिका आणि नेत्रपाल यांच्या फौजदारी रिट याचिकेवर सुनावणी करताना दिला आहे.

## भोंदुबाब खरात चौकशीच्या

वृत्त आहे. भोंदूबाबा अशोक खरात याचा पिस्तुल परवाना रद्द करण्यात आल्याची माहिती पोलिस सूत्रांनी दिली. खरातविरुद्ध सरकारवाडा पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे आठ गुन्हे दाखल असून त्याचा तपास विशेष तपास पथक (एसआयटी) करीत आहे. तपासादरम्यान ताब्यातील खरातच्या शस्त्रसाठ्याबाबत धक्कादायक माहिती समोर आली होती. तर त्याच्या घरातून जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली होती, फार्महाउसवरून एकूण २१ काडतुसे सापडली होती. यामध्ये पाच काडतुसे वापरलेली असल्याचे निष्पन्न झाले आहे. ही काडतुसे नेमकी कोणत्या कारणासाठी वापरण्यात आली, याचा तपास सध्या सुरू आहे.

शस्त्राचा गैरवापर झाला?

खरातकडे परवानाधारक पिस्तूल असल्याचेही तपासात उघड झाले होते. मात्र या शस्त्राचा गैरवापर झाला आहे का, याबाबत शंका उपस्थित झाल्याने प्रशासनाने त्याचा पिस्तूल परवाना रद्द केला आहे. एसआयटी पथकाकडून पिस्तुलाचा वापर, काडतुसांचा स्रोत आणि त्यामागील उद्देश याबाबत सखोल चौकशी सुरू आहे. खरातने पोलिस कोठडीत काडतुसे कुठे वापरली याची माहिती तपास पथकाला अद्याप दिलेली नाही. मी पिस्तुलाचा परवाना स्वतःच्या रक्षणासाठीच मिळविला होता, अशी सबब भोंदू खरातने पोलिसांना सांगितली.

## सार्वजनिक आरोग्य व्यवस्था

पल्स परिषद ही धोरण, व्यवहार आणि नाविन्य यांना जोडणारे महत्त्वाचे व्यासपीठ ठरत असून, या माध्यमातून विविध क्षेत्रांत गुंतवणूक व सामंजस्य करार होणार आहेत. या परिसंवादातून भविष्यातील आरोग्य धोरणांना दिशा मिळेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

**पल्स परिषद महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेची सध्याची स्थिती व भविष्यातील दिशा दर्शविणारी** -उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

डिजिटल आरोग्य बळकट करणे, ग्रामीण-शहरी दरी कमी करणे आणि महाराष्ट्राला जागतिक वेलनेस केंद्र बनविण्याच्या दिशेने ही परिषद महत्वपूर्ण ठरणार असून, महाराष्ट्राच्या आरोग्य व्यवस्थेची सध्याची स्थिती व भविष्यातील दिशा दर्शवते. असे उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी म्हटले.

महाराष्ट्राने उत्तम रुग्णालये, संशोधन आणि कुशल डाक्टरांच्या माध्यमातून मजबूत आरोग्य व्यवस्था उभी केली आहे. डिजिटल युगात एआय, टेलिमेडिसिन, रोबोटिक सर्जरी यांसारख्या नवकल्पनांमुळे महाराष्ट्र आरोग्य क्षेत्रात आघाडीवर आहे. मुंबई, पुणे, नागपूर ही शहरे वैद्यकीय पर्यटनाची महत्त्वाची केंद्रे बनत आहेत. ग्रामीण भागातही आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी राबविण्यात येणा-या डिजिटल उपाययोजना अधिक बळकट करण्यासाठी ही परिषद महत्वाची ठरत आहे. असेही उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी म्हणाल्या.

## आता लढाई हमीभावाची

या कार्यक्रमाला महादेव जानकर, विजय जावंधीया आणि वामनराव चटप यांची प्रमुख उपस्थिती लाभली. आंदोलनाच्या काळातील संघर्षमय आठवणींना उजाळा देत, शेतकरी प्रश्नांवर पुढील लढ्याची दिशा देखील स्पष्ट करण्यात आली.

यावेळी कर्जमाफीच्या प्रत्येक आंदोलनात सहभागी असणारे परभणी जिल्ह्यातील दिव्यांग बांधव सूर्यभान मारोती ढगे यांची रक्ततुला करण्यात आली. तसेच आंदोलनांमध्ये सातत्याने कार्यकर्त्यांची सेवा करणारे, थकलेल्या आंदोलकांची काळजी घेणारे संजय गोमकाळे यांची बिजतुला करून सन्मान करण्यात आला. या सन्मान सोहळ्यामुळे आंदोलनातील निस्वार्थी कार्यकर्त्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.महादेव जानकर यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेतकऱ्यांच्या एकजुटीच्या ताकदीमुळेच सरकारला नमावे लागले. आपण पूर्णपणे विजयी झालो नसून सुमारे ८० टक्के यश मिळाले आहे. लोक जाती-धर्मासाठी एकत्र येतात, मात्र शेतकऱ्यांसाठी एकत्र येणे अधिक गरजेचे आहे. नागपूर आंदोलनावेळी अनेक आरोप-प्रत्यारोप झाले, पण एकही शेतकरी मागे हटला नाही, त्यामुळेच सरकारला निर्णय घ्यावा लागला, असे त्यांनी नमूद केले.

विजय जावंधीया यांनी आपल्या भाषणात शेतकरी परिस्थितीवर तीव्र भाष्य केले. ते म्हणाले 'आपण अत्यंत कठीण काळातून जात आहोत. दोन लाखांची कर्जमाफी झाली, पण आम्हाला माफी नको, कर्ज फेडण्याची ताकद हवी आहे. ती ताकद शेतमालाला योग्य भाव मिळाल्याशिवाय येणार नाही,' असे त्यांनी स्पष्ट केले. नरेंद्र मोदी यांनी दिलेल्या आश्वासनांची आठवण करून देत, एमएसपी प्रत्यक्ष बाजारात मिळत नसल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. रामराज्याच्या आदर्शांचा उल्लेख करत, दिलेल्या वचनांची पूर्तता होणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.वामनराव चटप यांनी सांगितले की, कर्जमाफीसाठी आम्ही रस्त्यावर उतरलो तेव्हा टीका झाली, पण शेतकऱ्यांच्या पाठिंब्यामुळेच हा निर्णय शक्य झाला. या आंदोलनात बच्चू कडू यांचा पुढाकार महत्त्वाचा होता, असे त्यांनी नमूद केले.

**कर्जमाफी हा संघर्षाचा परिणाम - बच्चू कडू**

बच्चू कडू यांनी आपल्या भाषणात सांगितले की, शेतकऱ्यांचे जीवन आणि कष्ट अत्यंत महत्त्वाचे आहेत. अनेक वर्षांपासून सुरू असलेली ही लढाई आजही तितक्याच ताकदीने सुरू आहे.

'आंदोलनात रक्त सांडले, पण लढा थांबला नाही. समाजाला जाती-धर्मात अडकवले जात असताना शेतकरी म्हणून एकत्र येणे गरजेचे आहे,' असे त्यांनी ठामपणे सांगितले. ते पुढे म्हणाले, 'ही कर्जमाफी हा संघर्षाचा परिणाम आहे. आम्ही गांधीगिरीने लढायचे ठरवले आहे, पण गरज पडल्यास भगतसिंगगिरीनेही पुढे जाऊ. स्वतःचे घर नसले तरी ज्यांचे घर जळाले त्यांचे घर उभारण्याची भावना या लढ्यात आहे.' या संघर्षामुळे दिव्यांग, घरकुल आणि शेतमजूर योजनांमध्येही सकारात्मक बदल झाल्याचे त्यांनी नमूद केले. या उपोषणाच्या माध्यमातून शेतकरी प्रश्नांवर लढा सुरूच राहणार असल्याचा ठाम संदेश देण्यात आला. 'ज्या कार्यकर्त्यांनी मला साथ दिली, मोठं केलं त्या कार्यकर्त्यांच्या सन्मानासाठीच मी आज रक्तदान केलं,' असे म्हणताना बच्चू कडू भावूक झाले.

## पोलिस ठाण्यात अंगावर

नऊही आरोपीना शिक्षा सुनावून त्यांची कारागृहात रवानगी केली होती.या प्रकरणात खल्लार पोलिसांनी कलमांमध्ये बदल केल्याचा आरोप झिपरकर परिवाराने उपविभागीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या तक्रारीत केला होता. दरम्यान आज (दि.२७) संजय झीपरकर, सारिका झिपरकर,व मुलगा यांनी थेट दर्यापूर पोलिस ठाण्यात पोहोचत अंगावर डिझेल टाकून पेटवून घेण्याचा प्रयत्न केला.पोलिसांनी संजय झीपरकर, सारिका झीपरकर व मुलगा यांना ताब्यात घेतले आहे. पुढील कार्यवाही पोलिस करीत आहे.मागिल मे महिन्यात नालवाडा येथे घडलेल्या घटनेसंदर्भात गुन्ह्यातील सर्व ९ आरोपींना वेळीच अटक करत कारवाई करुन ताब्यात घेतले होते. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनात विविध कलमाखाली गुन्हे दाखल करुन आरोपीना अटक करुन त्यांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने सर्व आरोपीना शिक्षा सुनावून त्यांची रवानगी कारागृहात केली. सदर प्रकरणाचा निपक्ष तपास करुन योग्य तीच कारवाई केली. झिपरकर परिवाराने लावलेल्या आरोपात तथ्य नाही.

-रविंद्र बारड - ठाणेदार, खल्लार

## गॅस सिलिंडर, पेट्रोल व डिझेल

अभिजीत वायकोस, प्रकल्प अधिकारी अमित रंजन, जिल्हा पुरवठा अधिकारी संघपाल मेश्राम, तसेच विविध विभागांचे प्रमुख अधिकारी, तहसिलदार, गटविकास अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत पालकमंत्री ना. संजय राठोड आणि आदिवासी विकास मंत्री ना .प्रा अशोक उईके यांनी जिल्ह्यातील गॅस सिलिंडर, पेट्रोल व डिझेलच्या उपलब्ध साठ्याची माहिती घेतली. तसेच साठेबाजी, काळाबाजार रोखण्यासाठी पथकांनी कारवाई करावी. अफवांमुळे नागरिकांची संभ्रम निर्माण होत असल्याने तो तातडीने दूर करण्यासाठी जनजागृती करावी. तसेच युद्धजन्य परिस्थितीच्या अनुषंगाने प्रशासनाने सतर्क राहून तयारी करावी, वितरण एजन्सीजच्या समन्वयाने नियोजन करावे, असे निर्देश त्यांनी यावेळी प्रशासनाला दिले.

## यवतमाळ महोत्सवाचा फज्जा

आहे.'हा महोत्सव शेतकऱ्यांसाठी आहे की केवळ आकडे फुगवण्यासाठी?' असा थेट सवाल उपस्थित होत असून, कोट्यवधींचा खर्च करूनही शेतकऱ्यांची अशी परवड होणे ही प्रशासनाची मोठी अपयशाची कबुली असल्याची चर्चा रंगत आहे.

शेतकऱ्यांच्या नावावर आयोजित महोत्सवातच शेतकरी, मजूर आणि पशुधन यांची अशी उपेक्षा होत असेल, तर अशा कार्यक्रमांच्या उद्देशावरच प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. प्रशासनाने तात्काळ सुधारणा न केल्यास हा संताप मोठ्या आंदोलनात परिवर्तित होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

महोत्सव की 'लूट महोत्सव'?

महोत्सवाच्या नावाखाली शेतकऱ्यांची आर्थिक लूट सुरू असल्याचे चित्र उघड झाले आहे. बाहेर २० रुपयांत मिळणारी खिचडी महोत्सव परिसरात ५० रुपयांना विकली जात आहे. दूरवरून आलेल्या शेतकरी व महिला बचत गटांच्या सदस्यांसाठी कोणतीही भोजन व्यवस्था नसल्याने त्यांना महागड्या अन्नावरच अवलंबून राहावे लागत आहे. हा प्रकार म्हणजे शासकीय कार्यक्रमाच्या आडून 'शेतकऱ्यांच्या खिशावर डल्ला' असल्याची तीव्र प्रतिक्रिया उमटत आहे.

मजुरांची पिळवणूक, मानवी हक्कांचा प्रश्न-

महोत्सवासाठी उभारण्यात आलेल्या डोम व इतर सुविधांच्या कामात गुंतलेल्या मजुरांची स्थिती अत्यंत दयनीय असल्याचे समोर आले आहे. परजिल्ह्यातून आणलेल्या मजुरांना वेळेवर मजुरी, अन्न व पिण्याचे पाणी दिले जात नसल्याची गंभीर बाब समोर आली आहे. प्रखर उन्हात दिवसभर काम करूनही आवश्यक सुविधा न मिळाल्याने काही मजूर बेशुद्ध पडल्याच्या घटना घडल्या आहेत. एकीकडे भव्यतेचा दिखावा आणि दुसरीकडे मजुरांची उपेक्षा ही परिस्थिती प्रशासनाच्या निष्काळजीपणाचे जिवंत उदाहरण ठरत आहे. संबंधित ठेकेदार आणि कृषी विभागाने तात्काळ हस्तक्षेप करून मूलभूत सुविधा उपलब्ध करून न दिल्यास हा प्रश्न अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## अल्पवयीन मुलीवर जावयाने

लैंगिक अत्याचार केला. या सततच्या अत्याचारामुळे पीडित मुलगी ७ महिन्यांची गरोदर राहिली. ही बाब जेव्हा मुलीने आपल्या आईला सांगितली, तेव्हा समाजात बदनामी होईल, या भीतीने आईने पीडितेचे घाईघाईत लग्न लावून दिले. लग्नानंतर तिच्या पतीनेही तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. पीडितेच्या प्रसूतीची वेळ जवळ आल्याने तिला अकोला येथील एका शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्रसूती प्रक्रियेदरम्यान कागदपत्रांची पूर्तता करताना पीडितेचे आधार कार्ड तपासले असता, प्रशासनाच्या लक्षात आले की तिचे वय केवळ १६ वर्षे आहे. ही बाब अत्यंत गंभीर असल्याने रुग्णालय प्रशासनाने तातडीने अकोल्यातील रामदासपेठ पोलीस ठाण्याला याची माहिती दिली. अकोला पोलिसांनी तत्काळ रुग्णालयात पोहोचून पीडितेचा जबाब नोंदवला. पीडितेने दिलेल्या जबाबाच्या आधारे, रामदासपेठ पोलिसांनी दीर, पती आणि लग्नाशी संबंधित अन्य एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. ही घटना अमरावती जिल्ह्यातील धारणी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडल्याने, अकोला पोलिसांनी हा गुन्हा पुढील तपासासाठी धारणी पोलिसांकडे वर्ग केला आहे. सध्या धारणी पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहे.

## ट्रकचालकांच्या ६ायत्नांना यश

केली. तहसीलदार पुष्पा सोळंके यांनी वाहनचालकांच्या या न्याय मागणीची तात्काळ दखल घेतली. त्यांनी सर्व पेट्रोल पंप चालकांना लांबच्या प्रवासाला जाणाऱ्या अवजड वाहनांची बिल्टी पाहून त्यांना ३०० लीटर डिझेल देण्याचे आदेश दिले.

या निर्णयामुळे अवजड वाहतूकदारांचा प्रश्न तात्काळ निकाली निघाला असून, यामुळे शेतकऱ्यांचा माल वेळेवर बाजारपेठेत पोहोचण्यास मदत होणार आहे. यावेळी मो. इद्रीस मो. जहिरोद्दीन, विजय नेमाडे, शकील अहमद अ. आबीद, म. जाकीर म. शाकीर, सै. नुरोद्दीन जयरोद्दीन, नईमखान सलीम खान, अ. सईद अ. गनी, आदिल खाँन वहिद खान, शहजाद अ. हक, म. नदीम, मो. नसीर खानआहमद खान, सै. हारुन मो. जाकीर, शे. रिजवान, सै. जुबेर, शाहरुख खान यांच्यासह अनेक अवजड वाहतूकदार उपस्थित होते.

## चांगापूरचा रेल्वे अंडरपास

क्रॉसिंग आणि अंडरपासची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी उपस्थित चांगापूरवासीयांचा संताप अनावर झाला होता. नगरसेवक अनिल अग्रवाल यांनी रेल्वेच्या अधिकाऱ्यांसमोर नकाशा ठेवून या कामातील तांत्रिक चुकांचा पाढाच वाचला. रेल्वे क्रॉसिंगच्या एका बाजूकडून दुसऱ्या बाजूचे अंतर केवळ ५० फूट असताना, रेल्वेने तब्बल ५०० मीटर लांब आणि अत्यंत वळणदार अंडरपास बांधून प्रवाशांची मोठी गैरसोय केली आहे. या मार्गावर दोन वाहने समोरासमोर आल्यास भीषण अपघाताची शक्यता असून, पावसाळ्यात येथे पाणी साचल्यास हा एकमेव मार्गही पूर्णपणे बंद होईल, अशी भीती अग्रवाल यांनी व्यक्त केली.

हनुमान जन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर चांगापूर नरेश हनुमान मंदिरात ५ ते ७ लाख भाविक दर्शनासाठी येतात. एवढ्या मोठ्या संख्येने येणारी वाहने आणि भाविक या अरुंद व अंधाऱ्या अंडरपासमधून जाणे अशक्य आहे. त्यामुळे ३१ मार्चपर्यंत रेल्वे क्रॉसिंगचा रस्ता पूर्वीप्रमाणेच समतल करून तो भाविकांसाठी खुला करावा, अशी आग्रही मागणी यावेळी करण्यात आली. पाहणी दरम्यान खासदार डॉ. अनिल बोंडे आणि अनिल अग्रवाल यांनी रेल्वेच्या वरिष्ठ उपमहाव्यवस्थापकांशी भ्रमणध्वनीवरून चर्चा करून वस्तुस्थिती मांडली. जर ३१ मार्चपर्यंत रस्ता मोकळा केला नाही, तर चांगापूरवासीय स्वतः आंदोलनाच्या पवित्र्यात रेल्वेने बांधलेली सुरक्षा भिंत तोडून रस्ता तयार करतील आणि रस्ता पूर्ववत करतील. गरज पडल्यास 'रेल रोको' आंदोलनही केले जाईल, असा सज्जड दमही यावेळी देण्यात आला.या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा म्हणून रेल्वे क्रॉसिंगवर थेट ओव्हरब्रिज बांधावा किंवा सध्याच्या अंडरपासला 'वन-वे' करून दुसऱ्या बाजूला आणखी एक अंडरपास निर्माण करावा, असे पर्याय प्रशासनासमोर ठेवण्यात आले आहेत. तसेच तातडीने या भागात प्रकाश व्यवस्था करणे, सुरक्षिततेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे लावणे आणि बांधकामासाठी साचलेली खडी-माती हटवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. रेल्वे अधिकाऱ्यांनी आणि कंत्राटदाराने अंडरपास बांधकामाच्या निर्देशाचे उल्लंघन करून मनमानी कारभार केल्याचे सांगत अनिल अग्रवाल यांनी रेल्वे प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले. या पाहणी प्रसंगी चांगापूर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते, हनुमान भक्तांनी रेल्वेच्या चुकीच्या धोरणांविरुद्ध तीव्र संताप व्यक्त केला.

## मंगलधाम रोडवर देहविक्रीचा

**१२०० रुपयात देहविक्री-**

प्राथमिक तपासात या ठिकाणी महिलांकडून देहविक्रीचा व्यवसाय करून घेतला जात असल्याचे स्पष्ट झाले आहे. ग्राहकांकडून सुमारे १२०० रुपये दर आकारला जात असल्याचीही माहिती समोर आली आहे. या प्रकरणात घरमालकाचा सहभाग असल्याचा संशय व्यक्त केला जात असून, तो या रॅकेटचा मुख्य सूत्रधार असल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

कारवाईदरम्यान पोलिसांनी घटनास्थळाचा पंचनामा केला असून, संबंधितांकडून मिळालेल्या माहितीनुसार या रॅकेटचे आणखी धागेदोरे शोधले जात आहेत. आरोपींना पुढील कारवाईसाठी फ्रेजरपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. ही संपूर्ण कारवाई अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या प्रमुख दिप्ती ब्राम्हणे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात एपीआय मेघाली गावंडे, पोलीस हवालदार राजेश यादव तसेच दामिनी पथकातील भाग्यशाली पवार, रंजनी ढवळे, प्रिया ढेवले, पूजा सपकाळे, नंगिनी वरठे यांचा समावेश होता. या धाडसी कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून, अशा प्रकारच्या अनैतिक व्यवसायांवर पोलिसांकडून सातत्याने कारवाई सुरू राहणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

## हनुमान जयंतीनिमित्त निघणार

बिल्डिंग, अंबागेट, गांधी चौक, राजकमल चौक, सरोज चौक, जवाहर गेट, सक्कर साथ, सराफा, जैन मंदिर , भाजी बाजार, बजरंग चौक मार्गे आझाद चौक मध्ये विसर्जित होईल. शोभायात्रेमध्ये उज्जैनचा गजराज, हरियाणाचे महाकाली पथक आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे. पथक द्वारा काली मातेची जिवंत प्रतिकृती, शिवपार्वती विवाह सोहळा, महाकालचे अघोरी नृत्य आणि विविध धार्मिक प्रात्यक्षिक सादर केले जातील. प्रभू श्रीरामची भव्य मूर्ती आणि संकटमोचन हनुमानजी साक्षात जिवंत वाटणारी प्रतिकृती हे यात्रेचे मुख्य श्रद्धास्थान असेल. विघ्नहर्ता साऊंड व एम्पायर ऑडिओ बॅन्जो व धमाल, आदिवासी नृत्य, वारकरी दिंडी, माऊलीचे अश्व आणि सामाजिक संदेश देणारे देखावे शोभायात्रेमध्ये पहावयास मिळतील. शोभयात्रेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे. पत्रकार परिषदेमध्ये नगरसेवक प्रा.प्रशांत शिरभाते, भैय्या पवार, अनिकेत ढेंगळे, मनोज भेले, शुभम शेगोकार, सुरेश रतावा, राहुल येवले, वैभव देशमुख, चेतन यावल, समीर जवंजाळ ,समीर कान्हे, चेतन इटणारे, आयुष वाघमारे, विवेक हिरूळकर, कनक कपूर, भूषण मामर्डे, लता तोरणे, निलेश सराफ, प्रथमेश लधवे, सागर इंगोले, विजय अटाळकर, राहुल बागडे, नितीन काळे, सुजल पंत, आकाश हिवसे आदि उपस्थित होते.

**राजकमल चौकात महाआरती-**

शोभायात्रा राजकमल चौकात पोहोचल्यावर भाविकांच्या उपस्थितीत हनुमान चालीसाचे सामूहिक पठण व महाआरती होईल. त्यानंतर संकट मोचन रथावर फुलांची उधळण आणि आतिश बाजी करण्यात येईल. यानंतर शोभयात्रा समोर जाईल.

## अखेर वादग्रस्त टोलप्लाझा

ते भांडेगाव या मार्गावरील केवळ १० टक्के काम पूर्ण असताना १०० टक्के टोल आकारला जात असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. तसेच टोलनाक्याचे अंतर नियमबाह्य असल्याचेही स्पष्ट केले.

बैठकीस जिल्हाधिकारी विकास मीना, विविध विभागांचे अधिकारी तसेच आंदोलनकर्त्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. पालकमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना जाब विचारत नागरिकांच्या हिताला प्राधान्य देण्याचे स्पष्ट केले.आंदोलकांवर दाखल गुन्हे मागे घेण्याचे निर्देशही त्यांनी पोलिस विभागाला दिले.दरम्यान, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची लवकरच सामूहिक भेट घेऊन हा प्रश्न अंतिम सोडविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे आंदोलन कर्त्यांमध्ये समाधान व्यक्त होत असून, हे जनआंदोलनाचे यश असल्याची प्रतिक्रिया राहुल ठाकरे यांनी दिली.

## आमदार ज.मो.अभ्यंकर

मुंबई च्या उपाध्यक्ष होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना ,नातवंडे, व मोठा आप्त.परिवार आहे. त्यांचे मूळ गाव अंजनगाव सुर्जी तालुक्यातील विहिगाव हे आहे.

त्यांचा सामाजिक व शैक्षणिक कार्यात फार मोठा सहभाग होता. त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजता जोगेश्वरी (पश्चिम ) अंधेरी येथील स्मशानभूमीत करण्यात येणार आहे. त्यांच्या निधनामुळे आमदार गजानन लवटे, नगराध्यक्ष अविनाश गायगोले, यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी शोक व्यक्त केला.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला | वाशिम | बुलडाणा

■ शनिवार २८ मार्च २०२६ ■ मुल्य ३.०० ■ पृष्ठे ४

epaper : janmadhyam.com
mail : jmakola.thakur@gmail.com


## इंधनासाठी झुंबड मालेगावात नियमांना हरताळ प्रशासनाचा निष्क्रियपणा उघड

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

सध्या राज्यभर पेट्रोल-डिझेलसाठी अक्षरशः झुंबड उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. पहाटेपासूनच वाहनधारक पेट्रोल पंपांवर लांबच लांब रांगा लावत असून आज मिळेल का? या चिंतेत नागरिक ताटकळत उभे आहेत. अनेक ठिकाणी आउट ऑफ स्टॉक चे फलक झळकत असल्याने परिस्थिती आणखीच गंभीर बनली आहे.

मालेगाव शहरात तर परिस्थिती अधिकच चिंताजनक झाली असून काही पेट्रोल पंपांवर नियम धाब्यावर बसवून सर्रासपणे बाटल्या व मोठ्या कॅनमध्ये पेट्रोल-डिझेलची विक्री सुरू असल्याचे दिसून येत आहे. यामुळे संभाव्य



अपघातांचा धोका वाढला असून सुरक्षेचे सर्व नियम पायदळी तुडवले जात आहेत.नागरिकांच्या मते इंधन तुटवड्यामुळे आम्हाला तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे. तरीही पेट्रोल मिळेल याची खात्री नसते. या पार्श्वभूमीवर स्थानिक प्रशासन मात्र पूर्णपणे निष्क्रिय असल्याचा आरोप नागरिकांकडून होत आहे. तज्ञांच्या मते अशा प्रकारे उघडपणे नियमभंग होत असताना तात्काळ कारवाई होणे गरजेचे आहे. अन्यथा भविष्यात मोठ्या दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही.दरम्यान संबंधित प्रशासनाने तातडीने परिस्थितीवर नियंत्रण मिळवून इंधन पुरवठा सुरळीत करावा, तसेच नियम मोडणाऱ्या पेट्रोल पंपांवर कठोर कारवाई करावी अशी जोरदार मागणी नागरिकांकडून होत आहे.

## जय श्रीराम’च्या गजरात मालेगाव दुमदुमले : भव्य शोभायात्रेत श्रद्धा शिस्त आणि उत्साहाचा संगम

■ मालेगांव| प्रतिनिधी ■

राम नवमीच्या पावन पर्वानिमित्त गुरुवारी दि. २६ मार्च मालेगाव शहर भगव्या रंगात न्हाऊन निघाले. जय श्रीराम च्या अखंड जयघोषात निघालेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण शहरात भक्तीमय आणि उत्साही वातावरण निर्माण केले. हजारो रामभक्तांच्या उपस्थितीने शहरातील प्रमुख रस्ते फुलून गेले होते.

गांधीनगर येथील हनुमान मंदिरात महा आरतीनंतर दुपारी शोभायात्रेला प्रारंभ झाला. शहरातील विविध प्रमुख मार्गावरून मार्गक्रमण करत ही



शोभायात्रा अखेर श्रीराम मंदिरात विसर्जित करण्यात आली. मार्गभर ठिक ठिकाणी नागरिकांनी पुष्पवृष्टी करत शोभायात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले. शोभायात्रेत प्रभू श्रीरामांची आकर्षक पालखी ट्रॉलीवरील भव्य मूर्ती तसेच विविध सामाजिक व धार्मिक देखावे हे प्रमुख आकर्षण ठरले. भगव्या वेशात सजलेले तरुण हातात केशरी ध्वज घेऊन घोषणाबाजी करत होते. डीजेच्या तालावर भजन-कीर्तनाचा रंग चढला होता ज्यामुळे वातावरण अधिकच भारावून गेले. शहरातील विविध सामाजिक संस्था मंडळे व राजकीय संघटनांनी भाविकांसाठी महाप्रसाद, पाणी, शरबत, मठ्ठा आदींची उत्तम व्यवस्था केली होती. शिवराज गणेश मंडळाच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिरात अनेक युवकांनी सहभाग घेत समाजाप्रती आपली जबाबदारी पार पाडली. पोलीस प्रशासनाने कडेकोट बंदोबस्त ठेवण्यात आला होता संपूर्ण कार्यक्रम शांततेत आणि शिस्तबद्ध रीत्या पार पाडला. वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्यात आले होते त्यामुळे कुठेही अनुचित प्रकार घडला नाही.

## जिल्हाधिकारी कार्यालयात ‘जिल्हास्तरीय जनगणना कक्ष’ सुरू; प्रक्रियेच्या समन्वयाला गती

■ प्रतिनिधी | वाशिम ■

जिल्ह्यातील जनगणना प्रक्रियेचे प्रभावी सनियंत्रण व समन्वयन साधण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या इमारतीतील तळमजल्यावर जिल्हास्तरीय जनगणना कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. या कक्षाचे उद्घाटन आज दि.(२६) मार्च रोजी प्रधान जनगणना अधिकारी तथा जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्या शुभहस्ते पार पडले.

नव्याने स्थापन करण्यात आलेल्या या कक्षामार्फत जिल्ह्यातील जनगणना कामकाजाचे नियोजनबद्ध पद्धतीने निरीक्षण, समन्वय आणि अंमलबजावणी करण्यात येणार असून, संपूर्ण प्रक्रियेला अधिक गती व पारदर्शकता मिळणार आहे. या प्रसंगी भारतीय प्रशासकीय सेवेतील परिविक्षाधीन अधिकारी तथा कारंजा उपविभागीय अधिकारी आकाश वर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे, उपविभागीय अधिकारी वैशाली देवकर, नगरपालिका सहआयुक्त डॉ. बाबुराव बिक्कड, तहसीलदार



निलेश पळसकर, प्रतिक्षा तेजनकर, जनगणना संचालनालयाचे सहायक संचालक प्रवीण भगत, जिल्हा समन्वयक ऋषीकेश पाथरे, शशांक रुखने आदी उपस्थित होते.

## झाडे तोडण्यासाठी तासन्तास वीजपुरवठा खंडित करू नये! नगरसेवक गणेश अहिर यांचे एमएसईबीला निवेदन

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

मालेगाव शहरामध्ये झाडे तोडण्याच्या कामासाठी अनेक तास वीज पुरवठा खंडित केला जात असल्यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणावर गैरसोयीला सामोरे जावे लागत असल्याची बाब समोर आली आहे या संदर्भात मालेगाव नगर पंचायतचे नगरसेवक गणेश रामप्रसाद अहिर यांनी महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या उपविभागीय अभियंता यांना निवेदन देऊन तात्काळ दखल घेण्याची मागणी केली या निवेदनात नमूद करण्यात आले की,उन्हाळ्याचे दिवस सुरू असून शहरात वीजपुरवठा अनेक तास बंद ठेवण्यात येत आहे झाडे तोडण्याचे काम आवश्यक असले तरी यासाठी तासन्तास वीज बंद ठेवण्यात येत असल्यामुळे नागरिकांची दैनंदिन कामे विस्कळीत होत आहेत विशेषतः लहान मुले,वृद्ध नागरिक यांना उष्म्याचा त्रास सहन करावा लागत आहे तसेच शहरातील थंड पेय विक्रेते,आईस्क्रीम विक्रेते, किराणा दुकानदार तसेच लहान व्यवसायिक यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत



(एमएसईबी विभाग) मालेगाव शहरातील ज्या भागांमध्ये लाईनचा प्रॉब्लेम असेल तेवढ्याच भागातील वीजपुरवठा बंद करण्यात येईल मात्र, मेन लाईन पावर हाऊस येथून बंद करावी लागल्यास शहरातील संपूर्ण वीजपुरवठा काही काळासाठी बंद राहू शकतो.’
— मिर्गे साहेब, अभियंता, एमएसईबी मालेगाव.

असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे वीजपुरवठा बंद असल्यामुळे फ्रिजमधील माल खराब होत असून अनेक व्यापाऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे याशिवाय ज्यांनी सोलर प्रणाली बसविली आहे.

त्यांची जनरेशन सुद्धा वीज पुरवठा बंद असल्यामुळे थांबत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले यामुळे झाडे तोडण्याचे काम करताना पूर्ण दिवस वीजपुरवठा खंडित न करता, दररोज थोड्या वेळासाठी नियोजनबद्ध पद्धतीने वीज बंद करून काम करावे,जेणेकरून नागरिकांना कमीत कमी त्रास होईल.

अशी मागणी नगरसेवक गणेश अहिर यांनी केली आहे निवेदन देताना मालेगाव नगर पंचायतचे नगर सेवक गणेश रामप्रसाद अहिर यांच्यासह कपिल दरणे,संघपाल पखाले, दर्शन राठी आदी उपस्थित होते या निवेदनानंतर नागरिकांमध्ये समाधान व्यक्त होत असून, वीज पुरवठा खंडित करण्याबाबत आता नियोजनबद्ध पद्धत अवलंबली जाईल अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## प्रपंचाला परमार्थाची तर अध्यात्माला विज्ञानाची गरज- ह.भ.प.शुकदास गाडेकर

■ प्रतिनिधी | वाशीम ■



राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून प्रत्येक विषयाचे सखोल ज्ञान प्रत्येकांपर्यंत पोहोचवण्याचे कार्य केले आहे ग्रामगीता याचा अर्थ ग्राम म्हणजे गाव व गीतामध्ये तत्व आहे ग्रामगीतामध्ये संपूर्ण जीवनाचा सार सामावलेला आहे.

प्रपंचाला परमार्थाची तर अध्यात्माला विज्ञानाची गरज असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय गुरुदेव सेवाश्रम गुरुकुंज चे आजीवन प्रचारक ह भ प शुकदासदादा गाडेकर महाराज यांनी केले. जिल्ह्यातील वाशिम येथून जवळ असलेल्या ग्राम देवठाना येते श्रीमद् भागवत कथा सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण निमित्त आयोजित कीर्तनामध्ये २६ मार्च रोजी त्यांनी वरील प्रतिपादन केले. सर्वप्रथम व्यवस्थापक राजेंद्र मालपाणी, भूमिपुत्र उद्योजक देवेंद्र खडसे पाटील, सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी एडवोकेट सुरेश टेकाळे यांच्या हस्ते ह भ प गाडेकर दादा यांचा पुस्तक व शाल श्रीफळ व भेटवस्तू देऊ सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे यजमान सखाराम केशव खडसे, ज्ञानेश्वरी पारायण चे यजमान ह भ प कैलास बबन खडसे, विशेष सहकार्य रमेश राऊत मामा यांनी सुद्धा गाडेकर दादांचे स्वागत केले. कथावाचक रामकिसन महाराज गायकवाड यांच्या अमृतवाणीतून सात दिवस श्रीमद् भागवत सप्ताहाचे वाचन करण्यात आले. यावेळी ह भ प गाडेकर दादा यांनी पुढे म्हटले की आज भोंदूगिरी च्या नावाने महिलांची फसवणूक होत आहे मात्र गांब गीते पूर्वीपासूनच या गोष्टीला विरोध केला आहे महिलांनी पुरुषांनी अध्यात्मा सोबत विज्ञानाचे ज्ञान घेणे जरुरी आहे. जीवनामध्ये सल्ला कुणाचा घ्यावा यालाही महत्त्व आहे दुर्योधन यांनी शकूनी मामा यांचा सल्ला घेतला तर अर्जुनाने भगवंत श्रीकृष्णाचा सल्ला घेतला होता त्यामुळेच दुर्योधनाकडे सर्व असूनही तो पराजित झाला तर अर्जुन सेनेचा विजय झाला होता. सदर कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते निलेश सोमानी व ॲडव्होकेट सुरेश टेकाळे यांचा सत्कार करण्यात आला.सदर कीर्तनाला समस्त ग्रामवासी व परिसरातील फक्त महिला व विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## श्रीराम नवमी निमित्त प्रवाशांसाठी थंड पाण्याच्या माठाची व्यवस्था!

■ प्रतिनिधी | मालेगाव ■

श्रीराम नवमी जयंतीचे औचित्य साधून मालेगाव येथील नवीन एस.टी.बस स्टॉप येथे प्रवाशांसाठी थंड पिण्याच्या पाण्याची माठाची व्यवस्था नगरसेवक गणेश रामप्रसाद अहिर यांच्या वतीने करण्यात आली.

उन्हाळ्याचे दिवस सुरू असून बसची वाट पाहणाऱ्या प्रवाशांना उष्णतेचा मोठा त्रास सहन करावा लागत होता विशेष म्हणजे या विषयावर वाहतूक निरीक्षक पी आर चव्हाण यांच्याशी गणेश अहिर यांनी चर्चा करून त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याने प्रवाशांची गैरसोय होत होती याची दखल घेत श्रीराम नवमीच्या पावन निमित्ताने प्रभू श्रीराम यांच्या प्रतिमेचे पूजन व हार अर्पण करून या थंड पाण्याच्या माठाची व्यवस्था सुरू करण्यात आली या उपक्रमामुळे प्रवाशांनी समाधान व्यक्त करत नगरसेवक गणेश अहिर यांच्या सामाजिक कार्याचे कौतुक केले नगरसेवक गणेश अहिर हे नेहमीच सामाजिक



नगरसेवक गणेश अहिर यांचा सामाजिक उपक्रम

बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवत असतात यापूर्वीही त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा तसेच उर्दू शाळा येथे स्वखर्चाने दोन बोरवेलची व्यवस्था करून विद्यार्थ्यांसाठी कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची सोय उपलब्ध करून दिली होती या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय दूर झाली असून शाळेतील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे क्षण पाहायला मिळाले उन्हाळ्यात पाण्याच्या टंचाईमुळे होणारा त्रास दूर करत विद्यार्थ्यांसाठी कायम स्वरूपी पाण्याची सुविधा उपलब्ध करून देणे हे खऱ्या अर्थाने सामाजिक कार्य असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली या प्रसंगी वाहतूक निरीक्षक आर.पी.चव्हाण,विकास अवचार, अजय गायकवाड,मालेगाव नगर पंचायतचे नगरसेवक गणेश राम प्रसाद अहिर,कपिल दरणे, संघपाल पखाले,सिव्हिल इंजिनियर प्रशांत दुरतकर,दर्शन राठी,अतुल भुरे आदी उपस्थित होते श्रीराम नवमीच्या निमित्ताने करण्यात आलेल्या या उपक्रमामुळे प्रवाशांना दिलासा मिळाला असून सामाजिक बांधिलकी जपत अशा उपक्रमांची गरज असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली नगरसेवक गणेश अहिर यांच्या या उपक्रमाचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

## येवता येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर’ उत्साहात संपन्न; ५ १ ३ लाभार्थींना विविध योजनांचा लाभ

■ प्रतिनिधी | कारंजा ■

छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर टप्पा क्रमांक १ अंतर्गत आज दिनांक २७ मार्च २०२६ रोजी सकाळी १०.०० वाजता राजस्व मंडळ येवता येथील सोपीनाथ महाराज संस्थान परिसरात भव्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन मा. उपविभागीय अधिकारी कैलासजी देवरे (कारंजा) व तहसीलदार रवी महाले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी निवडणूक नायब तहसीलदार लक्ष्मणजी बनसोडे होते. प्रमुख मार्गदर्शक म्हणून महसूल नायब तहसीलदार विनोदजी हरणे उपस्थित



होते. यावेळी येवता गावच्या सरपंच सरस्वतीबाई वानखडे तसेच सोपीनाथ देवस्थानचे अध्यक्ष त्र्यंबकरावजी लाडोने यांची प्रमुख उपस्थिती होती. शिबिरात विविध शासकीय योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणावर वितरित करण्यात आला. संविधानाच्या ११ प्रती गावातील आदर्श कर्मचाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच आयुष्यमान व वय वंदना योजनेअंतर्गत १८५ कार्डांचे वितरण करण्यात आले. तालुका भूमि अभिलेख कार्यालयामार्फत २०० सनदांचे वाटप करण्यात आले.एकात्मिक बालविकास योजना, कारंजा तर्फे २ बेबी किटचे वितरण करण्यात आले. उमेद बचत गटाने त्यांच्या उत्पादनांचे आकर्षक प्रदर्शन मांडले होते. मनरेगा अंतर्गत १० जॉब कार्ड, पुरवठा विभागामार्फत ११ लाभार्थींना रेशन कार्ड, संजय गांधी निराधार योजनेअंतर्गत ७ लाभार्थींना प्रमाणपत्रे देण्यात आली. श्रावणबाळ योजनेचे १० लाभार्थी, गोल्डन कार्ड ६, तर कृषी विभागामार्फत ११ लाभार्थींना सिंचन व ट्रॅक्टर संबंधित प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. महसूल विभागाकडून ६० लाभार्थींना सातबारा फेरफार व ८-अ उतारे वितरित करण्यात आले. अशा प्रकारे एकूण ५१३ लाभार्थींना विविध योजनांचा लाभ देण्यात आला.शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी मंडळ अधिकारी डी.जे. कटके, ग्राम महसूल अधिकारी दत्ता ताथोड, योगेश मेहर, संजय सोहळे, प्रमोद मोडक, विनोद नागलकर, राहुल मनवर, महसूल सेवक केशव इंगळे, गजानन चव्हाण आदींनी अथक परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राहुल वरघट (ग्राम महसूल अधिकारी, कारंजा) यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रमोद मोडक (ग्राम महसूल अधिकारी, सोमठाणा) यांनी केले. कार्यक्रमास मंडळातील शेतकरी व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. उपस्थितांसाठी अल्पोपहार व चहापाण्याची व्यवस्था करण्यात आली होती हे शिबिर नागरिकांच्या विविध शासकीय अडचणी सोडविण्यासाठी उपयुक्त ठरले असून प्रशासन जनतेच्या दारी पोहोचत असल्याचे समाधान उपस्थित नागरिकांनी व्यक्त केले.

## मुंडगाव ग्रामपंचायतसमोर आमरण उपोषण; अमीनपूरकरांचा संताप टोकाला

■ प्रतिनिधी | अकोट ■

अकोट तालुक्यातील मुंडगाव येथील ग्रामपंचायत प्रशासनाच्या हलगर्जीपणाविरोधात अमीनपूर येथील नागरिकांनी अखेर आक्रमक भूमिका घेत आमरण उपोषण सुरू केले आहे.

समाज मंदिरामागील जागेचा ८-अ हक्क मिळावा आणि अतिक्रमण हटवावे, या प्रमुख मागण्यांसाठी दि. २७ मार्च रोजी सकाळी १० वाजल्या पासून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आठ जणांनी पाण्याचा थेंबही न घेता बेमुदत उपोषणास सुरुवात केली. शांतीदूत बुद्धविहार चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अनेक वर्षांपासून या जागेची देखभाल व सामाजिक-



धार्मिक उपक्रम राबवले जात आहेत. मात्र, ही जागा ट्रस्टच्या नावे करण्यासाठी २०२३ पासून ग्राम पंचायत, तहसील, उपविभागीय अधिकारी तसेच जिल्हास्तरावर वारंवार निवेदनं देऊनही कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. उलटपक्षी, ज्या जागेसाठी ८-अची मागणी केली जात आहे, त्या ठिकाणी एका व्यक्तीने अतिक्रमण करून बांधकाम केल्याचा आरोप आंदोलन कर्त्यांनी केला आहे. विशेष म्हणजे या अतिक्रमणावर कारवाई करण्याऐवजी ग्राम पंचायतीने संबंधिताला पाठबळ दिल्याचा गंभीर आरोप नागरिकांनी केला असून, यामुळे गावातील सामाजिक सलोखा धोक्यात आल्याचे ते म्हणाले. अतिक्रमण तात्काळ हटवावे, समाज मंदिरा मागील जागेचा ८-अ शांतीदूत बुद्धविहार ट्रस्टच्या नावे करावा आणि भविष्यात कोणताही वाद उद्भवणार नाही याची हमी द्यावी, या मागण्यांवर नागरिक ठाम आहेत.

या आमरण उपोषणात मंगला पोहोरकर, सिंधुबाई सोनोने, निताबाई गवई, मालताबाई पिंपळे, कमलाबाई सरकटे, सपना पुंडकर, तोताराम सरकटे आणि सुरेश सरकटे सहभागी झाले आहेत.

दरम्यान, तलाठी आशेर परमार्थ व तलाठी वाळके यांनी उपोषणस्थळी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. प्रशासनाने तातडीने निर्णय न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशारा देण्यात आला असून, ‘हक्कासाठी अजून किती काळ उपोषण करावे लागणार?’ असा संतप्त सवाल अमीनपूरकरांनी उपस्थित केला आहे.

## अफवांचा फटका! अकोटमध्ये पेट्रोल पंपांवर वाहनांच्या रांगा प्रत्यक्षात इंधन व गॅस मुबलक; प्रशासनाचे नागरिकांना आवाहन

■ प्रतिनिधी | अकोट ■

अमेरिका- इराण तणावाच्या पार्श्वभूमीवर पसरलेल्या अफवांमुळे अकोट शहरात पेट्रोल व घरगुती गॅस टंचाईची भीती निर्माण झाली असून, त्याचा थेट परिणाम पेट्रोलपंपांवर दिसून आला.

गुरुवार व शुक्रवारी शहरातील विविध पेट्रोलपंपांवर वाहनांच्या लांबलचक रांगा लागल्याने काही ठिकाणी गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. सोशल मीडियावर तसेच तोंडी चर्चांमधून ‘इंधन व गॅसचा साठा संपणार’ अशा अफवा वेगाने पसरल्या. त्यामुळे अनेक नागरिकांनी गरजेपेक्षा अधिक प्रमाणात पेट्रोल-डिझेल भरण्यासाठी धाव घेतली. परिणामी, शहरातील पेट्रोलपंपांवर



अचानक गर्दी वाढली. दरम्यान, घरगुती गॅसबाबतही अशाच प्रकारच्या अफवा पसरल्याने काही नागरिकांनी अतिरिक्त सिलेंडर साठवून ठेवण्याचा प्रयत्न केला. गॅस एजन्सीमध्येही नागरिकांची गर्दी वाढल्याचे चित्र पाहायला मिळाले.मात्र, प्रत्यक्ष परिस्थिती वेगळी असून अकोट शहरात पेट्रोल, डिझेल तसेच घरगुती गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असल्याचे प्रशासन व संबंधित वितरकांनी स्पष्ट केले आहे. ऑनलाइन बुकिंगनंतर २ ते ३ दिवसांत गॅस सिलेंडरचे घरपोच वितरण सुरळीत सुरू असल्याची माहितीही देण्यात आली. तसेच, पेट्रोलपंप चालकांनीही इंधनाचा कोणताही तुटवडा नसल्याचे सांगत नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

**अफवांपासून सावध राहण्याचे आवाहन**

प्रशासनाने नागरिकांना शांतता राखण्याचे व कोणतीही माहिती अधिकृत स्त्रोतांवरूनच तपासून पाहण्याचे आवाहन केले आहे. अनावश्यक साठेबाजी टाळून सर्वांनी संयम राखावा, असेही सांगण्यात आले आहे.

# जनमाध्यम

paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय

■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक १२० ■ शनिवार, २८ मार्च २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.


## हायकोर्टाचा दणका : 'प्रशासक' सरपंचांचे आर्थिक अधिकार गोठवले

### -१४ हजार ग्रामपंचायतींवर परिणाम

**सेलू जनमाध्यम :** राज्यातील मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींवर 'प्रशासक' म्हणून बसवण्यात आलेल्या सरपंच आणि समित्यांना मुंबई उच्च न्यायालयच्या औरंगाबाद खंडपीठाने जोरदार धक्का दिला आहे. एका महत्त्वपूर्ण अंतरिम आदेशातून न्यायालयाने या प्रशासक सरपंचांचे आर्थिक आणि धोरणात्मक अधिकार अक्षरशः गोठवले आहेत. त्यामुळे आता गावपातळीवर मनमानी कारभार करण्यावर लगाम बसला आहे.

फेब्रुवारी २०२६ मध्ये राज्यातील हजारो ग्रामपंचायतींची मुदत संपल्यानंतर निवडणुका रखडल्याने राज्य सरकारने २० फेब्रुवारी रोजी अधिसूचना काढत विद्यमान सरपंच, उपसरपंच आणि सदस्यांनाच प्रशासक समिती म्हणून नेमण्याचा निर्णय घेतला होता. मात्र या निर्णयाविरोधात किशोर रंगनाथ सुतार व इतरांनी दाखल केलेल्या जनहित याचिकेवर सुनावणी करताना न्यायालयाने प्रशासनावरच कठोर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

न्यायालयाने स्पष्ट शब्दांत सांगितले की, अशा प्रकारे नियुक्त केलेल्या प्रशासकांना कोणतेही मोठे आर्थिक निर्णय घेण्याचा अधिकार नाही. केवळ आवश्यक खर्च जसे की कर्मचाऱ्यांचे वेतन, वीजबिल आणि दैनंदिन कार्यालयीन बाबी यापुरतेच त्यांचे अधिकार मर्यादित राहतील. यामुळे विकासकामांच्या नावाखाली होणाऱ्या संभाव्य गैरव्यवहारांवर न्यायालयाने आळा घातल्याचे चित्र आहे.




### निविदा प्रक्रियेला ब्रेक

पेव्हर ब्लॉक बसवणे, नवीन कामांसाठी निविदा काढणे किंवा मोठ्या विकास योजनांना मंजुरी देणे या सर्व निर्णयांवर न्यायालयाने स्पष्ट बंदी घातली आहे. परिणामी प्रशासक मंडळाचे हात अक्षरशः बांधले गेले असून, त्यांना केवळ 'केअरटेकर'च्या भूमिकेतच राहावे लागणार आहे.

दरम्यान, यापूर्वी १७ फेब्रुवारीला देण्यात आलेला अंतरिम आदेश रद्द करून सरपंचांना पूर्ण अधिकार देण्याची मागणीही न्यायालयाने फेटाळून लावली. या प्रकरणाची व्याप्ती लक्षात घेता, मुंबई, कोल्हापूर आणि औरंगाबाद खंडपीठांतील सर्व याचिकांवर एकत्रित सुनावणी घेण्याचे संकेतही देण्यात आले आहेत.

या निर्णयाचा थेट परिणाम राज्यातील तब्बल १४,२३४ ग्रामपंचायतींवर होणार असून, निवडणुका होईपर्यंत गावपातळीवरील कारभार 'मर्यादित अधिकारां'मध्येच चालवावा लागणार आहे. न्यायालयाच्या या कठोर भूमिकेमुळे प्रशासनाला पारदर्शकतेची नवी चौकट मिळाली असली, तरी विकासकामांना मात्र तात्पुरता ब्रेक लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

## पत्नीची गळा आवळून हत्या करून मृतदेह नदीत फेकणारा पती गजाआड

### -न्यायालयाने दिली ७ दिवसाची पोलीस कोठडी

**सेलू । जनमाध्यम :** मानवी नात्यांचा गळा घोटणाऱ्या एका थरकाप उडवणाऱ्या घटनेचा सेलू पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. कर्तव्यावर असलेला सैनिकच पत्नीचा जीव घेईल, याची कुणालाही कल्पना नव्हती, मात्र संशय, वाद आणि संतापाच्या भरात आरोपी पतीने पत्नीची गळा आवळून निर्घृण हत्या केल्याचे उघड झाले आहे.

अक्षय देवराव चोरपगार (वय २७, रा.गोळेगाव, ता दर्यापूर, जि,अमरावती, मूळ मोर्चापूर, ता. सेलू, जि. वर्धा) हा सैन्यात कार्यरत असून रजेवर घरी आला होता. त्याची पत्नी प्रणीता (वय २५) हिच्याशी वारंवार वाद होत असल्याने ती माहेरी राहत होती. २२ मार्च रोजी आरोपी हा आपल्या चारचाकी वाहनाने पत्नी व मुलाला घेण्यासाठी मूर्तीजापूर येथे गेला. दुसऱ्या दिवशी तिघेही वाहनाने मोर्चापूरकडे निघाले.

प्रवासादरम्यान वाद विकोपाला गेला आणि संतापाच्या भरात आरोपीने केळझरजवळ पत्नीचा गळा आवळून हत्या केली. या भयंकर कृत्यानंतर त्याने पुरावे नष्ट करण्याचा थरारक कट रचला. नागपूरजवळ पत्नीचा मोबाईल फेकून दिला आणि मध्यप्रदेशातील मोरवाडा येथील नदीपात्रात मृतदेह टाकून दिला. इतकेच नव्हे तर सोनेगाव पोलीस ठाण्यात जाऊन पत्नी बेपत्ता झाल्याची खोटी तक्रार दाखल करून दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. दरम्यान, मृतक प्रणीताने आधीच धोका ओळखत बहिणीच्या मोबाईलवर लाईव्ह लोकेशन पाठवले होते. नातेवाईकांनी त्या ठिकाणी धाव घेतली असता मोबाईल आढळून आल्याने संशय बळावला.



आरोपीकडून मिळणारी उडवाउडवीची उत्तरे पाहून नातेवाईकांनी त्याला सेलू पोलिसांच्या ताब्यात दिले.

पोलिसांनी चौकशीदरम्यान आरोपीला 'खाकी'चा धाक दाखवताच संपूर्ण गुन्ह्याची कबुली समोर आली. तपासाच्या धागेदोऱ्यांवरून मध्यप्रदेशातील अमरवाडा पोलिसांशी संपर्क साधण्यात आला. तेथे मोरवाडा नदीपात्रात सापडलेल्या अज्ञात महिलेच्या मृतदेहाचा तपास जुळून आला. जमिनीत पुरलेला मृतदेह बाहेर काढून ओळख पटविण्यात आली. या प्रकरणी आरोपीविरुद्ध खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने त्याला सात दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना केवळ एक गुन्हा नसून नात्यांतील विश्वास, प्रेम आणि मानवतेवरच घाव घालणारी आहे. एका क्षणाच्या संतापाने एका कुटुंबाचे आयुष्य उद्ध्वस्त गेले, आणि समाजमन सुन्न करून गेले.

#### रुग्णालयाच्या उंबरठ्यावर ज्वाळांचा कहर

## हिंगणघाटमध्ये निष्काळजीपणाची ठिणगी; अग्निशमन दलाने टाळला मोठा अनर्थ

**हिंगणघाट जनमाध्यम :** शहरातील उपजिल्हा रुग्णालयाच्या उंबरठ्यावरच ज्वाळांनी थैमान घालत गुरुवारी सकाळी काही काळ भीतीचे सावट पसरवले. रुग्णांच्या जीवाशी खेळणाऱ्या या निष्काळजीपणामुळे संतापाची लाट उसळली असून, वेळेत अग्निशमन दल धावून आल्याने मोठा अनर्थ टळला.

सकाळी अकराच्या सुमारास रुग्णालयाशेजारी साठवून ठेवलेल्या झाडांच्या सुक्या फांद्या आणि लाकडांच्या ढिगाऱ्याला अचानक आग लागली. काही क्षणांतच आगीने विक्राळ रूप धारण करत धुराचे लोट आकाशात झेपावू लागले. रुग्णालय परिसरात उपस्थित रुग्ण, नातेवाईक आणि कर्मचारी यांच्यात एकच खळबळ उडाली.

नव्याने उभारण्यात येणाऱ्या जिल्हा रुग्णालयाच्या प्रस्तावासाठी परिसरातील झाडांची कत्तल करण्यात आली होती. मात्र, त्या झाडांचा ढिगारा तसाच टाकून देत प्रशासनाने डोळेझाक केल्याचे उघड झाले आहे. या निष्काळजीपणाची ठिणगीच अखेर आगीच्या रूपाने भडकली.



घटनेची माहिती मिळताच नगर परिषदेचे अग्निशमन दल बंबासह तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. जवानांनी आगीशी दोन हात करत पाण्याचा जोरदार मारा केला आणि काही वेळातच परिस्थिती नियंत्रणात आणली. अग्निशमन अधिकारी गौरव गाणार, सुनील डोळस, वैभव येलगंदेवार, अमित सहारे, ओम लडी आणि ईश्वर मुंजेवार यांनी धाडस आणि शिताफी दाखवत ज्वाळांना आटोक्यात आणले. दरम्यान, रुग्णालयासारख्या संवेदनशील ठिकाणी ज्वलनशील साहित्य साठवण्याच्या प्रकारामुळे प्रशासनाच्या कारभारावर संतप्त प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. अनर्थ टळला, पण जबाबदार कोण असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ही घटना म्हणजे निष्काळजीपणाचा ज्वलंत नमुना ठरली आहे.

#### 'ना खाऊंगा ना खाने दूंगा'चा फज्जा

## पीएम दौरा'मध्येच मालसुताई, अभियंत्याची खुर्ची हलली; अधिकाऱ्यांची झोप उडाली

**वर्धा जनमाध्यम :** 'ना खाऊंगा ना खाने दूंगा'चा नारा देणाऱ्या सत्तेच्या काळातच 'पीएम दौरा'मध्ये पैशांचा उघड उधळपट्टीचा खेळ रंगल्याचे धक्कादायक वास्तव समोर आले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदीं यांच्या वर्धा दौऱ्यादरम्यान करण्यात आलेल्या कामांत कोट्यवधी रुपयांचा घोटाळा झाल्याची बाब उघड होताच प्रशासनाने घाईघाईने हालचाल करत संबंधित वादग्रस्त शाखा अभियंत्याची खुर्ची हलवली. मात्र, या कारवाईमुळे आता संपूर्ण विभागातील अधिकाऱ्यांची झोप उडाली आहे.

वर्ध्यातील एका खाजगी संस्थेच्या जागेवर 'पीएम टूर'च्या नावाखाली मुरूम टाकणे, डांबरीकरण करणे अशी कामे करण्यात आली. सरकारी निधीचा वापर करून खासगी जागेवर केलेल्या या कामांमुळे मोठ्या प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा आरोप जोर धरू लागला. सार्वजनिक पैशातून खासगी फायद्याचा मार्ग मोकळा केला का असा प्रश्न आता नागरिक उपस्थित करत आहेत.



तक्रारीनंतर अधिकाऱ्यांनी घटनास्थळी पाहणी केली असता कागदोपत्री खर्च आणि प्रत्यक्ष काम यात मोठी तफावत असल्याचे प्राथमिक तपासात समोर आले. यानंतर कारवाईचा पहिला बडगा उगारत सेलू येथील शाखा अभियंता एस. एस. खंडार यांच्याकडील अतिरिक्त कार्यभार काढण्यात आला. कार्यकारी अभियंता एकनाथ टिकले यांनी हा आदेश काढत जबाबदारीची साखळी हलवली.

मात्र, ही केवळ वरवरची कारवाई असल्याची चर्चा रंगू लागली आहे. खरे मास्टरमाइंड अजूनही सुरक्षित आहेत का असा प्रश्न जनतेतून उपस्थित होत आहे. कारण, एवढ्या मोठ्या प्रमाणावर निधी खर्च होत असताना केवळ एकाच अधिकाऱ्याला जबाबदार धरणे कितपत योग्य, यावरही प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

दरम्यान, या प्रकरणाने बांधकाम विभागात धडकी भरली असून, पुढील चौकशीत आणखी मोठे खुलासे होण्याची शक्यता आहे. 'पीएम टूर'च्या नावाखाली झालेल्या या कथित घोटाळ्याचा शेवट कुठे होतो, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

## शेतीच्या वादातून थोरल्या भावास मारहाण; दोघांविरुद्ध गुन्हा

**सिंदी (रेल्वे) जनमाध्यम :** शेतीच्या वादातून लहान भावाने थोरल्या भावास बेदम मारहाण केल्याची घटना सिंदीरेल्वे येथे घडली. अशोक कलोडे (७८) हे गावात राहून वडिलोपार्जित शेती करत होते. त्यांची पत्नी व मुलगा पुण्यात वास्तव्यास असून ते एकटेच गावात राहत होते. दरम्यान, लहान भाऊ प्रभाकर कलोडे याच्याशी शेतीच्या कारणावरून त्यांचे संबंध ताणले गेले होते.



गुरुवारी अशोक कलोडे घरी असताना प्रभाकर कलोडे व त्याचा मुलगा चंद्रकांत हे दोघेही मद्यधुंद अवस्थेत तेथे आले. शेतीच्या कारणावरून वाद उफाळला आणि दोघांनी मिळून अशोक कलोडे यांना बेदम मारहाण केली. या मारहाणीत ते जखमी झाले. परिसरातील नागरिकांनी त्यांना मदत केली. तक्रारीवरून सिंदी पोलिसांनी प्रभाकर व चंद्रकांत यांच्याविरुद्ध गुन्हा नोंद करून तपास सुरू केला आहे.

## खाजगी इंधन कंपन्यांचा दरवाढीचा झटका

### नायरा एनर्जीकडून पेट्रोल ५, डिझेल ३ रुपयांनी महाग

**सेलू जनमाध्यम :** खाजगी इंधन क्षेत्रातून पुन्हा एकदा दरवाढीचा झटका बसला असून, नायरा एनर्जीने पेट्रोल व डिझेलच्या किमतीत वाढ केली आहे. या निर्णयामुळे सर्वसामान्य वाहनधारकांच्या खिशाला फटका बसणार आहे.

नवीन दरानुसार पेट्रोल प्रति लिटर ५ रुपयांनी, तर डिझेल ३ रुपयांनी महाग झाले आहे. ही दरवाढ सेलूसह देशभरातील नायराच्या सर्व पेट्रोल पंपांवर लागू करण्यात आली आहे. त्यामुळे सरकारी तेल कंपन्यांच्या तुलनेत खाजगी पंपांवर इंधन महाग मिळत असल्याचे चित्र आहे.



दरवाढीमागे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली वाढ आणि मध्यपूर्वेतील तणावपूर्ण परिस्थिती हे प्रमुख कारण असल्याचे कंपनीकडून सांगण्यात आले. कच्च्या तेलाच्या किमतीने १०० डॉलर्स प्रति बॅरलचा टप्पा ओलांडल्याने इंधन दरावर दबाव निर्माण झाला आहे.

दरम्यान, कंपनीच्या रिफायनरीमध्ये मे महिन्यात नियोजित देखभाल दुरुस्तीमुळे सुमारे ३५ दिवसांचा 'शटडाऊन' राहणार आहे. या काळात पुरवठ्यावर परिणाम होऊ नये यासाठी इंधनाचा साठा उपलब्ध असल्याचा दावा कंपनीने केकंपनीने खाजगी कंपन्यांनी दरवाढ केल्यामुळे आता सरकारी तेल कंपन्यांकडूनही दरवाढीचा निर्णय होण्याची शक्यता वर्तवली जात असून, नागरिकांचे लक्ष त्या निर्णयाकडे लागले आहे.

#### तोट्याच्या रुळावर धावणारी 'निवडणूक स्पेशल

## वर्धा-कळंब गाडीचा फज्जा; रखडलेल्या रेल्वेमार्गावरून खासदारांचा सरकारवर हल्लाबोल

**वर्धा जनमाध्यम :** जनमाध्यमने उघड केलेल्या वर्धा-कळंब पॅसेंजर तोट्याच्या रुळावर या धक्कादायक वास्तवाने अखेर राजकीय वर्तुळात खळबळ उडवली असून वर्धा लोकसभा मतदारसंघाचे खासदार अमर काळे यांनी थेट केंद्र सरकारला धारेवर धरत रेल्वे मंत्रालयाकडे या प्रकाराची सविस्तर चौकशी मागितली आहे. निवडणुकीच्या तोंडावर गाजावाजा करत सुरू केलेली ही गाडी प्रत्यक्षात तोट्याचा डोंगर वाढवत असल्याचे स्पष्ट होताच ही जनतेची सेवा की दिखावा असा प्रश्न खासदारांनी उपस्थित केला आहे.



वर्धा-यवतमाळ-नांदेड हा अत्यंत महत्त्वाचा रेल्वेमार्ग तब्बल १७ वर्षांपासून रखडलेला असताना केवळ कळंबपर्यंत गाडी चालवून केंद्र सरकारने जनतेची दिशाभूल केल्याचा गंभीर आरोप काळे यांनी केला आहे. सन २००९ मध्ये मंजूर झालेल्या या प्रकल्पाचे आजवर केवळ ५५ किलोमीटर काम पूर्ण झाले आहे. उर्वरित मार्गासाठी निधीचा तुटवडा आणि केंद्राची उदासीनता यामुळे विदर्भ व मराठवाड्याच्या जनतेला आजही रेल्वे सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे. दरम्यान, वर्धा ते कळंब या अपुऱ्या मार्गावर सुरू करण्यात आलेल्या गाडीची परिस्थिती तर अधिकच धक्कादायक आहे. या गाडीत प्रवाशांची संख्या हातावर मोजण्याइतकी केवळ चार इतकी नगण्य असताना गाडी चालवली जात आहे. याहून गंभीर बाब म्हणजे गाडी कळंबला पोहोचल्यावर कर्मचारी वर्गाला खाजगी वाहनाने वर्ध्याला परत आणले जाते आणि दुसऱ्या दिवशी पुन्हा त्याच पद्धतीने नेले जाते. यासाठी रेल्वे विभागाकडून स्वतंत्र वाहन भाड्याने घेण्यात येत असल्याने खर्चाचा बोजा आणखी वाढत आहे. म्हणजेच, जनतेच्या पैशातून रिकामी गाडी आणि भरलेले बिल असा प्रकार सुरू असल्याची टीका संतप्त नागरिकांकडून केली जात आहे.

या सर्व प्रकारामुळे संतापलेल्या खासदार अमर काळे यांनी केंद्रीय रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांना पत्र पाठवून ही संपूर्ण वस्तुस्थिती त्यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. कळंबपासून पुढे यवतमाळ आणि नांदेडपर्यंतचा रेल्वेमार्ग तातडीने पूर्ण करा, अन्यथा हा प्रकल्प कायमचा तोट्याचा ठरेल, असा इशाराच त्यांनी दिला आहे.

काळे यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले की, हा मार्ग पूर्ण झाल्यास वर्धा ते नांदेड अशी थेट जोडणी निर्माण होईल आणि मराठवाड्यातील प्रवाशांना मोठा दिलासा मिळेल. त्यावेळीच या गाडीला खऱ्या अर्थाने प्रवासी मिळतील आणि तोटा थांबेल. मात्र सध्याच्या परिस्थितीत ही गाडी म्हणजे केवळ निवडणूकपूर्व दिखाव्याचा डाव असल्याची भावना जनतेत प्रबळ होत आहे.

## सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, सर्वसमावेशक तंत्रज्ञानाधारित करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### -पल्स परिषद आरोग्य धोरण, तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण उपक्रम एकत्र आणणारे महत्त्वाचे व्यासपीठ

**मुंबई जनमाध्यम :** राज्यातील सार्वजनिक आरोग्य व्यवस्था अधिक सक्षम, सर्वसमावेशक आणि तंत्रज्ञानाधारित करण्यासाठी शासन कटिबद्ध असून, आधुनिक उपाययोजनांच्या माध्यमातून नागरिकांना दर्जेदार व परवडणाऱ्या आरोग्यसेवा देण्याचा निर्धार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केले. वांद्रे-कुर्ला संकुलातील जिओ वर्ल्ड सेंटर येथे आयोजित 'पल्स वैद्यकीय परिषद २०२६' मध्ये ते बोलत होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, दुर्धर आजारांचे लवकर निदान, कमी खर्चात उपचार आणि प्रत्येक नागरिकाला ८ ते १० किलोमीटरच्या परिसरात आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), डिजिटल हेल्थ आणि टेलिमेडिसिनच्या सहाय्याने आरोग्य सेवा अधिक परिणामकारक बनविण्यावर भर देण्यात येत आहे. जिल्हा व तालुका रुग्णालयांसह महापालिका रुग्णालयांचे बळकटीकरणही प्राधान्याने सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले की, डिजिटल आरोग्य व्यवस्थेमुळे ग्रामीण-शहरी दरी कमी होईल. महाराष्ट्र वैद्यकीय पर्यटनाचे महत्त्वाचे केंद्र बनत असून, अत्याधुनिक तंत्रज्ञानामुळे राज्य जागतिक स्तरावर आपली ओळख निर्माण करत आहे.

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी आरोग्य क्षेत्र उपचारकेंद्रित पद्धतीकडून प्रतिबंधात्मक दृष्टिकोनाकडे वळत असल्याचे नमूद केले. पदवी व पदव्युत्तर वैद्यकीय शिक्षणाच्या जागा मोठ्या प्रमाणात वाढविण्यात येणार असून, भविष्यातील आव्हानांना तोंड देणारे कुशल डॉक्टर घडविण्यावर भर दिला जाणार आहे.

राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी 'पल्स २०२६' ही परिषद आरोग्य क्षेत्रातील परिवर्तनाचा रोडमॅप असल्याचे सांगितले. रोबोटिक सर्जरी, एआय तंत्रज्ञान आणि आयुष-?लोपॅथी समन्वयातून उपचारात आमूलाग्र बदल घडविण्याचा शासनाचा मानस असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, सचिव आणि तज्ज्ञांनीही आरोग्य क्षेत्रातील धोरणात्मक बदल, डिजिटल प्रणालींचे बळकटीकरण आणि गुंतवणूक वाढविण्याच्या दृष्टीने ही परिषद महत्त्वाची ठरणार असल्याचे मत व्यक्त केले. दोन दिवसीय या परिषदेत विविध सत्रे, गटचर्चा, संशोधन सादरीकरणे आणि सामंजस्य करारांद्वारे आरोग्य क्षेत्राला नवी दिशा मिळणार असून, महाराष्ट्राला आरोग्य क्षेत्रात अग्रस्थानावर नेण्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## ऑटो प्रवासात महिलेला लुटले; ७२ हजारांचा ऐवज लंपास

**वर्धा जनमाध्यम :** ऑटोने प्रवास करताना महिलेच्या पर्समधून सोन्या-नगदीसह ७२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केल्याची घटना वर्धा शहरात घडली. अनिता गावंडे (५०), रा. वडगाव या बहिणीकडे कार्यक्रमासाठी वर्धा येथे आल्या होत्या. कार्यक्रमानंतर त्या परत गावी जाण्यासाठी आर्वी नाका येथून बसस्थानकाकडे ऑटोने निघाल्या.

दरम्यान, त्याच ऑटोत दोन अनोळखी महिला बसल्या होत्या. प्रवासादरम्यान त्यांनी संधी साधत गावंडे यांच्या पर्समधील सोन्याची पोत, अंगठी व रोख रक्कम असा एकूण ७२ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेला. बसस्थानकावर पोहोचल्यानंतर प्रकार उघडकीस आला. याप्रकरणी शहर पोलिसांत तक्रार देण्यात आली असून गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पोलिसांनी संशयित महिलांचा शोध सुरू केला आहे.

# केंद्र सरकारकडून पेट्रोल-डिझेलवरील उत्पादन शुल्क प्रति लिटर 10 रुपयांची कपात

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षामुळे निर्माण झालेल्या उर्जा संकटाच्या पार्श्वभूमीवर केंद्र सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. वित्त मंत्रालयाने २६ मार्च रोजी जारी केलेल्या अधिसूचनेनुसार पेट्रोल आणि डिझेलवरील प्रति लिटर १० रुपयांची उत्पादन शुल्क (एक्साइज ड्युटी) कपात करण्याचा निर्णय घेतला आहे.या निर्णयानंतर पेट्रोलवरील उत्पादन शुल्क, जे आधी १३ रुपये प्रति लिटर होते, ते आता कमी होउन ३ रुपये प्रति लिटर झाले आहे. तर डिझेलवरील उत्पादन शुल्क, जे आधी १० रुपये होते, ते पूर्णपणे शून्यावर आणण्यात आले आहे.



पश्चिम आशियातील युद्धामुळे जागतिक स्तरावर कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे अडचणीत आलेल्या तेल विपणन कंपन्या एचपीसीएल, बीपीसीएल आणि आयओसी यांना दिलासा देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे. मंत्रालयाने सांगितले की ही कपात तात्काळ प्रभावाने लागू करण्यात आली आहे. पश्चिम आशियातील संघर्षामुळे आंतरराष्ट्रीय तेल किमतींमध्ये सुमारे ५० टक्क्यांची वाढ झाली आहे. मात्र या संकटाच्या काळातही सरकारने देशांतर्गत पेट्रोल-डिझेलचे दर स्थिर ठेवले असल्याने इंधन विपणन कंपन्यांवर आर्थिक दबाव वाढला होता. रेटिंग एजन्सी आयसीआरएने गुरुवारी जारी केलेल्या अहवालात म्हटले आहे की, कच्च्या तेलाची सरासरी किंमत प्रति बॅरल १०० ते १०५ डालरदरम्यान राहिल्यास तेल कंपन्यांना पेट्रोलवर प्रति लिटर सुमारे ११ रुपये आणि डिझेलवर १४ रुपयेपर्यंत तोटा सहन करावा लागू शकतो.या महिन्याच्या सुरुवातीला आंतरराष्ट्रीय तेलाच्या किमती प्रति बॅरल ११९ डालरपर्यंत पोहोचल्या होत्या, ज्या नंतर कमी होउन सुमारे १०० डालरपर्यंत आल्या. सध्या दिल्लीमध्ये पेट्रोलची किंमत ९४.७७ रुपये प्रति लिटर तर डिझेल ८७.६७ रुपये प्रति लिटर या दरावर स्थिर आहे. भारत आपल्या एकूण कच्च्या तेलाच्या गरजेपैकी सुमारे ८८ टक्के आणि नैसर्गिक वायूच्या जवळपास निम्म्या गरजा आयातीद्वारे भागवतो. यातील मोठा पुरवठा होर्मुज सामुद्रधुनीमार्गे येतो. संघर्ष तीव्र झाल्यानंतर इराणने ही सामुद्रधुनी बंद केल्याने तेलवाहू टँकरची वाहतूक जवळपास ठप्प झाली आहे.

दरम्यान, देशातील १,०२,०७५ पेट्रोल पंपांपैकी ६,९६७ पंप चालवणा-या नायरा एनर्जीने वाढलेल्या खर्चाचा काही भाग ग्राहकांवर टाकण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांच्या पंपांवर पेट्रोलची किंमत १००.७१ रुपये प्रति लिटर आणि डिझेलची किंमत ९१.३१ रुपये प्रति लिटर झाली आहे. दुसरीकडे, रिलायन्स इंडस्ट्रीज आणि बीपी यांच्या संयुक्त इंधन रिटेल कंपनी जिओ-बीपीकडे २,१८५ आउट्लेट्स असून मोठा तोटा सहन करूनही त्यांनी अद्याप दरवाढ केलेली नाही. सरकारी तेल कंपन्या, ज्या बाजारातील सुमारे ९० टक्के हिस्सा नियंत्रित करतात, त्यांनी सध्या इंधन दर स्थिर ठेवले आहेत.

पेट्रोल आणि डिझेलवर लावले जाणारे उत्पादन शुल्क (एक्साइज ड्युटी) हा केंद्र सरकारकडून आकारला जाणारा कर आहे. या कराचा मुख्य उद्देश महसूल गोळा करणे हा असून तो देशाचा विकास, पायाभूत सुविधा, संरक्षण व्यवस्था आणि विविध कल्याणकारी योजनांसाठी वापरला जातो.

# नेपाळमध्ये बलेंद्र शाह यांनी घेतली पंतप्रधानपदाची शपथ

**काठमांडू /वृत्तसंस्था :** भारताचा शेजारी देश नेपाळमध्ये आजपासून नव्या युगाची सुरुवात झाली आहे. राष्ट्रीय स्वतंत्र पार्टीचे नेते बालेन्द्र शाह यांची आज नेपाळचे नवे पंतप्रधान म्हणून नियुक्ती करण्यात आली. त्यानंतर बालेन्द्र शाह यांनी पंतप्रधानपदाची शपथ घेतली. ते नेपाळचे ४७वे पंतप्रधान ठरले आहेत. नेपाळी माध्यमांच्या वृत्तानुसार, राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी बालेन्द्र शाह यांची पंतप्रधानपदी नियुक्ती केली.



राष्ट्रपती कार्यालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, राष्ट्रपती रामचंद्र पौडेल यांनी शुक्रवारी काठमांडू महानगरपालिकेचे माजी महापौर बालेन्द्र शाह यांची संविधानाच्या कलम ७६(१) अंतर्गत पंतप्रधानपदी नियुक्ती केली. गुरुवारी आरएसपीने शाह यांची संसदीय पक्षनेते म्हणून निवड केली होती, त्यामुळे त्यांच्या ४७वे पंतप्रधान होण्याचा मार्ग मोकळा झाला. अलीकडील संसदीय निवडणुकांमध्ये आरएसपीला जवळपास दोन-तृतीयांश बहुमतासह मोठा विजय मिळाला होता.

बालेन्द्र शाह यांनी शुक्रवारी दुपारी १२:३४ वाजता राष्ट्रपती भवनात आयोजित भव्य समारंभात पंतप्रधानपदाची शपथ घेतली. पद आणि गोपनीयतेची शपथ हिंदू परंपरेनुसार पार पडली. या प्रसंगी सात शंखवादकांनी शंखनाद करून मंगलमय सुरुवात केली. परंपरेनुसार, कोणत्याही शुभ कार्याच्या प्रारंभी शंखनादाला यश आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानले जाते. शाह यांनी पूर्व नेपाळातील झापा-५ मतदारसंघात माजी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली यांचा ४९,६१४ मतांच्या मोठ्या फरकाने पराभव केला. शाह यांना ६८,३४८ मते मिळाली, तर ओली यांना १८,७३४ मते मिळाली. १९९१ नंतरच्या नेपाळच्या संसदीय निवडणुकांमध्ये कोणत्याही उमेदवाराला मिळालेल्या मतांपैकी हे सर्वाधिक मत असल्याचे मानले जाते.

बालेन्द्र शाह यांनी २०२२ मध्ये राजकारणात प्रवेश केला, जेव्हा त्यांनी काठमांडूच्या महापौरपदाची निवडणूक अपक्ष उमेदवार म्हणून लढवून विजय मिळवला. २७ एप्रिल १९९० रोजी काठमांडू येथे मधेसी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. भारतातील विश्वेश्वारैया टेक्नोलाजिकल युनिव्हर्सिटीमधून स्ट्रक्चरल इंजिनिअरिंगमध्ये मास्टर्स पदवी घेण्यापूर्वी त्यांनी काठमांडूमध्ये पदवी शिक्षण पूर्ण केले. अभियांत्रिकी पार्श्वभूमीमुळे त्यांना पायाभूत सुविधा, शहरी विकास आणि सार्वजनिक कामकाजाची व्यावहारिक समज मिळाली. ही तांत्रिक कौशल्ये काठमांडू महानगरपालिकेचे महापौर म्हणून त्यांच्या कार्यशैलीत आणि प्रशासनात महत्त्वाची ठरली.

# ज्वारीचे क्षेत्र घटले; गरिबांची भाकरी महागणार

**वर्धा/प्रतिनिधी :**बीड परिसरात एकेकाळी 'रब्बीचे कोठार' म्हणून ओळखल्या जाणा-या ज्वारीच्या पिकात मोठी घट झाली आहे.वाढता उत्पादन खर्च, मजुरांची टंचाई आणि हवामानातील बदल यांमुळे शेतकरी ज्वारी ऐवजी बागायती पिकांकडे वळला आहे. परिणामी, मागील चार वर्षांत तब्बल १ हजार ५० हेक्टरवरीलज्वारीचे क्षेत्र घटले असून, भविष्यात गरिबांची भाकरी महागण्याचे चित्र दिसत आहे. सन २०२० पासून पाण्याची उपलब्धता वाढल्याने शेतक-यांनी फळबागा, पालेभाज्या आणि उस लागवडीला पसंती दिली आहे. जनावरांच्या चा-यासाठी ज्वारी ऐवजी मक्याचे उत्पादन घेतले जात आहे. कृषी विभागाच्या माहितीनुसार, पिंपळनेर परिसरात सध्या विविध पिकांची लागवड झाली असून, त्यात ज्वारीचे प्रमाण अत्यंत निरुत्साहजनक आहे. सध्या बाजारात ज्वारीचा किरकोळ दर ४० ते ४५ रुपये प्रतिकिलो आहे. सिंचन सुविधांमुळे नगदी पिकांकडे वाढलेला ओढा आणि घटते कोरडवाहू क्षेत्र यामुळे ज्वारीची खळी आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहेत, अशी खंत शेतक-यांनी व्यक्त केली आहे.जात नसल्याचे स्पष्ट केले आहे.




# मोदींनी दिल्या बालेन्द्र शाह यांना शपथविधीनिमित्त शुभेच्छा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी नेपाळचे नवे पंतप्रधान बालेन्द्र शाह उर्फ बालेन यांना शपथविधीनिमित्त शुभेच्छा दिल्या. भारत-नेपाळ संबंध परस्पर हितासाठी अधिक मजबूत करण्यासाठी त्यांच्या सोबत काम करण्यास आपण उत्सुक असल्याचे त्यांनी म्हटले आहे. पंतप्रधान मोदी यांनी एक्स वर संदेश देत म्हटले, नेपाळचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतल्याबद्दल श्री बालेन्द्र शाह यांचे मनः पूर्वक अभिनंदन. आपल्या नेतृत्वावर नेपाळच्या जनतेने व्यक्त केलेल्या विश्वासाचे हे प्रतीक आहे. आपल्या दोन्ही देशांच्या जनतेच्या परस्पर हितासाठी भारत-नेपाळ मैत्री आणि सहकार्य अधिक उंचीवर नेण्यासाठी आपल्यासोबत काम करण्यास मी उत्सुक आहे. ३५ वर्षीय राष्ट्रीय स्वतंत्र पक्षाचे नेते बालेन शाह यांनी नेपाळचे सर्वात युवा पंतप्रधान म्हणून शपथ घेतली. या पदावर विराजमान होणारे ते देशातील आतापर्यंतचे सर्वात तरुण नेते ठरले आहेत. तसेच मधेश प्रदेशातून सर्वोच्च कार्यकारी पद भूषवणारे ते पहिले व्यक्ती आहेत. त्यांचा शपथविधी नेपाळच्या राजकारणातील महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. के. पी. शर्मा ओली यांच्या नेतृत्वाखालील सरकार कोसळल्यानंतर सुमारे सहा महिन्यांनी हा राजकीय बदल घडून आला. युवा पिढीच्या आंदोलनानंतर ओली सरकार सत्तेतून बाहेर पडले होते.



# टी20 वर्ल्डकप तिकीट काळाबाजारप्रकरणी माजी क्रिकेटपटूसह 6 जणांना अटक

**मुंबई, २७ मार्च (हिं.स.)।**आयपीएल २०२६ चा शुभारंभ शनिवार, २८ मार्च रोजी आरसीबी विरुद्ध एसआरएच या सामन्याने होणार आहे. हा सामना एम. चिन्नास्वामी स्टेडियममध्ये संध्याकाळी ७:३० वाजता सुरू होईल. विराट कोहली बर्याच दिवसांनंतर पुन्हा क्रिकेटच्या मैदानावर दिसणार असल्याने या सामन्याच्या ऑनलाइन तिकिटांची विक्री सुरू होताच ती काही वेळातच संपली.दरम्यान, तिकिटांची काळाबाजार करणा-यांना पोलिसांनी अटक केली आहे. मात्र हा प्रकार आयपीएलशी संबंधित नसून टी२० वर्ल्ड कपशी संबंधित असल्याचे समोर आले आहे.तिकिटांच्या काळाबाजार प्रकरणात मुंबई पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. यावर्षी भारत आणि श्रीलंका येथे टी२० वर्ल्ड कपचे आयोजन करण्यात आले होते, ज्यामध्ये भारताने विजेतेपद पटकावले. या स्पर्धेतील दुस-या उपांत्य सामन्यात भारत आणि इंग्लंड यांच्यात सामना झाला होता. ५ मार्च रोजी मुंबईतील वानखेडे स्टेडियमवर झालेल्या या सामन्याच्या तिकिटांची काळाबाजार करणा-या रॅकेटचा पर्दाफाश करत पोलिसांनी एका प्रशिक्षकासह एका माजी क्रिकेटपटूला अटक केली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, पोलिसांनी २६ वर्षीय बलवंत सिंह सोधा याला अटक केली असून तो यापूर्वी मुंबई अंडर-१९ संघाकडून खेळला होता. पोलिसांच्या माहितीनुसार, या नेटवर्कमध्ये बलवंत सिंहची महत्त्वाची भूमिका होती आणि तिकिटांची व्यवस्था तोच करत होता. त्यानंतर तो आपल्या साथीदारांना ही तिकिटे जास्त दराने विकण्यासाठी पुरवत होता. रिपोर्टनुसार, उपांत्य सामन्याची तिकिटे २५ ते ३५ हजार रुपयांना विकली गेली. आतापर्यंत या प्रकरणात एकूण ६ जणांना अटक करण्यात आली असून त्यामध्ये एका महाविद्यालयातील क्रीडा शिक्षकासह एका नान-टीचिंग स्टाफ सदस्याचाही समावेश आहे.माध्यमांच्या वृत्तानुसार, मुंबई क्रिकेट असोसिएशनशी संबंधित व्यक्तींना किंवा पाहुण्यांना दिले जाणारे पास आरोपींनी मिळवून त्यांची विक्री सुरू केली असावी. काही तिकिटे थेट लोकांना तर काही ऑनलाइन माध्यमातून विकण्यात आली.



# अमेरिका-इराण तणावः ट्रम्प यांनी हल्ल्याची मुदत 6 एप्रिलपर्यंत वाढवली

**वॉशिंग्टन/वृत्तसंस्था :** अमेरिका आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर मोठी राजनैतिक हालचाल पाहायला मिळत आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इराणच्या उर्जा केंद्रांवर हल्ला करण्यासाठी दिलेली अंतिम मुदत वाढवून ती आता ६ एप्रिल २०२६ पर्यंत केली आहे. दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू असताना आणि वातावरण अत्यंत संवेदनशील असताना हा निर्णय घेण्यात आला आहे. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांनी स्पष्ट केले की हा निर्णय इराणच्या विनंतीवरून घेण्यात आला असून चर्चा सकारात्मक दिशेने सुरू आहे. त्यांनी आपल्या सोशल मीडिया प्लॅटफ ?र्मवर लिहिले की माध्यमांमध्ये येणा-या नकारात्मक बातम्या चुकीच्या आहेत आणि प्रत्यक्षात वाटाघाटी योग्य मार्गावर आहेत.यापूर्वी त्यांनी इराणला ४८ तासांचा अल्टिमेटम देत होर्मुज सामुद्रधुनी तेलवाहू जहाजांसाठी खुली करण्याची मागणी केली होती, अन्यथा कठोर हल्ल्याचा इशारा दिला होता. मात्र आता ही मुदत दोन वेळा वाढवण्यात आल्याने अमेरिका लष्करी कारवाईपूर्वी चर्चेला संधी देण्याच्या भूमिकेत असल्याचे स्पष्ट होत आहे.दुस-या बाजूला, इराणनेही चर्चेत आपली अटी मांडल्या आहेत. इराणी माध्यमांच्या माहितीनुसार, इराणने अमेरिकेला प्रथम अमेरिका आणि इस्रायलने त्याच्यावर तसेच त्याच्या सहयोगी संघटनांवर होत असलेले हल्ले थांबवण्याची मागणी केली आहे. याशिवाय युद्धामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई आणि होर्मुज सामुद्रधुनीवरील आपल्या सार्वभौमत्वाची मान्यता देण्याची अटही इराणने ठेवली आहे. या अटी कठोर मानल्या जात असून त्या अमेरिकेच्या प्रस्तावापेक्षा अधिक पुढे असल्याचे मानले जाते.दरम्यान, अमेरिकेचे दूत स्टीव विटकाफ यांनी सांगितले की इराणसोबत चर्चेसाठी १५ मुद्द्यांची योजना पाकिस्तानमार्फत पाठवण्यात आली असून काही सकारात्मक संकेत मिळत आहेत. मात्र दोन्ही देशांमध्ये विश्वासाचा अभाव अजूनही स्पष्टपणे दिसून येत आहे. ट्रम्प यांनी एका बाजूला चर्चेचा मार्ग खुला ठेवला असला तरी दुस-या बाजूला कठोर भूमिका कायम ठेवली आहे. त्यांनी इशारा दिला की करार झाला नाही तर इराण पूर्णपणे उद्ध्वस्त केला जाईल. तसेच अमेरिका इराणच्या तेल संसाधनांवर नियंत्रण मिळवू शकते, जसे पूर्वी व्हेनेझुएलामध्ये केले होते, असेही त्यांनी म्हटले. यावरून अमेरिका दबावाची रणनीतीही एकाचवेळी वापरत असल्याचे स्पष्ट होते.दरम्यान, इस्रायलमध्येही या युद्धाबाबत चिंता वाढताना दिसत आहे. विरोधी पक्षनेते यायर लॅपिड यांनी सरकारवर आरोप करत म्हटले की सैन्यावर गरजेपेक्षा अधिक दबाव टाकला जात असून ठोस रणनीतीशिवाय अनेक आघाड्यांवर लढाई सुरू आहे. त्यांनी इशारा दिला की सैन्याकडे पुरेसे सैनिक नसून परिस्थिती धोकादायक बनू शकते. जमिनीवरील परिस्थिती अजूनही अत्यंत तणावपूर्ण आहे. इराणवर सतत हवाई हल्ले होत असून त्यात रिव्होल्युशनरी गार्डच्या नौदलाचे वरिष्ठ कमांडर अलीरेजा तंगसीरी ठार झाल्याची माहिती आहे. तसेच इराणमधील अनेक शहरांमध्ये स्फोट आणि हल्ल्यांच्या घटना सुरू आहेत. दुसरीकडे, इराणही प्रत्युत्तरादाखल आखाती देशांवर क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ले करत असून त्यामुळे संपूर्ण प्रदेशात भीती आणि अस्थिरता वाढली आहे.



# भाजप-काँग्रेस आमदारांमध्ये हाणामारी

## जम्मू-काश्मीर विधानसभेतील घटना

**श्रीनगर/वृत्तसंस्था :** जम्मू-काश्मीर विधानसभेत शुक्रवारी इराणचे माजी सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी यांच्या निधनावरून निदर्शने झाली. नॅशनल कान्फरन्सचे नेते खामेनी यांचा फोटो घेउन सभागृहात पोहोचले आणि त्यांच्या समर्थनार्थ घोषणाबाजी केली. नॅशनल कान्फरन्सच्या नेत्यांनी खामेनी यांचे पोस्टरही फडकवले. दरम्यान, सभागृहात काँग्रेस आणि भाजप नेत्यांमध्ये धक्काबुक्की झाल्याचा व्हीडीओही समोर आला. तथापि, हा वाद भाजप नेत्यांनी राहुल गांधींवर केलेल्या टिप्पणीवरून झाला होता. प्रत्युत्तरादाखल भाजप आमदार युद्धवीर सेठी म्हणाले, राहुल गांधी पप्पू आहेत. यानंतर दोन्ही नेत्यांमध्ये हाणामारी सुरू झाली. तर, इराण युद्धावर मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला म्हणाले इराणवर हे युद्ध लादले गेले. मानवतेची हत्या झाली आहे. नॅशनल कान्फरन्सचे आमदार तन्वीर सादिक म्हणाले, आम्ही इराणसोबत उभे आहोत. आमचा पक्ष आणि जम्मू-काश्मीर सरकार त्यांच्यासोबत उभे आहे. जसे मुख्यमंत्री ओमर अब्दुल्ला यांनी मागील वेळी नागरी समाजात अयातुल्ला अली खामेनी यांच्या हत्येचा निषेध केला होता. त्याचप्रमाणे, आज आम्ही सर्वजण येथे उभे आहोत. आम्ही समजतो की ज्या पद्धतीने खामेनी यांना मारण्यात आले, कोणत्याही देशाला दुस-या देशावर हल्ला करण्याचा कोणताही हक्क नाही. मला वाटते की, देशाच्या सर्वोच्च नेतृत्वाने याचा निषेध केला पाहिजे. आम्ही इराणच्या लोकांना पाठिंबा देत आहोत.



# भारतीय रूपया प्रति डॉलर 94.7 च्या विक्रमी नीचांकी पातळीवर

**मुंबई, २७ मार्च (हिं.स.)।** भारतीय रुपया शुक्रवारी अमेरिकन डॉलरच्या तुलनेत इतिहासातील सर्वात नीचांकी पातळीवर घसरला असून पहिल्यांदाच ९४.७ चा टप्पा ओलांडला आहे. मध्यपूर्वेत सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे आणि उर्जा पुरवठा साखळीतील अडथळ्यांमुळे जागतिक बाजारपेठेत अनिश्चितता निर्माण झाली आहे. ज्याचा थेट परिणाम भारतीय चलनावर झाला आहे. गेल्या एका महिन्यात रुपयात सुमारे ४ टक्क्यांची घसरण झाली असून आर्थिक वर्ष २०२५-२६ मध्ये आतापर्यंत तो १० टक्क्यांहून अधिक कमकुवत झाला आहे. तज्ज्ञांच्या मते, कच्च्या तेलाच्या किमतींमध्ये सातत्याने वाढ होत राहिल्यास रुपया आणखी घसरून ९८ प्रति डॉलरच्या पातळीपर्यंत जाउ शकतो.

चलन बाजारातील जाणकारांचे म्हणणे आहे की मध्यपूर्वेतील वाढता तणाव गुंतवणूकदारांसाठी धोक्याचा इशारा ठरत आहे. त्यामुळे अनेक परदेशी गुंतवणूकदार उद्धयोन्मुख अर्थव्यवस्थांमधून पैसे काढून सुरक्षित पर्यायांकडे वळत आहेत. डॉलर आणि सोने यांसारख्या सुरक्षित गुंतवणुकीकडे वाढलेला कल हा रुपयाच्या घसरणीमागील महत्त्वाचा घटक मानला जात आहे. भारताच्या आर्थिक वर्षाच्या दृष्टीने पाहता, एका दशकाहून अधिक काळानंतर इतकी मोठी घसरण प्रथमच दिसून येत आहे. यापूर्वी २०११-१२ मध्ये युरोझोन संकटाच्या काळात रुपयात सुमारे १४ टक्क्यांची घट झाली होती. मात्र सध्याची परिस्थिती पुन्हा त्याच दिशेने जात असल्याची भीती व्यक्त केली जात आहे.



डॉलर मजबूत झाल्याचा थेट परिणाम भारतातील महागाईवर होत आहे. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींमुळे देशाचे आयात बिल वाढत आहे, ज्यामुळे पेट्रोल-डिझेलसह अनेक आवश्यक वस्तूंच्या किमती वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. एलपीजी, प्लास्टिक आणि इतर पेट्रोकेमिकल उत्पादनांवरही त्याचा परिणाम होत असून सर्वसामान्य नागरिकांच्या खर्चात वाढ होण्याची चिन्हे दिसत आहेत. महागाई वाढल्यास ग्राहकांच्या खरेदी क्षमतेवर परिणाम होउन अर्थव्यवस्थेच्या वाढीवरही दबाव येउ शकतो. दरम्यान, ब्रेंट क्रूडचे दर किरकोळ घसरणीनंतरही सुमारे १०७.४ डॉलर ते ११०.४४ डॉलर प्रति बॅरल इतक्या उच्च स्तरावर टिकून आहेत. भारत हा मोठ्या प्रमाणावर कच्चे तेल आयात करणारा देश असल्यामुळे या वाढलेल्या किमतींचा रुपयावर नकारात्मक परिणाम होत आहे. विश्लेषकांच्या अहवालानुसार, जर मध्यपूर्वेतील संघर्ष लांबला, तर भारताच्या चालू खात्यातील तूट वाढण्याची शक्यता आहे. यामुळे रुपयावर आणखी दबाव येउ शकतो आणि तो ९८ प्रति डॉलरच्या पातळीपर्यंत घसरण्याचा अंदाज वर्तवला जात आहे. त्याचबरोबर महागाई आटोक्यात ठेवण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँकेला व्याजदर वाढवण्याचा पर्याय वापरावा लागू शकतो, अशीही शक्यता व्यक्त केली जात आहे.

रुपयाच्या या घसरणीचा थेट परिणाम सामान्य नागरिकांवर होणार आहे. परदेशात शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना किंवा पर्यटनासाठी जाणा-यांना अधिक खर्च करावा लागेल. तसेच, मोबाईल, लॅपटाप आणि इतर आयातित वस्तू महाग होण्याची शक्यता आहे, कारण कंपन्यांना डॉलरमध्ये पेमेंट करावे लागते. कच्च्या तेलाच्या वाढत्या किमतींचा परिणाम पेट्रोल-डिझेलवर होउन वाहतूक खर्च वाढेल आणि त्याचा परिणाम सर्वच वस्तूंच्या किमतींवर होउ शकतो.

चलनाचे मूल्य हे प्रामुख्याने परकीय चलन साठा, आयात-निर्यात संतुलन आणि जागतिक बाजारातील परिस्थितीवर अवलंबून असते. डॉलरच्या तुलनेत रुपयाचे मूल्य कमी झाल्यास त्याला चलनाचे अवमूल्यन किंवा करन्सी डेप्रिसिएशन असे म्हटले जाते. भारताकडे असलेल्या परकीय चलन साठ्याच्या प्रमाणावर आणि जागतिक आर्थिक घडामोडींवर रुपयाची ताकद अवलंबून असते. सध्याच्या परिस्थितीत जागतिक तणाव आणि वाढती आयात खर्च यामुळे रुपयावर दबाव वाढत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

# इराणचा इस्रायल-अमेरिकन तळांवर भीषण हल्ला

**तेहरान/ वृत्तसंस्था :**पश्चिम आशियाची भूमी पुन्हा एकदा युद्धाच्या ज्वाळांनी पेटली आहे. शुक्रवारी पहाटे इराणने भीषण हल्ले करत आपण मागे हटण्याच्या मनस्थितीत नसल्याचे स्पष्ट केले आहे. इराणी रिव्होल्यूशनरी गार्ड्स (आयआयजीसी) यांनी ऑपरेशन ट्रू प्रामिस ४ अंतर्गत ८३वा टप्पा सुरू केला आहे. यावेळी इराणी सैन्याने केवळ इस्रायललाच लक्ष्य केले नाही, तर आखाती देशांमध्ये असलेल्या अमेरिकन लष्करी तळांनाही निशाणा बनवले आहे.इराणी माध्यमांच्या माहितीनुसार, आयआरजीसीने आधुनिक बॅलिस्टिक क्षेपणास्त्रे आणि सुसाइड ड्रोनच्या मदतीने इस्रायलमधील अशदोद येथील तेल साठा केंद्रावर हल्ला केला. या हल्ल्यानंतर तेथे मोठी आग लागल्याचे सांगितले जात आहे. याशिवाय इस्रायलच्या लष्करी तळांवरही अचूक हल्ले करण्यात आले आहेत. अहवालांनुसार, इराणने थेट अमेरिकन लष्करी तळांनाही लक्ष्य केले आहे. कुवैतमधील अली अल-सलेम एअरबेस आणि बहरीनमधील शेख ईसा एअरबेसवर इराणी क्षेपणास्त्रे कोसळल्याची माहिती आहे. बहरीनमध्ये पॅट्रियट मिसाइल सिस्टीमच्या दुरुस्ती हॅंगर आणि जेट इंधन साठ्यांना मोठे नुकसान झाल्याचे सांगितले जात आहे. तसेच कुवैत आणि यूएईमधील अल-धाफरा एअरबेसवरही इराणी ड्रोनने लष्करी साहित्याला लक्ष्य केले आहे.अलीकडेच नौदल प्रमुख रियर ॲडमिरल अलीरेजा तंगसिरी यांच्या मृत्यूनंतर इराण संतप्त झाला आहे. इस्रायली हल्ल्यात तंगसिरी यांचा मृत्यू झाला होता आणि त्याचाच बदला म्हणून हे हल्ले केल्याचे सांगितले जात आहे. २८ फेब्रुवारी २०२६ रोजी इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला खामेनेई यांच्या निधनानंतर सुरू झालेला हा संघर्ष आता जागतिक संकटाचे रूप धारण करत आहे. इराणने होर्मुज सामुद्रधुनी जवळपास बंद केल्याचेही सांगितले जात आहे.याचा परिणाम म्हणून जगभरातील तेलपुरवठा विस्कळीत होण्याचा धोका निर्माण झाला आहे. अमेरिकेने ६ एप्रिलपर्यंत तेल साठा केंद्रांवर हल्ले न करण्याची भूमिका जाहीर केली असली, तरी प्रत्यक्ष परिस्थिती त्याच्या उलट असल्याचे दिसत आहे. या प्रकरणाची माहिती असलेल्या सूत्रांच्या मते, हा संघर्ष थांबला नाही तर येत्या काळात तेल आणि वायूच्या तीव्र टंचाईला सामोरे जावे लागू शकते.



# भारतीय जहाज जग वसंत एलपीजी गॅस घेउन गुजरातमध्ये दाखल

**गांधीनगर /वृत्तसंस्था :**इराण युद्ध आणि होर्मुज सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे अनेक दिवस अडकून पडलेले भारतीय ध्वजधारी जग वसंत हे जहाज अखेर भारतात पोहोचले आहे. भारतीय ध्वज असलेले हे जहाज शुक्रवारी सकाळी गुजरातमधील बंदरावर दाखल झाले.गेल्या काही दिवसांत भारतीय ध्वजधारी पाइन गॅस आणि जग वसंत या दोन जहाजांनी होर्मुज सामुद्रधुनी पार केली होती. शिप ट्रॅकिंग डेटानुसार, मागील सोमवारी ही दोन्ही जहाजे इराणमधील लारक आणि केश्म बेटांदरम्यान दिसून आली होती. पश्चिम आशियातील युद्धामुळे होर्मुज सामुद्रधुनीत अडकलेल्या २२ भारतीय जहाजांपैकी ही दोन्ही जहाजे होती.युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणने होर्मुज सामुद्रधुनी अंशतः बंद केल्याने जगभरातील तेल आणि वायू पुरवठ्यावर परिणाम झाला आहे. जग वसंत आणि पाइन गॅस या जहाजांवर एकूण ९२,६१२ मेट्रिक टन एलपीजी गॅस भरलेली आहे. जग वसंत जहाजावर ३३ भारतीय नाविक, तर पाइन गॅसवर २७ भारतीय नाविक कार्यरत आहेत.यापूर्वी शिवालिक आणि नंदा देवी ही भारतीय जहाजेही सुमारे ९२ हजार मेट्रिक टन एलपीजी घेउन भारतात पोहोचली होती. भारतात घरगुती तसेच व्यावसायिक वापरासाठी एलपीजीची मोठी मागणी असल्याने होर्मुज सामुद्रधुनी बाधित झाल्यानंतर देशात एलपीजी टंचाई निर्माण झाली होती. मात्र, भारत सरकारने कूटनीतिक पातळीवर इराणशी चर्चा करून भारतीय जहाजांच्या सुरक्षित हालचालीची व्यवस्था केली.



## संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

# अर्थव्यवस्थेचे चित्र

जगातील युद्धजन्य परिस्थितीतदेखील 'एस अँड पी ग्लोबल' या जगद्विख्यात पतमानांकन संस्थेने भारतीय अर्थव्यववस्था २०२६-२७ या आर्थिक वर्षात ७.१ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज व्यक्त केला आहे. पूर्वीच्या अंदाजात ०.४० टक्क्याची वाढ करण्यात आली आहे, हे लक्षणीय म्हणावे लागेल. याचा अर्थ चालू आर्थिक वर्षाच्या तुलनेत मार्च २०२७ अखेरीस संपणाऱ्या आर्थिक वर्षात अर्थगतीचा वेग फक्त अर्ध्या टक्क्याने घटेल, असा होरा व्यक्त करण्यात आला आहे. याउलट अमेरिका - इस्त्रायल विरुद्ध इराण संघर्षामुळे आशिया पॅसिफिक देशांची विकास गती वर्षअखेरपर्यंत ०.५ ते ०.७ टक्क्याने कमी होईल, अशी शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. म्हणजे भारताची स्थिती त्यातल्या त्यात बरीच म्हणायची. मुळातच भारताची अर्थव्यवस्था मजबूत पायावर उभी आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून आणखी एक इंधनवाहू जहाज मायदेशी येत आहे. पेट्रोलियम उत्पादने आणि एलपीजीच्या उपलब्धतेबाबत ताबडतोब काळजी करण्याचे कारण नाही, असा दिलासा केंद्र सरकारने दिला आहे. युद्ध सुरू झाले तेव्हा देशांतर्गत एलपीजी उत्पादन २८ टक्के होते. ते वाढून आता ६० टक्क्यांपर्यंत पोहोचले आहे. त्यामुळे एलपीजी आयातीवरील अवलंबित्व कमी होण्यास मदत झाली आहे. शिवाय होर्मुझच्या सामुद्रधुनीतून भारतीय जहाजे सुरक्षितपणे येत असून, इराणशी आपले सलोख्याचे संबंध आहेत. विशेष म्हणजे इराणने ज्या पाच देशांना होर्मुझची वाट मोकळी करून दिली आहे, त्यात भारताचा समावेश आहे. तथापि, बॉम्बफेक, क्षेपणास्त्र व ड्रोनहल्ले यामुळे हवाई तसेच सागरी वाहतूक खोळंबून राहिली आहे. पुरवठासाखळी विस्कळीत झाल्याने कच्चे तेल, पेट्रोल व डिझेल यांची टंचाई निर्माण होण्याची शक्यता आहे, असा एस अँड पी या पतमानांकन संस्थेचा अंदाज आहे. इंधनाची सर्वाधिक आयात करणाऱ्या देशांत जपान व भारताचा समावेश होतो. त्यामुळे सध्याच्या ज्वलंत वास्तवाचा भारतीय अर्थव्यवस्थेवर काहीच परिणाम होणार नाही, असे म्हणता येणार नाही. परंतु इराणने भारतास झुकते माप दिल्याचा आपल्याला फायदा होणार आहे, हे नक्की. युद्ध समाप्त करण्यासाठी अमेरिकेने पाठवलेला १५ कलमी शांतता प्रस्ताव अवास्तव असल्याचे सांगत इराणने तो फेटाळून लावला. उलट, युद्धात झालेल्या नुकसानीची भरपाई द्या आणि होर्मुझच्या सामुद्रधुनीवरील आमचे सार्वभौमत्व स्वीकारा, असे इराणने म्हटले आहे. त्यामुळे युद्धसमाप्तीची तूर्तास शक्यता नाही. या प्रस्तावाच्या वृत्तानंतर तेलाच्या किमती पाच टक्क्यांनी घसरल्या. बेंट क्रूड वायद्यांचे दर ५.६६ डॉलरने घसरून ते ९८.८३ डॉलर प्रतिपिंपावर आले. यामुळे शेअर बाजारातही चैतन्याचे वातावरण पसरले. बुधवारी सेन्सेक्स आणि निफ्टी निर्देशांकांनी दोन टक्क्यांपर्यंत उसळी घेतली. शांततेची आशा दिसू लागल्यामुळे आजवरचा जोखमीबाबतचा सावध पवित्रा सोडून बाजाराचा ताबा तेजीवाल्यांनी पुन्हा एकदा मिळवला. इंधन महागल्यास त्याचा शेती, उत्पादन क्षेत्र व सेवा क्षेत्र या सगळ्यावर परिणाम होत असतो. यंदा महागाई निर्देशांक ४.३ टक्क्यांवर राहील, अशी चिन्हे आहेत. सरकारने घरगुती गॅस सिलिंडरच्या किमती वाढवल्या असल्या, तरी पेट्रोल व डिझेलचे दर स्थिर आहेत. औद्योगिक वापरासाठीच्या डिझेलच्या किमतीत मात्र प्रतिलिटर २२ रुपयांची वाढ झाली. युद्ध दीर्घकाळ सुरू राहिल्यास सरकारला इंधनाचे दर वाढवणे भाग पडेल. त्यानंतर महागाई आणखी वाढण्याची भीती आहे. सेवा क्षेत्राच्या उत्तम कामगिरीमुळे चालू खात्यातील तूट सध्या आटोक्यात आहे. रिझर्व्ह बँक सध्या कर्जावरील व्याज दर जैसे थे ठेवेल, परंतु २०२६-२७ च्या दुसऱ्या सहामाहीत व्याज दर पाव टक्क्याने वाढण्याची शक्यता असल्याचे भाकीत एस अँड पीने केले आहे. जेव्हा व्याज दर वाढतात, तेव्हा उत्पादनखर्च वाढतो आणि वस्तूंचे दर वाढवून शेवटी ग्राहकाकडूनच हा खर्च वसूल केला जात असतो. नीचांकी स्तरावरून दहा पैशांनी रुपया सावरला असून तो प्रति अमेरिकी डॉलर ९३.९८ असा झाला आहे. त्याआधी चालू महिन्यात रुपयाची जवळपास चार टक्क्यांनी घसरण झाली होती. कारण परकीय पोर्टपोलिओ गुंतवणूकदार भारतीय बाजारातून माघार घेत असून, त्याचा रुपयावर ताण आला होता. आर्थिक अनिश्चिततेच्या काळात सुरक्षित आधार म्हणून सोन्याची मागणीही वाढली आहे. शिवाय जगभरातील मध्यवर्ती बँकांनी त्यांच्या गंगाजळीचे मूल्य टिकवून ठेवण्यासाठी गेल्या काही वर्षांत सोन्याची भरपूर खरेदी सुरू ठेवली आहे. तसेच ज्यावेळी जागतिक तणाव वाढतो, तेव्हा सोन्याला असलेली मागणी वाढत असते, हा इतिहास आहे. आर्थिक विश्लेषकांनी सकारात्मक अंदाज व्यक्त केला असला, तरीदेखील कठोर वास्तवाकडे दुर्लक्ष करूनही चालणार नाही. मध्य पूर्वेतील तणावामुळे त्या भागात राहणाऱ्या भारतीयांकडून भारतात येणाऱ्या रकमांवर किंवा रेमिटन्सेसवर परिणाम होऊ शकतो. मध्य पूर्वेत एक कोटी भारतीय राहतात आणि देशाच्या एकूण व्यवस्थेच्या साडेतीन टक्के इतका निधी त्यांच्याकडून येतो. भारत हा जगातील सर्वाधिक रेमिटन्स मिळवणारा देश आहे. या निधीमुळे भारताच्या एक्सटर्नल अकाऊंटला मोठा आर्थिक आधार मिळतो. युद्धामुळे भारताकडून मध्य पूर्वेकडे जाणाऱ्या जवळपास १२ अब्ज डॉलरच्या कृषी निर्यातीस झळ पोहोचली आहे. गेल्यावर्षी भारतातून मध्य पूर्वेतील देशांना ४.४३ अब्ज डॉलर किमतीचा तांदूळ पाठवला होता. युद्धामुळे चार लाख टन बासमती तांदूळ बंदरात किंवा वाहतुकीत अडकून राहिला आहे. भारत इराणला तांदूळ, चहा, औषधे पाठवतो. असा ७६ हजार टन माल खोळंबून राहिला आहे. वाहनांचे घटक व सुटे भाग यांच्या निर्यातीतही घट झाली असून, वमिा कंपन्यांनी दर वाढवल्यामुळे निर्यातदारांची स्पर्धात्मकता कमी होत आहे. 'एचएसबीसी' या संस्थेच्या ताज्या सर्वेक्षणानुसार, खासगी क्षेत्राची वाढ मार्च महिन्यात सर्वाधिक गतीने मंदावली आहे. त्यातही उत्पादन क्षेत्र हे नीचांकी पातळीवर गेले आहे. या सर्व परिस्थितीचा विचार करता केंद्र सरकारला राज्यांच्या सहकार्याने आर्थिक प्रतिकूलतेवर मात करावी लागेल. त्यासाठी व्यापारी, उद्योजक, आयातदार व निर्यातदार यांना आर्थिक आधार द्यावा लागेल.

# साठवणुकीत दिलासा, उद्योगांना फटका

**तेलटंचाईच्या काळात दिलासाची बाब म्हणजे देशातील अनेक ठिकाणी तेल आणि वायूची भूमिगत साठवण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दुसरीकडे, क्रूड ऑईलच्या शुद्धीकरणात मिळणाऱ्या कच्च्या मालावर अवलंबून असणारे उद्योग अडचणीत आल्याचे चित्र आहे.**

अमेरिका आणि इस्त्राईलने इराणवर हल्ला केल्यानंतर इराणने होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या वाहतुकीवर निबंध घातले. त्यामुळे जगातील अनेक देशांच्या कच्च्या तेलाच्या पुरवठ्यावर मोठा परिणाम झाला आहे. भारतात आयात होणाऱ्या तेलाच्या सुमारे ९० टक्के तेलाची वाहतूक होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होते. साहजिकच याचा थेट परिणान देशातील सामान्य जनतेवर होत आहे. त्यातल्या त्यात दिलाशाची बाब म्हणजे देशातील अनेक ठिकाणी तेल आणि वायूची भूमिगत साठवण करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. दुसरीकडे पीव्हीसी पाइप निर्मितीसारख्या अनेक व्यवसायांसाठी लागणारा कच्चा माल क्रूड ऑईलच्या शुद्धीकरणात मिळतो. असे उद्योग अडचणीत आल्याचे चित्र आहे. स्वयंपाकाच्या गॅसचा तुटवडा जाणवू लागल्यावर अनेक लोक इंडक्शन कुकटॉप्सकडे वळू लागले आहेत.

### काळानुरूप भारताचे प्रयत्न

इराण आणि इस्त्राईल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे भारताच्या ऊर्जा सुरक्षेची खरी स्थिती पुन्हा एकदा समोर आली आहे. भारत आपल्या गरजेपैकी सुमारे ९० टक्के कच्चे तेल, ६० टक्के एलपीजी आणि ५० टक्के एलएनजी इतर देशांकडून आयात करतो. आयातीवरील हे प्रचंड अवलंबित्व पुरवठा साखळीत अचानक अडथळा निर्माण झाल्यास भारतावर गंभीर संकट ओढवू शकते. सध्या होर्मुझ सामुद्रधुनीवर इराणने लावलेल्या निर्बंधांमुळे निर्माण झालेली परिस्थिती त्याचेच उदाहरण आहे; मात्र काळानुरूप भारताने ऊर्जा क्षेत्रात आपली क्षमता बळकट करण्याचा प्रयत्न केला आहे, हेही लक्षात घ्यायला हवे. भूमिगत साठवणुकीची उभारणी असो किंवा तेल आयातीचे स्त्रोत शोधण्याचा प्रयत्न; भारत हळूहळू ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने अधिक सक्षम होत आहे. सध्याच्या संकटाच्या पार्श्वभूमीवर, धोरणात्मक तेलसाठ्यां सह पेट्रोल आणि डिझेलचा साठा सुमारे २५ दिवसांपर्यंत वापरता येऊ शकतो. देशात उपलब्ध असलेला स्वयंपाकाचा गॅस, म्हणजेच एलपीजी, साधारणपणे २५ ते ३० दिवसांपर्यंत पुरू शकतो. औद्योगिक वापरासाठी असलेला एलएनजी सुमारे दहा दिवसांपर्यंत उपलब्ध राहू शकतो. ऊर्जा क्षेत्रातील ही तुलनेने मजबूत तयारीच सध्या घबराटीची स्थिती निर्माण होऊ देत नाही. उलट, पाकिस्तानसारख्या काही देशांमध्ये जवळपास लॉकडाऊनसदृश परिस्थिती दिसून येत आहे. भारतात अनेक भूमिगत गॅस साठवण सुविधा उभारण्यात आल्या आहेत. यांपैकी सर्वांत जुनी गुहा विशाखापट्टणम येथे आहे. सुमारे दहा वर्षापूर्वी 'इंडियन स्ट्रॅटेजिक पेट्रोलियम रिझर्व्हेज लिमिटेड ने ही सुविधा उभारली. या गुहांमध्ये एकूण ५.३३ दशलक्ष टन कच्च्या तेलाचा साठा ठेवता येतो. तो जवळपास ४० दशलक्ष पिंप इतका आहे. हा साठा देशाच्या साधारण दहा दिवसांच्या गरजांसाठी पुरेसा मानला जातो. बाह्य हल्ले, ड्रोन आक्रमणे किंवा नैसर्गिक आपत्तींपासून तुलनेने या सुविधा सुरक्षित असतात. शिवाय त्यांचा खर्चही कमी असतो. जमिनीखाली असल्यामुळे आग लागणे किंवा तेलगळती होण्याचा धोका तुलनेने कमी असतो.

### भूमिगत तेल साठा

आतापर्यंत सरकारने या साठ्यांचा थेट वापर केलेला नाही; मात्र गरज भासल्यास हे साठे एक धोरणात्मक संरक्षक कवच म्हणून काम करतात आणि सरकारला पर्यायी आयात व्यवस्थेसाठी वेळ मिळतो. या भूमिगत साठवण सुविधेचे पूर्ण नाव 'साउथ एशिया एलपीजी कंपनी प्रायव्हेट लिमिटेड' असे आहे. विशाखापट्टणम येथील डॉल्फिन हिल्स परिसरात ही सुविधा उभारण्यात आली आहे. ही 'एचपीसीएल' आणि फ्रान्समधील ऊर्जा क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी 'टोटल एनर्जी' यांच्यातील सनान भागीदारीमध्ये उभारलेला संयुक्त प्रकल्प आहे. २००७पासून या सुविधेचा वापर सुरू आहे. येथे सुमारे ६० हजार टन एलपीजी साठवण्याची क्षमता आहे. या गुहेत 'एचपीसीएल' आणि टोटल एनर्जी यांचा मोठ्या प्रमाणावर एलपीजी साठा ठेवला जातो. याशिवाय 'इंडियन ऑईल' आणि पेट्रोलियम यांसारख्या कंपन्याही गरज भारत पेट्रोलियम सारख्या कंपन्यांची गरज पडल्यास या साठवण क्षमतेचा वापर करतात, मंगळुरूमध्ये



उभारण्यात आलेली आणखी एक भूमिगत साठवण सुविधा 'एचपीसीएल' साठी करण्यात आली आहे. या तयार सुविधेची साठवण क्षमता सुमारे ८० हजार टन आहे. त्यामुळे सुमारे महिनाभर कोट्यवधी घरांच्या एलपीजी गरजा पूर्ण करता येऊ शकतात. ही सुविधा 'मेघा इंजिनिअरिंग 'या कंपनीने उभारली आहे आणि सप्टेंबर २०२५ पासून ती पूर्ण क्षमतेने कार्यरत झाली आहे. ऊर्जा सुरक्षेच्या दृष्टीने या साठवण सुविधांचे महत्त्व अत्यंत मोठे आहे. आयातीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असलेल्या भारतासारख्या देशासाठी अशा धोरणात्मक साठ्यांमुळे संकटाच्या काळात वेळ मिळतो आणि पर्यायी मार्ग शोधण्याची संधीही उपलब्ध होते.

### आखाती युद्धाचा उद्योगावर परिणाम

दुसरीकडे आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचे परिणाम आता थेट उद्योगावर झाला आहे. बीडमध्ये ठिबक सिंचनचे पाइप बनवणाऱ्या कंपनीचे उत्पादन मागील पाच दिवसांपासून बंद पडले आहे. कच्चे तेल शुद्धीकरण प्रकल्प बंद पडल्याने ठिबक सिंचन पाइप बनवण्यासाठी कच्चा माल मिळत नसल्याने व्यवसायांना फटका बसत आहे. पुरवठ्याची साखळीदेखील विस्कळीत झाली आहे. ठिबक सिंचन पाइप बनवण्यासाठी लागणारा कच्चा माल, कच्चे तेल शुद्धीकरण करणाऱ्या प्रकल्पामधून मिळतो; परंतु आता रिफायनरीमध्येच क्रूड ऑइल येत नसल्याने तेथील उत्पादन बंद आहे. त्याचा परिणाम या उद्योगावर झाला आहे. यापूर्वी कधीही न उद्भवलेली हो परिस्थिती असून कच्चा माल जवळपास दुप्पट किमतीत खरेदी करण्याची वेळ उद्योजकांवर आली आहे; परंतु त्यानंतर ठिबक सिंचनचे पाइपदेखील महागणार असल्याने ते शेतकऱ्यांना परवडणारे नसेल. अशा स्थितीत आता युद्ध थांबल्यास हे उत्पादन पूर्वपदावर येईल. युध्दाचा थेट परिणाम मुंबईतील ऐतिहासिक क्रॉफर्ड मार्केट आणि नाशिकमधील द्राक्षनिर्यातीवर बसला आहे. मुंबईचे मुख्य व्यापारी केंद्र असलेल्या क्रॉफर्ड मार्केटमध्ये आयात होणाऱ्या सुकामेव्याची आवक कमालीची घटली आहे. इराणी पिस्ता, खजूर, बेदाणे आणि पाईन नट्स यांसारख्या पदार्थाचा पुरवठा खालावला आहे. नाशिक जिल्ह्यालाही या युद्धाचा मोठा फटका बसला आहे. गेल्या वर्षी नाशिकमधून एक लाख ३१ हजार टन द्राक्षांची निर्यात झाली होती; यंदा हे प्रमाण ६५ ते ७० हजार टनांवर आले आहे. युरोप आणि आस्त्राती देशांकडे जाणारी द्राक्षे बंदरांवर अडकून पडली असून कांदा, डाळिंब, पालेभाज्यांची निर्यातही मंदावली आहे.

### भारतात एलपीजीबाबत चिंता

मध्य पूर्वेतील सुरू असलेल्या भू-राजकीय तणावाचा परिणाम आता सामान्य माणसाच्या स्वयंपाकघरावर होत आहे. जागतिक तेल आणि नैसर्गिक वायू पुरवठा साखळी गंभीरपणे विस्कळीत झाली आहे. त्यामुळे भारतात 'एलपीजी 'बाबत चिंता निर्माण झाली आहे. तथापि, सरकारने स्पष्ट केले आहे, की देशांतर्गत उत्पादन वाढले आहे. घाबरून जाण्याची गरज नाही.

सुरळीत पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी, सरकारने आवश्यक वस्तू कायदा देखील लागू केला आहे. असे असूनही, रिफिल बुकिंगमध्ये विलंब आणि गॅसच्या वाढत्या किमतीच्या वृतांमुळे ग्राहकांमध्ये चिंता निर्माण झाली आहे. या भीतीमुळे लोक पर्यायी स्वयंपाक पद्धतींकडेही वळत आहेत. महानगरांमध्ये इलेक्ट्रिक कुकटॉप्स, म्हणजेच इंडक्शन कुकटॉप्सच्या विक्रीत अचानक वाढ झाली आहे. दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, चेन्नई आणि कोलकातासारख्या प्रमुख शहरांमधील अनेक भागात इंडक्शन कुकरचा साठा संपला आहे. या गोंधळात प्रत्येक ग्राहकाला एक प्रश्न पडतो तो असा, की पारंपरिक गैस स्टोव्हपासून इलेक्ट्रिक इंडक्शन कुकरकडे वळणे आर्थिकदृष्ट्या शहाणपणाचे आहे का? त्याचे उत्तर असे, की गॅस स्टोव्हवर स्वयंपाक करताना, निर्माण होणाऱ्या उष्णतेपैकी सुमारे ६० टक्के उष्णता भांड्याच्या बाजूने हवेत वाया जाते. याचा अर्थ असा, की तुम्ही ज्या गॅससाठी पैसे देता, त्यापैकी फक्त ४० टक्के तुमचे अन्न शिजवण्यासाठी वापरला जातो. इंडक्शन तंत्रज्ञान बरेच आधुनिक आणि वैज्ञानिक आहे. ते काचेच्या पृष्ठभागाखाली ठेवलेल्या तांब्याच्या कॉइल आणि चुंबकीय क्षेत्रांच्या तत्त्वावर कार्य करते. या अचूक तंत्रज्ञानामुळे, प्रेरण कार्यक्षमता ९० टक्क्यांपर्यंत असते आणि ऊर्जेचा अपव्यय कमी असतो. इंडक्शनद्वारे समान प्रमाणात उष्णता ऊर्जा निर्माण करायची असेल, तर त्यासाठी अंदाजे ७८ युनिट वीज लागेल. प्रति युनिट आठ रुपयांचा वीज दर गृहीत धरल्यास एकूण मासिक खर्च फक्त ६२४ असेल. याचा अर्थ गॅस सिलेंडरच्या तुलनेत तुम्ही दरमहा सुमारे ३०० रुपये थेट वाचवू शकता. इंडक्शन कुकटॉपचा एक अतिरिक्त फायदा म्हणजे तापमान स्थिर राहते आणि साफसफाई करणे सोपे होते. १४.२ किलो सिलिंडरची किंमत सुमारे बाराशे ते दीड हजार रुपये असते.

**महेश देशपांडे**

## इंधन टंचाई की साठेबाजी?

सध्या देशात पेट्रोल, डिझेल आणि घरगुती गॅसचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे केंद्र सरकार वारंवार ठासून सांगत आहे. मात्र, प्रत्यक्षात जमिनीवरील परिस्थिती पाहिली तर सरकारच्या या दाव्यांना हरताळ फासला जात असल्याचे चित्र दिसत आहे. राज्यातील बहुसंख्य पेट्रोल पंपांवर लागलेल्या लांबच लांब रांगा आणि 'नो स्टॉक'चे फलक पाहून सामान्य नागरिक हवालदिल झाला असून, ही टंचाई नैसर्गिक आहे की जाणीवपूर्वक निर्माण केलेली, असा प्रश्न आता उपस्थित होत आहे. केंद्र सरकारच्या दाव्यानुसार इंधनाचा तुटवडा नाही. जर साठा पुरेसा आहे, तर मग पेट्रोल पंपांपर्यंत तो पोहोचण्यात नेमके कोणते अडथळे येत आहेत? ही टंचाई नेमकी का निर्माण झाली आहे? याचे सखोल उत्तर राज्य सरकारने शोधणे आवश्यक आहे. मुबलक साठा असतानाही ग्राहकांना रिकाम्या हाताने परत पाठवले जात असेल, तर पुरवठा साखळीत मोठी गळती किंवा अडवणूक होत असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

या परिस्थितीमागे दोन प्रमुख घटक कारणीभूत असल्याचे दिसून येते. भविष्यात भाववाढ होईल किंवा अधिक नफा कमवता येईल या आमिषाने काही स्तरांवर इंधनाची साठेबाजी केली जात असल्याची दाट शक्यता आहे. साठा दाबून धरून कृत्रिम टंचाई निर्माण करणे आणि त्यानंतर चढ्या दराने विक्री करणे, असा हा प्रकार असू शकतो. 'व्हॉट्सॲप आणि इतर सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर इंधन संपणार आहे' अशा आशयाचे संदेश जाणीवपूर्वक पसरवले जात आहेत. यामुळे जनतेमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, नागरिक गरजेपेक्षा जास्त इंधन भरण्यासाठी गर्दी करत आहेत. या भीतीचा फायदा समाजकंटक घेत आहेत.

जिल्हा पुरवठा विभागाने प्रत्येक पेट्रोल पंपाच्या साठ्याची आणि दैनंदिन विक्रीच्या नोंदीची तातडीने तपासणी करावी. ज्यांच्याकडे साठा उपलब्ध असूनही विक्री नाकारली जात आहे, अशांवर कठोर कायदेशीर कारवाई व्हावी. अफवा पसरवून शांतता भंग करणाऱ्या आणि जनतेत घबराट निर्माण करणाऱ्यांवर सायबर सेलच्या मदतीने गुन्हे दाखल करावेत. अशा समाजकंटकांचे फावले तर त्याचा परिणाम कायदा व सुव्यवस्थेवर होऊ शकतो. राज्य सरकारने सुद्धा तेल कंपन्यांशी समन्वय साधून जनतेला अधिकृत आकडेवारी जाहीर करावी. अफवांना आळा घालण्यासाठी प्रशासनाने वेळोवेळी स्पष्टीकरण देणे आवश्यक आहे. जर ही परिस्थिती वेळीच आटोक्यात आणली नाही, तर इंधन टंचाईचा थेट परिणाम वाहतुकीवर आणि पर्यायाने जीवनावश्यक वस्तूंच्या महागाईवर होईल. सरकारने केवळ कागदी दावे न करता, पेट्रोल पंपांवरील रांगा कशा कमी होतील आणि पुरवठा कसा सुरळीत होईल, याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. साठेबाजी करणाऱ्यांवर आणि अफवा पसरवणाऱ्यांवर जर आताच जरब बसवली नाही, तर सामान्य माणूस भरडला जाणे अटळ आहे.

**अविनाश देशपांडे**

## रणनीती आणि आर्थिक संतुलन

सध्या चालू असलेल्या इराण विरुद्ध अमेरिका इजराइल या देशातील युद्धाच्या पार्श्वभूमीवर जागतिक अर्थव्यवस्था अस्थिर झाली आहे. युद्धाचा परिणाम ऊर्जा, वीज, तेल, समुद्री व्यापार, अन्नधान्य, वाहतूक, चलन, गुंतवणूक आणि पुरवठा साखळी अशा अनेक टप्प्यांवर झालेला आहे. मध्यपूर्व भाग हा जगातील तेल आणि नैसर्गिक वायू यांचा प्रमुख स्त्रोत आहे. स्ट्रेट ऑफ होर्मुझ या समुद्रधुनीतून जगातील पाचव्या भागा इतक्या कच्च्या तेलाची वाहतूक होते. या भागावर युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. हा भाग इराणच्या नियंत्रणात येत असल्याने त्याने या समुद्रधुनीतून वाहतूक बंदी केली आहे. भारतासाठी मात्र ही वाहतूक सुरू ठेवली आहे.

भारत अनुमानाने ८५इ कच्चे तेल आयात करतो. आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाच्या किमती वाढल्याने भारताच्या आयात खर्च आणि व्यापारी तूट वाढवून रुपयावर दबाव आला आहे. तेल आणि नैसर्गिक वायू महाग झाल्यामुळे महागाई वाढण्याची चिन्हे आहेत. त्याचबरोबर राज्यातील केळी, कांदा, द्राक्ष, डाळिंब यांच्या निर्यातीवर परिणाम झाला आहे. अनेक ठिकाणी शेतमाल पडून आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जीवन मरणाचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकरी त्यामुळे मागणी करत आहे की युद्ध थांबवून आयात निर्यात सुरळीत व्हावी किंवा सरकारने नुकसान भरपाई अनुदान देऊन करावी. रशियाने तेल पुरवठा करण्याची सिद्धता दर्शवली आहे आणि तेल पुरवठा होतही आहे ही त्यातली एक चांगली गोष्ट आहे. भारताचे इराणशी चांगले ऊर्जा संबंध आहेत. भारत चे इस्त्रायलशी संरक्षणामध्ये सहकार्य, तर अमेरिकेशी धोरणात्मक भागीदारी आहे. तिन्ही देशांशी आपली नाळ जुळलेली आहे त्यामुळे कोणतेही वेडेवाकडे पाऊल न उचलता भारताला संतुलित भूमिका घ्यावी लागेल. कोणा एका राष्ट्राचे समर्थन व्यापार आणि आंतरराष्ट्रीय संबंधावर प्रतिकूल परिणाम होऊ शकतो. भारतासाठी ही परिस्थिती आव्हानात्मक आहे. तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर असणाऱ्या भारताला युद्ध परिस्थितीतील होरफळावे लागू नये तसेच राष्ट्राची राखरांगोळी होऊ नये यासाठी आत्मनिर्भर राहून ऊर्जा संक्रमण आणि उत्पादन वाढ यावर भर द्यावा लागेल.

आर्थिक सक्षम अर्थव्यवस्था निर्माण करण्याकडे लक्ष केंद्रित करावे लागेल. युद्धपूर्व परिस्थितीत कोणती दक्षता घ्यावी, आपत्कालीन स्थितीचा सामना कसा करावा याचे प्रशिक्षण नागरिकांना द्यावे लागेल. युद्धाचे दुरगामी भीषण परिणाम पाहता निर्माण होणाऱ्या प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जाण्यास दीर्घकालीन धोरणात्मक दृष्टिकोन राबवल्यास जागतिक अस्थिरतेच्या काळातही भारत स्थिर आणि सक्षम राहील हे निश्चित.

**लीना गाडगीळ**

## आखाती युद्ध- प्रश्न मानवीय नैतिकतेचा आहे

आचार्य विनोबा भावे आणि गोळवलकर गुरुजी यांची एका भेटीत बरीच चर्चा झाली. त्यावेळी विनोबा असं म्हणाले की, तुमचे हिंदुत्व हे राष्ट्रवादाच्या कंसात आणि राष्ट्रवाद हा मानवतेच्या कंसात असायला हवा. सध्याच्या आखाती युद्धाच्या पार्श्वभूमीवर मला विनोबांचे हे वाक्य फार महत्वाचे वाटते.

इराणजवळ अण्वस्त्र-सज्जता असल्याचा कांगावा करून व ती आम्ही नष्ट केली असा डांगोरा पिटून जेम-तेम वर्षही नसेल झाले तोच अमेरिका आणि इस्त्राईलने पुन्हा इराणवर आक्रमण करून त्या देशाच्या राष्ट्रप्रमुखास (जो धर्मप्रमुख देखील होता) इतर प्रमुख नेत्यांसह ठार केले. इराणी जनतेला सत्तेत बदल हवा आहे, इराण पुन्हा अण्वस्त्रे तयार करण्याच्या प्रयत्नात आहे, अशी वेगवेगळी कारणे या आक्रमणाचे समर्थन करण्यासाठी अमेरिकेचे राष्ट्रपती दररोज देत राहिले. इराण वरील आक्रमणापूर्वी दहशतवाद्यांचा बिमोड करण्याच्या नावाखाली इस्त्राईलच्या राज्यकर्त्यांनी संपूर्ण गाझापट्टी बेचिराख करून असंख्य निरपराध नागरिकांना ठार मारले. तो वंश संहारच होता. इराण वरील आक्रमणाच्या पहिल्याच दिवशी लहान मुलींच्या प्राथमिक शाळेवर बॉम्ब टाकून सुमारे १६५ चिमुरड्या मुलींना ठार मारण्यात आले.

ज्यांचा हिंदुत्ववाद मानवतेच्या कंसात नाही, अश्या आपल्या देशातील अनेकांना या घटनांमुळे आनंदच झाला. शत्रूचा काटा परस्पर निघतो आहे अशी त्यांची भावना असावी. त्यांचा राष्ट्रवाद देखील मानवतेच्या कंसात नसल्यामुळे एका सार्वभौम राष्ट्राच्या प्रमुख नेत्यांनी राजवट बदलण्याच्या उद्देशाने ठार करणाऱ्या महाशक्तीला काही दोष देण्याचे त्यांना कारणच वाटले नाही. युद्धाला तोंड फुटले त्याच्या फक्त दोन-तीन दिवस आधी इस्त्राईलमध्ये जाऊन नेतान्याहूची गळाभेट घेणाऱ्या व तिथल्या संसदेकडून मेडल स्वीकारणाऱ्या आमच्या पंतप्रधानांना देखील अमेरिकेच्या व इस्त्राईलच्या इराणवरील आक्रमणाचा निषेध करण्याची इच्छा झाली नाही.

१९७०-८० पर्यंत आपल्या देशातील मध्यम वर्गाला सुद्धा जगण्यासाठी अडीअडचणींचा व प्रसंगी हालअपेष्टांचा सामना करावा लागत असे. रेशन, साखर, पेट्रोल, केरोसीन, इ. आवश्यक वस्तू घेण्यासाठी मोठमोठ्या रांगा लागायच्या. परंतु तेव्हा देशाचा म्हणून एक स्वाभिमान होता, प्रतिष्ठा होती. परंतु पुढे एक विमान अपहरण झाले आणि अपहृत प्रवाशांच्या सुखवस्तु नातेवाईकांनी केंद्रशासनावर दबाव आणून अपहरण कर्त्यांच्या मागण्या मान्य करण्यास भाग पाडले. तोपावेतो पूर्वीचा साधा मध्यम वर्ग हळू हळू सुखवस्तु , आत्मकेंद्रित होत गेला होता. कष्ट सोसण्याची तयारी त्या वर्गात राहिली नव्हती. त्यामुळे आमचे राष्ट्रप्रेम धर्मप्रेमात आणि धर्मप्रेम देखाव्यात कधी बदलत गेले ते आमचे आम्हालाही कळले नाही. आता जेव्हा आम्हाला पुन्हा पेट्रोल, गॅस ची टंचाई भासत आहे तेव्हा कुठे आम्ही ट्रम्पच्या नावे खडे फोडीत आहोत. ही टंचाई नसती भासली तर गाझापट्टी आणि इराण मधल्या नरसंहाराची फिकीर आम्ही केली नसती. आमचे सरकार तर अजूनही त्यांना कोणताच दोष देण्याच्या मनस्थितीत दिसत नाही. याला कदाचित सरकारची चाणक्यनीती म्हणून गौरविले जाईल. परंतु प्रत्यक्षात ही एक संवेदनशून्य, कणाहीन व लाचार अवस्था आहे.

दुसऱ्या महायुद्धानंतर जगातील सर्व राष्ट्रांची मिळून जी संयुक्त राष्ट्र संघटना निर्माण करण्यात आली तिने मानवहक्कांची सनद जारी केली. जगातल्या प्रत्येक व्यक्तीला आपली प्रतिष्ठा सांभाळून जगण्याचा हक्क असल्याचे संयुक्त राष्ट्रांनी मान्य केले आहे. तसेच प्रत्येक राष्ट्र सार्वभौम असून दुसऱ्या राष्ट्राच्या सार्वभौमत्वास क्षति पोहोचविण्याचा कोणत्याही राष्ट्रास हक्क नाही. इस्त्राइल व अमेरिकेने गाझापट्टी आणि इराण मध्ये जे काही चालविले आहे, तो आधुनिक मानवी समाजावरील भयंकर मोठा असा कलंक आहे. त्यांच्या या कृतीचा साधा निषेधही आपल्या सत्तारुढ नेत्यांना करावासा वाटू नये, याचा अर्थ त्यांचे हिंदुत्व हे राष्ट्रवादाच्या आणि त्यांचा राष्ट्रवाद हा मानवतेच्या कंसात अजूनही आलेला नाही. कणा ताठ असला तर कोणताही राष्ट्रप्रमुख जे योग्य आहे त्यास योग्य म्हणेल व जे निषेधार्ह आहे त्याचा निषेधच करेल. कॅनडा, जर्मनी व युरोप च्या अन्य काही राष्ट्रप्रमुखांनी असा ताठ कणा बाळगलेला आहे.

**किशोर देशपांडे**

# अमरावतीत एमडी ड्रग्सचा वाढता विळखा

## खा. बळवंत वानखडे यांची लोकसभेत कठोर कारवाईची मागणी

**अमरावती/प्रतिनिधी**

शहरात एमडी ड्रग्सचा वाढता प्रभाव अत्यंत चिंताजनक स्वरूप धारण करत असून, तरुण पिढी मोठ्या प्रमाणावर या विळख्यात अडकत असल्याचे चित्र समोर येत आहे. अलीकडे पोलीस प्रशासनाने केलेल्या कारवायांमध्ये कोट्यवधी रुपयांचे ड्रग्स जप्त करण्यात आले असून, वारंवार मोठ्या प्रमाणावर धाडी टाकल्या जात आहेत.



या संपूर्ण प्रकरणात गुजरात आणि राजस्थानशी संबंधित कनेक्शन समोर येत असल्याने, या रॅकेटचा मुख्य सूत्रधार कोण आहे, याचा सखोल तपास करण्याची मागणी करण्यात येत आहे. अमरावती हे एमडी ड्रग्सचे मोठे केंद्र (हब) बनत असल्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अलीकडील कारवायांवरून मोठ्या प्रमाणावर ट्रकद्वारे ड्रग्स अमरावतीत येत असून, येथून संपूर्ण महाराष्ट्रात त्याचे वितरण होत असल्याचा संशय व्यक्त होत आहे. त्यामुळे या वाहतुकीचा संपूर्ण मागोवा घेऊन ड्रग्स पुरवठ्याची साखळी उद्ध्वस्त करण्याची गरज अधोरेखित झाली आहे.

यासंदर्भात विशेष पथक नेमून सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या गृह विभागाने या प्रकरणात तात्काळ आणि कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. दरम्यान, शहरातील वाढत्या ड्रग्स प्रकरणांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

## बजरंग मंडळाचा हनुमान जयंती उत्सव

**अमरावती/का.प्र.**

श्री बजरंग चौक येथील बजरंग मंडळाच्या वतीने हनुमान जन्मोत्सव ३० मार्च ते ३ एप्रिल या कालावधित होणार आहे. यंदा महोत्सवाचे ९३ व्या वर्षात पदार्पण होत आहे. या निमित्य विविध धार्मिक कार्यक्रमांची पर्वणी मिळणार आहे. सोमवार ३० रोजी सांय.६ वाजता ब्रम्हवृंदाद्वारे मंत्रजागर, रात्री ८ वाजता रामायण दर्शन, ३१ रोजी दुपारी ४ वाजता श्री राधाकृष्ण महिलाभजनी मंडळाचा भजन कार्यक्रम, रात्री ८ वाजता रामरंगी रमले हा भक्ती गीताचा कार्यक्रम होईल. यावेळी गायीका माधुरी अकोलीकर (मुंबई) व साक्षी अकोलीकर (पुणे) हा सदर करण्यात येणार आहे. बुधवार १ एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता श्री भोलेश्वर महिलाभजनी मंडळ भजन सादर करतील. सांय.७ वाजता बहुमेळ रंजन कार्यक्रम, गुरुवार २ एप्रिल रोजी सकाळी ५ वाजता हनुमान जन्मोत्सव किर्तण हभप श्री रायजीप्रभु शेलोटकर सादर करतील. दुपारी ११ वाजता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शुक्रवार ३एप्रिल रोजी दुपारी ४ वाजता ब्रम्हचैतन्य महिला मंडळद्वारा गोपाळ काल्याचे भजन होणार असून रात्री ७ वाजता सत्यनारायण व महापुजा आयोजित करण्यात आली आहे.

## आखाती युद्धाचा धान्याच्या भावावर परिणाम

**अमरावती/का.प्र.**

आखाती युद्धामुळे अनेक वस्तूंच्या किमती वाढलेल्या असताना हरभरा, तूर, सोयाबीन या शेतमालाच्या दरांवर त्याचा फारसा परिणाम दिसून आलेला नाही. गेल्या आठवडाभरात हरभऱ्याच्या दरात सुधारणा दिसून आली असली, तरी तुरीचे दर स्थिर आहेत. शेतकऱ्यांना तूर अजूनही हमीभावापेक्षा कमी किमतीत विकावी लागत आहे.

बाजारातील हरभरा आवक टिकून आहे. त्याचवेळी दरातही सुधारणा दिसून आली. हरभरा दर बहुतांशी बाजारात ५ हजारांच्या पुढे गेले आहेत. बुधवारी अमरावती कृषी उत्पन्न बाजार समितीत ४४७३ क्विंटल हरभऱ्याची आवक झाली. हरभऱ्याला ४ हजार ९०० ते ५ बजार ९५२ रुपये म्हणजे सरासरी ५ हजार ८७५ रुपये प्रति क्विंटल दर मिळाला. गेल्या २० मार्च रोजी बाजारात ३३८७ क्विंटल आवक झाली होती आणि ४ हजार ७५० ते ५ हजार २५२ रुपये दर मिळाला होता. गेल्या सहा दिवसांत हरभऱ्याच्या सरासरी दरात ८७४ रुपयांची वाढ पहायला मिळाली आहे. हरभऱ्याचा हमीभाव ५ हजार ७५० रुपये आहे. प्रथमच बाजारात हमीभावापेक्षा अधिक दर मिळू लागले आहेत.

सरकारच्या खरेदीचाही बाजाराला आधार

बाजारात सोयाबीनचे भाव कमीच आहेत. बाजारातील सोयाबीनची आवक कमी झाली. ती आणखी कमी होण्याची शक्यता आहे. सोयाबीनची बाजारातील आवक कमी झाल्यानंतर दरात काहीसे चढ-उतार राहू शकतात, मात्र सरकारच्या विक्रीचा दबाव येऊ शकतो, असे अभ्यासकांचे म्हणणे आहे. सध्या बाजारात सोयाबीनला ४ हजार ते ४ हजार ३०० रुपये दर मिळत आहे. हरभऱ्याची आवक पुढील



महिनाभरात चांगली राहील, असा अंदाज हरभरा बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला आहे.

गेल्या आठवडाभरात तुरीचे दर स्थिर राहिले. तुरीची आवक वाढली आहे. अमरावती बाजार समितीत गेल्या २० मार्चला तुरीला ७ हजार २५० ते ७ हजार ८११ म्हणजे सरासरी ७ हजार ५३० रुपये प्रति क्विंटल दर मिळाला होता. २५ मार्च रोजी ७ हजार ३०० ते ७ हजार ८०० म्हणजे सरासरी ७ हजार ५५० रुपये प्रतिक्विंटल दर मिळाला. बाजारात तुरीचे भाव दबावातच आहेत. तुरीचा हमीभाव ८ हजार रुपये प्रति क्विंटल आहे. गुणवत्ता आणि वाणानुसार भाव मिळत आहे. बाजारातील आवक आणखी काही आठवडे कायम राहील. त्यामुळे तुरीचा बाजार काही आठवडे तरी हमीभावाच्या खाली राहू शकतो, असा अंदाज तूर बाजारातील अभ्यासकांनी व्यक्त केला आहे.

## आरटीई प्रवेशाकरीता २,६२६ रिक्त जागांसाठी आतापर्यंत ७,७३३ अर्ज दाखल

**अमरावती/का.प्र.**

शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी आरटीई २५ टक्के प्रवेश अर्जाला पून्हा सहा दिवसांची मुदतवाढ देण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आता ३१ मार्चपर्यंत पाल्यांचे अर्ज दाखल करता येणार आहे.

आरटीई अंतर्गत दुर्बल व वंचित घटकांतील बालकांसाठी २५ टक्के राखीव प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने राबविण्यात येत आहे. याकरिता पालकांना १७ फेब्रुवारी ते १० मार्च या




कालावधीत ऑनलाइन अर्ज भरण्याकरिता दिला होता. दरम्यान शिक्षण विभागाकडून १ किमीची अट रद्द करून ३ किमी केल्याने १० मार्चपूर्वी अर्ज करणाऱ्या पाल्यांना दुरुस्थीची संधी देत अर्ज भरण्याकरिता १५ दिवसांची म्हणजे २५ मार्च पर्यंतची मुदतवाढ दिली होती. या दरम्यान शिक्षण विभागाकडे ७७३३ ऑनलाइन अर्ज प्राप्त झाले आहेत. जिल्ह्यात एकूण ७,६४४ विद्यार्थ्यांची प्रवेश क्षमता असून त्यापैकी २,६२६ जागा आरटीई अंतर्गत राखीव ठेवण्यात आल्या आहेत. सध्या २२७ शाळांमध्ये या जागांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. या प्रक्रियेपासून कोणताही पाल्य वंचित राहू नये, याकरिता शिक्षण विभागाकडून या प्रक्रियेला पुन्हा सहा दिवसांची मुदत वाढवून ३१ मार्चपर्यंत करण्यात आली आहे. पालकांनी मुदतवाढीचा लाभ घेऊन अर्ज सादर करावेत, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## वलगाव रोड,नवसारी येथे थकबाकीदार मालमत्तेवर मनपाची कारवाई

### जप्ती करून सीलिंग

**अमरावती/का.प्र.**

रामपुरी कॅम्प उत्तर झोन क्र. १ अंतर्गत येणाऱ्या वलगाव रोड, नवसारी परिसरात महानगरपालिकेने थकबाकीदारांवर मोठी कारवाई करत एक मालमत्ता जप्त करून सील केली आहे. सहायक आयुक्त नंदकिशोर तिखिले यांच्या आदेशानुसार ही कारवाई करण्यात आली असून, यामुळे थकबाकीदारांमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, वार्ड-५ मधील मालमत्ता क्रमांक ३०८८ ही मालमत्ताधारक मोहम्मद शकील यांच्या नावावर असून, संबंधित मालमत्तेवर एकूण रुपये १,९३,८१३ इतकी कर थकबाकी होती. महानगरपालिकेच्या कर वसुली विभागाकडून वारंवार नोटिसा देऊनही थकबाकीची रक्कम भरली गेली नाही. यानंतर



महानगरपालिकेने कठोर भूमिका घेत अखेर जप्ती व सीलिंगची कारवाई करण्याचा निर्णय घेतला.या कारवाई दरम्यान महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी संबंधित ठिकाणी भेट देत नियमानुसार संपूर्ण प्रक्रिया पार पाडली. मालमत्तेवर जप्तीची नोंद करून ती सील करण्यात आली. या वेळी परिसरातील नागरिकांनीही मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती.महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, कर थकबाकीदारांवर ही कारवाई पुढेही सुरू राहणार असून, कोणालाही सवलत दिली जाणार नाही. जे नागरिक आपला मालमत्ता कर वेळेत भरत नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. जप्ती, सीलिंग यांसारख्या उपाययोजना महानगरपालिकेकडून केल्या जातील, असा इशाराही देण्यात आला आहे.कर भरणा ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असून, शहराच्या विकासकामांसाठी हा महसूल अत्यंत महत्त्वाचा असल्याचेही अधिकाऱ्यांनी नमूद केले.

## प्रा.राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालयात पदवी वितरण समारंभ



**नांदगाव खंडेश्वर/वार्ताहर**

स्थानिक राजाभाऊ देशमुख कला महाविद्यालय येथे सत्र २०२४-२५ चा संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा पदवी वितरण सोहळा उत्साहात संपन्न झाला. प्राचार्य डॉ. श्रीकांत दांडगे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या पदवी वितरण समारंभात मान्यवरांच्या हस्ते उत्तीर्ण विद्यार्थ्यांना पदवी प्रदान करण्यात आली.

प्रारंभी संत गाडगेबाबा यांचे प्रतिमापूजन करण्यात आले, विद्यापीठ गीत व स्वागत समारंभानंतर संयोजक प्रा.डॉ. विवेक चौधरी यांनी प्रास्ताविक करतांना विद्यार्थ्यांनी पदवी प्राप्त केल्यानंतर येथून पुढे रोजगाराभिमुख उपक्रम व आपल्यातील कौशल्य विकासावर भर देऊन भविष्यातील वाटचाल करावी असे प्रतिपादन केले. पदवी प्राप्त केल्यानंतर देशातील एक जबाबदार नागरिक म्हणून सकारात्मक दृष्टिकोन जोपासत पुढे येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्याचे सामर्थ्य विद्यार्थ्यांमध्ये यावे तसेच स्पर्धा परीक्षा देण्याचा सातत्याने प्रयत्न करावा असा संदेश प्राचार्य डॉ. श्रीकांत दांडगे यांनी अध्यक्षीय मनोगतातून दिला. कार्यक्रमाला प्रा. डॉ. राजेश मेश्राम प्रा. डॉ. गौतम सातदिवे, प्रा. डॉ. शंभरकर, प्रा. अमर डांगे, प्रा. पंकज जयस्वाल, प्रा. बेलोरे, प्रा. खेडकर, प्रा. कु. शीतल मारोटकर, प्रा. कु. निकिता गावंडे तसेच सर्व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गौतम सातदिवे केले तर प्रा. डॉ. शंभरकर यांनी आभार व्यक्त केले.कार्यक्रमाला मोठ्या संख्येने पदवीकांक्षी व महाविद्यालयातील विद्यार्थी उपस्थित होते.

## शहीदांना रक्तदानातून मानवंदना; २३० बॉटल्सचे संकलन

**अमरावती/का.प्र.**

विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटी संचालित प्रो राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट येथे संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे, उपाध्यक्ष अँड. उदय देशमुख, कोषाध्यक्ष प्रा. डॉ. हेमंत देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कार्यकारी सदस्य नितीन हिवसे, डॉ. पूनमचौधरी,पंकज देशमुख,प्रा. विनय गोहाड,प्रा. गजानन काळे यांच्या मार्गदर्शनाखाली प्राचार्य डॉ अजय ठाकरे यांच्या नेतृत्वात विविध उपक्रमाचे आयोजन करण्यात येते याचाच भाग म्हणून राष्ट्रीय सेवा योजना व रेड रिबन क्लबच्या संयुक्त विद्यमाने शहीद दिनाचे औचित्य साधून रक्तदान शिबिराचे आयोजन उत्साहात पार पडले.



यावेळी २३० बॉटल्सचे संकलन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात शहीदांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून करण्यात आली. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे, विभाग प्रमुख, प्राध्यापकवर्ग, शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आपल्या मनोगतात प्राचार्यांनी शहीदांच्या त्यागाची आठवण करून देत रक्तदानासारख्या महान कार्याचे महत्त्व अधोरेखित केले. या रक्तदान शिबिरात विद्यार्थ्यांनी, शिक्षकांनी व कर्मचारी वर्गाने उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. शिबिरादरम्यान एकूण २२६ बॉटल्स रक्तसंकलन करण्यात आले असून, गरजू रुग्णांसाठी हे रक्त अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. तज्ञांच्या मते, अपघात, शस्त्रक्रिया, प्रसूती व गंभीर आजारांमध्ये रक्ताची तातडीची गरज भासते आणि अशा वेळी रक्तदातेच खरे जीवनदाता ठरतात. रक्त कृत्रिमरीत्या तयार करता येत नसल्यामुळे समाजातील प्रत्येक सक्षम व्यक्तीने नियमित रक्तदान करणे अत्यावश्यक आहे, अशी जाणीव या शिबिरातून करून देण्यात आली.

रक्तदान करणाऱ्या सर्व विद्यार्थी, शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये सामाजिक बांधिलकी, मानवता व सेवाभाव दृढ होतो, असे मत उपस्थितांनी व्यक्त केले.शिबिरासाठी शासकीय रक्तपेढी, इर्विन हॉस्पिटल अमरावती तसेच डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल हॉस्पिटल रक्तपेढी यांच्या वैद्यकीय पथकांना पाचारण करण्यात आले होते. प्रा. डॉ. संजय कुलकर्णी, प्रा. डॉ. महेंद्र भुतडा, अजय दातेराव, प्रमोद मिसाळ, डॉ. सुरभी सोनी, डॉ. ऋतुजा कराळे, डॉ. वैशाली चौधरी व त्यांच्या संपूर्ण टीमने रक्तसंकलन प्रक्रियेत मोलाचे योगदान दिले. तसेच डॉ. अजय साखरे, डॉ.अविनाश उकंडे, डॉ. प्रफुल पेदाम, मिलिंद तायडे, योगेश पानझडे व इर्विन शासकीय रुग्णालयाच्या टीमनेही अत्यंत तत्परतेने सहकार्य करून शिबिर यशस्वी केले. शिबिर दरम्यान विभाग प्रमुख डॉ. दिनेश हरकुट, डॉ. प्रीती खोडके, डॉ. कश्मिरा कासट, डॉ. अमित मोहोड, डॉ. लव्हलीसिंग मुतनेजा, डॉ. किरण डोंगरे, डॉ महेश जानोरकर,डॉ. लोभस घडेकर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले.

शिबिराचे यशस्वी आयोजन करण्यासाठी महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. शुभम कदम, महिला कार्यक्रम अधिकारी प्रा. अपर्णा खैरकार, सह-कार्यक्रम अधिकारी डॉ. किशोर ढाके, प्रा. विजय खंडार, प्रा. अतुल डहाणे, प्रा. अमोल नेरकर, अंकुर मोहोड तसेच रासेयो स्वयंसेवक अनुप भगत, जयवंत तीरमारे, अनुराग जगनाडे, कार्तिक कदम, प्रणव मुळे. अल्हाद रामटेके, शंतनु कदम, वेदांत पोहरे, देवयानी कळंबे, वैष्णवी चौधरी, देवयानी बावनकर, सिद्धी वाघळे, सांची घरडे, पुर्वश्री विखे, चिन्मयी घोटीकर, सलोनी भट्ट यांनी परिश्रम घेतले. संपूर्ण कार्यक्रमाचे नियोजन व अंमलबजावणी अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने करण्यात आली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय ठाकरे यांचे मार्गदर्शन लाभले.

## संक्षिप्त

### श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालयात शहिद दिन



**अंजनगाव सुर्जी**-देशात दरवर्षी २३ मार्च हा 'शहीद दिवस' म्हणून पाळला जातो. वीरपुत्रांच्या सर्वोच्च बलिदानाचे स्मरण करून त्यांना आदरांजली वाहण्यासाठी हा दिवस शहीद दिवस म्हणून संपूर्ण देशात पाळला जातो. या दिवसाचे औचित्य साधून श्रीमती राधाबाई सारडा महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी येथे सुदृढ कार्यप्रणाली समिती व राष्ट्रीय सेवा योजना यांच्या संयुक्त विद्यमाने आदरांजली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी कार्यक्रमाला प्रा.डॉ.ताई उके, डॉ.सत्येंद्र गडपायले, प्रा.सुरेंद्र किन्हीकर, सुदृढ कार्यप्रणाली समिती समन्वयक डॉ.संगीता छाबा तसेच रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ.नितीन घोडीले व डॉ.ममता येवतकर आदींची उपस्थिती लाभली.कार्यक्रमदरम्यान डॉ.गडपायले यांनी आपले विचार व्यक्त केले. कार्यक्रमाकरिता डॉ. समीर बिजवे, प्रा.भारती कोरडे, प्रा.आशा बाणाईत व डॉ.सुवर्णा झिलपे आदींची उपस्थिती लाभली. आयोजनाकरिता डॉ.विवेक पाटील, डॉ.चतुरानंद केदार, श्री.संतोष सरोदे व श्री.प्रशांत नांदुरकर आदींचे तसेच रासेयो स्वयंसेवक कु.क्षितिजा जैन, अविनाश वानखडे, भार्गवी सरकटे, प्रतिक्षा पवार, तृप्ती खराट तसेच पूर्वी थोरात आदींचे सहकार्य लाभले.

### तपोवनच्या सेवाकार्याने गहिवरले अधिकारी



**अमरावती-** डॉ. पंजाबराव देशमुख प्रशिक्षण प्रबोधनी मध्ये अमरावती व भंडारा जिल्ह्यातील आलेल्या ११० ग्रामीण महसूल अधिकाऱ्यांनी विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवनला सदिच्छा भेट देत तेथील कार्याची पाहणी केली. तपोवनात राहणाऱ्या कुष्ठ रुग्ण महिलांच्या आयुष्याची कथा ऐकताना व तपोवन त्यांच्या पुनर्वसनासाठी करीत असलेले कार्य बघून समस्त अधिकारी गहिवरले. एक महिन्याच्या प्रशिक्षणासाठी आलेल्या सर्व अधिकाऱ्यांना प्रबोधनीचे संचालक अतिरिक्त आयुक्त डॉ. अजय लहाने,सहयोगी प्रा. डॉ. श्यामकांत, मस्केकोर्स कॉर्डिनेटर तथा तहसीलदार निकेता जावरकर, प्रा. प्रशांत सवाई,स्वागत ढोके यांनी मानवतावादी कार्याचे विद्यापीठ असलेल्या पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या ८० वर्ष जुन्या विदर्भ महारोगी सेवा मंडळ तपोवन च्या कार्याचा परिचय व्हावा म्हणून सदिच्छा भेट ठेवली होती. सुरुवातीला सर्व अधिकाऱ्यांचे स्वागत संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. सुभाष गवई यांनी पुस्तक देऊन केले. त्यानंतर तहसीलदार व कोर समन्वयक निकेता जावरकर यांनी तपोवन ची माहिती अधिकाऱ्यांना दिली. त्यानंतर प्रास्ताविका संस्थेची उपसचिव ऋषिकेश देशपांडे यांनी दाजीसाहेब व संस्थेच्या कार्याचा संक्षिप्त परिचय करून दिला.संचालन उपसचिव ऋषिकेश देशपांडे यांनी केले. प्रदर्शनी शांतीकुंज, विक्री केंद्राची माहिती उपअधीक्षक योगेश करडे यांनी दिली.याप्रसंगी विश्वस्त भिमराव ठवरे अंतर्गत व्यवस्थापक निवृत्ती वेलकर भास्कर शेटये आहे आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### युवा सेना अमरावती विभागाचा मेळावा उद्या

**अमरावती**-विभागातील अमरावती, अकोला, बुलढाणा, यवतमाळ व वाशिम या जिल्ह्यांतील युवा सेनेच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांचा भव्य विभागीय मेळावा २९ मार्च २०२६ (रविवार) रोजी सकाळी ११:०० वाजता अमरावती येथील रंगोली पर्ल हॉटेल, नवाथे चौक येथे आयोजित करण्यात आला आहे. मेळाव्यास युवा सेनेचे कार्याध्यक्ष पूर्वेश प्रताप सरनाईक, युवा सेना मुख्य सचिव तथा शिवसेना प्रवक्ते राहुल लोंढे, युवा सेना राज्य सचिव किरणजी साळी, युवा सेना सहसचिव तथा राज्य कार्यकारिणी सदस्य ऋषी जाधव, युवा सेना कार्यकारिणी सदस्य दामिनी राठोड, पश्चिम विदर्भ निरीक्षक राहुल कराळे व विशालजी गणात्रा, तसेच बुलढाणा नगर परिषद गटनेते कुणाल गायकवाड, कार्यकारिणी सदस्य सौरभ नागोसे यांच्यासह शिवसेनेचे अमरावती जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.विभागातील सर्व जिल्हा, तालुका, शहर व शाखास्तरीय युवा सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन युवा सेना विभागीय सचिव विठ्ठलजी सरप पाटील, अमरावती लोकसभा अध्यक्ष प्रविण दिधाते, जिल्हाप्रमुख प्रितेश अवघड, राम पाटील व युवती सेना जिल्हाध्यक्ष कोमल बद्रे यांनी केले आहे.

### गॅसच्या टंचाईमुळे ग्रामीण भागात पुन्हा पेटल्या चुली

**नांदगाव खंडेश्वर-** गॅस सिलेंडरच्या तीव्र टंचाईमुळे ग्रामीण भागातील महिलांवर पुन्हा चुली पेटवण्याची वेळ आली असून या गॅस टंचाईच्या काळात गृहणीसह व्यावसायिकांचे सुद्धा हाल होत आहे ग्रामीण भागातील अनेक वर्षापासून अडगडीत पडलेल्या चुली पुन्हा बाहेर काढून वापरात आणल्या जात असल्याचे चित्र ग्रामीण भागातून दिसून येते हल्ली गॅसच्या टंचाईमुळे स्वयंपाक पद्धतीत चुल पेटविणे धुर सहन करणे हा त्रास महिलांना पुन्हा सहन करावा लागत आहे त्यामुळे डोळ्यांची जळजळ श्वसनाचा त्रास इत्यादी आरोग्याच्या समस्या महिलांमध्ये निर्माण होत असल्याच्या तक्रारी सुद्धा वाढत आहे त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील व्यवसायिकांना सुद्धा गॅस टंचाईचा फटका बसून त्यांच्या व्यवसायावर सुद्धा परिणाम होत आहे गॅस सिलेंडर वेळेवर मिळत नसल्याने वेळ आणि श्रम या दोन्ही मध्ये वाढ झाली असून ग्रामीण भागात गॅस सिलेंडर वेळेवर मिळणे कठीण झाले असल्याने ग्रामीण भागातील महिलांना चुलीवर स्वयंपाक करावा लागत लागत आहे त्यासाठी लागणारे लाकूड (इंधन) चे भाव खूप वाढले शिवाय महागाई वाढत चालली असल्याने इंधन विकत घेणे परवडत नाही गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक त्रस्त झाले असून व्यवसायिकांना सिलेंडर मिळविण्यासाठी मोठा संघर्ष करावा लागत आहे परिणामी ग्रामीण भागातील हॉटेल व्यावसायिकांनी पुन्हा जुन्या पद्धतीने लाकडी भट्टीवर व्यवसाय सुरू केला आहे हल्ली गॅसच्या टंचाईमुळे चहा नाश्ता जेवण पाहुण्यांसाठी व्यवस्था करणे गृहनिला कठीण झाले.

# जुनी पेन्शन योजनेसाठी लढा : सामाजिक सुरक्षेचा निर्णायक प्रश्न

भारतीय लोकशाही व्यवस्थेत सामाजिक न्याय, समता आणि सुरक्षित जीवनाचा हक्क हे केवळ घटनात्मक तत्त्व नसून ते राज्याच्या धोरणांमधून प्रत्यक्षात उतरले पाहिजेत. शासकीय सेवेत कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांनी आपले संपूर्ण आयुष्य सार्वजनिक सेवेकरिता अर्पण केल्यानंतर त्यांना निवृत्तीनंतर सन्मानपूर्वक जीवन जगता यावे, यासाठी पेन्शन ही संकल्पना अस्तित्वात आली. त्यामुळे पेन्शन ही कोणतीही दानधर्माची योजना नसून ती कर्मचाऱ्यांचा हक्क आहे, ही बाब अधोरेखित करणे अत्यंत आवश्यक आहे.

जुनी पेन्शन योजना ही निश्चित लाभ तत्वावर आधारित होती. कर्मचाऱ्याच्या शेवटच्या वेतनाच्या ठराविक टक्केवारी नुसार त्याला आयुष्यभर पेन्शन मिळत असे. यामुळे निवृत्तीनंतर आर्थिक सुरक्षितता आणि मानसिक स्थैर्य प्राप्त होत असे. मात्र १ नोव्हेंबर २००५ नंतर केंद्र सरकारने नवीन पेन्शन योजना लागू करताना जुनी योजना बंद केली आणि पेन्शनचा संपूर्ण स्वरूपच बदलून टाकले.

जुनी पेन्शन योजना बंद करण्यामागचे प्रमुख कारण म्हणून आर्थिक उदारीकरण, खाजगीकरण आणि जागतिकीकरण धोरणांचा उल्लेख केला जातो. १९९१ नंतर भारतीय अर्थव्यवस्थेत मोठ्या प्रमाणावर संरचनात्मक बदल झाले. सार्वजनिक क्षेत्रातील उद्योगांचे खाजगीकरण, सरकारी खर्चावर नियंत्रण, आणि बाजाराभिमुख धोरणे यामुळे सरकारने आपल्या आर्थिक जबाबदाऱ्या कमी करण्याचा प्रयत्न केला. पेन्शनसारखी दीर्घकालीन जबाबदारी ही सरकारला आर्थिकदृष्ट्या ओझे वाटू लागली आणि त्यामुळेच राष्ट्रीय पेन्शन योजनेसारखी बाजारावर आधारित योजना लागू करण्यात आली.

परंतु, येथे एक मूलभूत प्रश्न उपस्थित होतो, कर्मचाऱ्यांच्या सामाजिक सुरक्षेची जबाबदारी सरकार टाळू शकते का? राष्ट्रीय पेन्शन योजनेअंतर्गत कर्मचाऱ्यांचे योगदान आणि सरकारचे योगदान शेअर बाजारात गुंतवले जाते. त्यामुळे पेन्शनची हमी संपुष्टात येते आणि ती बाजारातील चढ-उतारांवर अवलंबून राहते. यामुळे निवृत्तीनंतरची आर्थिक स्थिरता धोक्यात येते. विशेषतः मध्यम वर्गीय आणि निम्नम ध्यमवर्गीय कर्मचाऱ्यांसाठी ही परिस्थिती अधिक चिंताजनक आहे. जुनी पेन्शन योजना बंद होण्यामागे केवळ खाजगीकरण हे एकमेव कारण आहे, असा सरसकट निष्कर्ष काढणे वास्तवाच्या पूर्ण चित्राला न्याय देत नाही. खरे तर वाढती लोकसंख्या, आयुर्मानातील वाढ, सरकारी खर्चातील वाढ, आणि महसूल तुटीचा दबाव ही देखील महत्त्वाची कारणे आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची जबाबदारी सरकारने पूर्णपणे झटकावी.




आज देशभरात जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर आंदोलन उभे राहत आहे. महाराष्ट्र राज्यांमध्ये वितेश खांडेकर, गोविंद उगले, आशुतोष चौधरी , नदीम पटेल, गौरव काळे, प्रज्वल घोम, अमोल गुडदे, सोनार मामा, प्रा. प्रशांत विघे, अरविंद सुरवसे, डॉ श्रीकांत भोवते, प्रदीप पाटील, प्रा. खुशाल ढवळे अशी शिक्षक, कर्मचारी मंडळी महाराष्ट्रात शिक्षण व इतरही शिक्षकेतर कर्मचारी असलेल्या विविध संघटना रस्त्यावर उतरल्या आहेत. या आंदोलनामागे केवळ आर्थिक मागणी नाही, तर 'सुरक्षित भविष्य' ही मूलभूत भावना आहे.

जुनी पेन्शन योजना हा केवळ आर्थिक नव्हे तर सामाजिक सुरक्षेचा मूलभूत प्रश्न आहे. पेन्शन ही गुंतवणूक नसून निवृत्तीनंतरच्या सन्मानपूर्वक जीवनाची हमी आहे, त्यामुळे ती बाजाराच्या जोखमीवर सोडणे योग्य ठरत नाही. केंद्र व राज्य सरकारांमधील समन्वयाचा अभाव आणि मर्यादित आर्थिक साधने ही मोठी अडचण आहेत. याचवेळी रोजगाराच्या संधी घटत असून कंत्राटीकरण वाढल्याने स्थिर नोकरी व पेन्शन दोन्ही धोक्यात आले आहेत. या प्रश्नाचे वाढते राजकारणही वास्तवापासून दूर नेणारे ठरत आहे. तरीही, योग्य नियोजन आणि धोरणात्मक निर्णयांद्वारे जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू करणे अशक्य नाही.

जुनी पेन्शन योजना पुनर्स्थापित करण्यासाठी केवळ मागण्या पुरेशा ठरणार नाहीत, तर शासनावर सातत्याने प्रभावी दबाव निर्माण करणे ही काळाची गरज आहे. यासाठी शिक्षक व कर्मचारी यांनी संघटितपणे, एकजुटीने आणि शिस्तबद्ध पद्धतीने लढा उभारणे अत्यावश्यक आहे. आपल्या प्रश्नांना योग्य दिशा देण्यासाठी आणि त्यांना विधिमंडळात प्रभावीपणे मांडण्यासाठी सक्षम व बांधिल नेतृत्व सभागृहात पाठवणे गरजेचे आहे. यासाठी शिक्षक मतदारसंघातून आपल्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करणारे, प्रामाणिक व अभ्यासू उमेदवार निवडून देणे ही जबाबदारी प्रत्येक शिक्षकाने ओळखली पाहिजे. अंतर्गत मतभेद, गटबाजी आणि वैयक्तिक स्वार्थ बाजूला ठेवून व्यापक हितासाठी एकत्र येणे आवश्यक आहे. ज्या-ज्या स्तरावरून आपले प्रतिनिधी सभागृहात पाठवता येतील, त्या सर्व माध्यमांचा उपयोग करून आपला आवाज शासनापर्यंत पोहोचवणे आवश्यक ठरेल.



सातत्यपूर्ण प्रयत्न, संघटित शक्ती आणि सक्षम नेतृत्व यांच्या माध्यमातूनच जुनी पेन्शन योजना पुन्हा लागू होऊ शकते; अन्यथा संघर्ष टाळता येणार नाही, हे निश्चित आहे.

**प्रा. डॉ. प्रशांत विघे**
राज्यशास्त्र विभाग प्रमुख
भारतीय महाविद्यालय,
अमरावती
मो.९३२६८७७७४९

# घटस्फोटांचे वाढते प्रमाण चिंताजनक !

नॅशनल फॅमिली हेल्थ सर्व्हेनुसार भारतात साधारणतः २० वर्षांपूर्वी ०.६% विवाहित महिला घटस्फोटित किंवा विभक्त होत्या, आता हे प्रमाण १% झाले आहे. पुणे स्टडी १९८६-८७ नुसार, घटस्फोटाच्या प्रकरणांपैकी ६७ टक्के खटले पतींनी दाखल केले होते नवीन आकडेवारीनुसार घटस्फोट घेण्यासाठी खटले दाखल करणाऱ्यांमध्ये ५८% महिला आहेत. मुंबई फॅमिली कोर्टाच्या एका अभ्यासानुसार, ४०% प्रकरणांत लग्नानंतर ३ वर्षांतच संबंध दुरावतात. घटस्फोट मागणाऱ्या महिला बऱ्याचदा २५ ते ३४ वयोगटातील असतात. दरवर्षी घटस्फोटांची जेव्हढी प्रकरणे न्यायालयात निकाली काढली जातात, तेव्हढीच किंबहुना त्याहून अधिक नवीन प्रकरणे न्यायालयांत नव्याने प्रविष्ट केली जातात. त्यामुळे येणाऱ्या काळात देशाची कुटुंबव्यवस्था संकटात येण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तरुण पत्नी पत्नी विभक्त झाल्याने सर्वाधिक परिणाम त्यांच्या अपत्यांवर होतात. अशा अपत्यांमध्ये एकलकोंडेपणा, द्वेष, चिडचिड करणे, सूडभावनेने वागणे यांसारखे दोष प्रकर्षाने दिसून येतात. घटस्फोटित पालकांची मुले नकळतपणे गुन्हेगारीकडे वळत असल्याचे निरीक्षणही अहवालात नोंदवण्यात आले आहे. पश्चिमी देशांच्या तुलनेने भारतात होणाऱ्या घटस्फोटांची टक्केवारी कमी असली, तरी आज या प्रकारांवर नियंत्रण आणले नाही, तर भविष्यात ती भीषण स्वरूप धारण करू शकते, ज्याचा परिणाम सामाजिक व्यवस्थेवर होऊ शकतो.




शहरासारख्या ठिकाणी राहणाऱ्या जोडप्यांमध्ये ग्रामीण भागाच्या तुलनेत घटस्फोटांचे प्रमाण अधिक आहे. शहरी भागात राहणारे बहुतांश तरुण पती पत्नी दोघेही नोकरी किंवा व्यवसाय करणारे आणि बऱ्यापैकी धन कमावणारे असतात. कार्यालयात उच्च पदावर असताना इतरांकडून मिळणारा मानसन्मान, सुधारित राहणीमान यामुळे राहणीमानाचा आणि पदाचा काही प्रमाणात अहंकार निर्माण होऊ लागतो. घरी जोडीदाराकडूनही अशाच सन्मानाची अपेक्षा केली जाते. तो तितक्या प्रमाणात न मिळाल्यास लहान सहान प्रसंगांतून खटके उडू लागतात. खटक्यांचे रूपांतर वादात होते. कधी कधी हे वाद विकोपाला पोहोचतात. सातत्याने असे प्रसंग घडू लागल्यास जोडीदारासोबत राहणे नकोसे वाटू लागते. माघार घेण्याची सवय नसल्याने वितुष्ट वाढत जाऊन प्रकरण घटस्फोटापर्यंत पोहोचते. नोकरीच्या निमित्ताने कार्यालयातील सहकारी तसेच कार्यालयाशी संबंधित व्यक्ती यांच्याशी सातत्याने संपर्क येत असल्याने काही वेळा पती किंवा पत्नीचे विवाहबाह्य संबंध निर्माण होतात ज्यामुळे जोडीदारांत वाद होऊन नात्यात भेग निर्माण होते. काहीवेळा विवाहाआधी घडलेले प्रसंग, आजार किंवा जीवनातील एखादी गंभीर घटना याविषयी समोरच्यांशी मोकळेपणाने बोलले जात नाही. या गोष्टी विवाहानंतर लक्षात आल्यावर विश्वासघाताची भावना मनात निर्माण होऊन नात्यातील जवळीकता लोप पावू लागते.

पतिपत्नीचे नाते बहरण्यासाठी एकमेकांना समजून घेणे, एकमेकांना गुणदोषांसह स्वीकारणे, परस्परांशी मनमोकळेपणाने बोलणे, एकमेकांना प्रोत्साहन देणे, आवश्यक तिथे तडजोड करणे, माघार घेणे, परस्परांमध्ये विश्वासाचे नाते निर्माण करणे या गोष्टी प्राथमिक टप्प्यावर अत्यंत आवश्यक असतात. आपला अहंकार जपत राहिल्यास लहान सहान प्रकरणात विनाकारण मनात क्लेश निर्माण होऊन नात्यातील प्रेम लोप पावू लागते.

आताच्या पिढीवर अनैतिकता पसरवणारे चित्रपट, कुटुंबव्यवस्थेला छेद देणाऱ्या मालिका, वासनांधतेने भरलेल्या वेब सिरीज यांचा प्रभाव अधिक आहे. विवाहसंस्था आणि कुटुंबव्यवस्था यांना तुच्छ लेखणाऱ्या या चित्रपट-मालिकांमध्ये विवाहबाह्य संबंध, गृहकलह, घटस्फोट यांसारखे विषय चवीने चघळले जातात. लिव्ह इन रिलेशिनशिपसारख्या पाश्चिमात्य विकृतीला देशात कायद्याचे संरक्षण असल्याने घटस्फोट घेणे किंवा एक जोडीदार असताना दुसऱ्यासोबत राहणे आजच्या आधुनिक म्हणवणाऱ्या पिढीला तितकेसे चुकीचेही वाटत नाही. भारतीय कुटुंब व्यवस्था टिकवायची असेल, तर या व्यवस्थेचे लाभ महाविद्यालयीन शिक्षणातून शिकवले जायला हवेत त्यासोबतच चित्रपट, मालिका, वेब सीरिज यांतुन भारतीय संस्कृतीला छेद देणारे प्रसंग, कथानक, संवाद यांवर निर्बंध आणणे आज आवश्यक बनू लागले आहे.

**जगन घाणेकर**

# 'प्रोटीन डाएट'चे धोके

वजन कमी करण्यासाठी किंवा स्नायू वाढवण्यासाठी अनेकदा 'हाय प्रोटीन डाएट'चा (उदा. पोळी-भात बंद करून केवळ अंडी, चिकन किंवा मोड आलेली कडधान्ये खाणे) वापर होतो. मात्र, हे आरोग्यासाठी घातक ठरू शकते:

**१. ऊर्जेचा अभाव:** कर्बोदके (पोळी, भात) बंद केल्यास मेंदू आणि स्नायूंना मिळणारी ऊर्जा कमी होते.

**२. जीवनसत्त्वांची कमतरता:** फळे आणि भाज्या टाळल्यामुळे लोह, फॉलिक ॲसिड आणि फायबरची कमतरता निर्माण होते.

**३. किडनी आणि यकृतावर ताण:** प्रथिनांच्या पचनासाठी यकृत आणि किडनीला अतिरिक्त काम करावे लागते, ज्यामुळे ते निकामी होण्याचा धोका असतो.

**४. इतर समस्या:** बद्धकोष्ठता, निर्जलीकरण (अर्श्लूदह), तोंडाला दुर्गंधी येणे आणि हाडांमधील कॅल्शियम कमी होणे असे त्रास उद्भवू शकतात.

# अती तेथे माती

प्रथिने शरीरासाठी अत्यंत आवश्यक असली, तरी 'अती तिथे माती' हा नियम येथेही लागू होतो. जेव्हा आपण गरजेपेक्षा जास्त प्रथिने घेतो, तेव्हा त्याचे शरीरावर खालीलप्रमाणे दुष्परिणाम होऊ शकतात:

**१. मूत्रपिंडावर ताण-** अतिरिक्त प्रथिनांचे पचन होताना शरीरात युरिया आणि इतर उप-उत्पादने तयार होतात. ही टाकाऊ द्रव्ये बाहेर टाकण्यासाठी मूत्रपिंडाला अधिक काम करावे लागते. जर कोणाला आधीच किडनीचा त्रास असेल, तर प्रथिनांचा अतिवापर स्थिती अधिक गंभीर करू शकतो.

**२. पचनसंस्थेच्या तक्रारी**

विशेषतः जेव्हा लोक फक्त प्रथिनांवर भर देतात आणि आहारात फायबर (तंतुमय पदार्थ) कमी करतात, तेव्हा बद्धकोष्ठता पोट फुगणे किंवा गॅस होणे यांसारख्या समस्या जाणवतात.

**३. डिहायड्रेशन (पाण्याची कमतरता)-** जास्तीची प्रथिने शरीराबाहेर टाकण्यासाठी पाणी जास्त लागते. यामुळे शरीरातील पाणी कमी होऊन डिहायड्रेशन होऊ शकते, ज्यामुळे थकवा आणि चक्कर येण्यासारखे प्रकार घडू शकतात.

**४. हाडांचे आरोग्य आणि इतर धोके-** काही संशोधनानुसार, अति-प्रथिनांमुळे शरीरातील कॅल्शियम लघवीवाटे बाहेर पडण्याचे प्रमाण वाढू शकते, ज्यामुळे हाडे कमकुवत होण्याचा धोका असतो. तसेच, सप्लीमेंटमध्ये कृत्रिम गोडवा किंवा प्रिझर्व्हेटिव्हज असल्यास यकृतावरहा ताण येऊ शकतो.

सामान्यतः एका निरोगी व्यक्तीला त्यांच्या वजनाच्या प्रति किलो ०.८ ते १.० ग्राम प्रथिनांची गरज असते. जिम किंवा कडक व्यायाम करणाऱ्यांसाठी हे प्रमाण थोडे जास्त असू शकते. त्यामुळे सप्लीमेंट सुरू करण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला घेणे नेहमीच हिताचे ठरते.

एका नजरेत: प्रथिनांचे प्रमाण (प्रति १०० ग्रॅम)

१. मूग डाळ : सुमारे २२ ग्रॅम. २. तूर डाळ : सुमारे २२ग्रॅम. ३. चना डाळ : सुमारे २५ ग्रॅम. ४. मूठ डाळ : सुमारे २५ ग्रॅम. ५. राजमा : सुमारे २५ ग्रॅम. ६. काळा चना: सुमारे २० ग्रॅम. ७. सोया डाळ : सुमारे ३६-४० ग्रॅम. ८. पिवळी मटकी : सुमारे २३ ग्रॅम९. मसूर डाळ : सुमारे २५ ग्रॅम१०. पाण्याच्या डाळी : सुमारे २१ ग्रॅम.

# अष्टशती 'श्वेतवर्णी श्यामकर्णी' अश्व विश्वामित्रचा गेम

**महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ अंतर्गत ७१ वा प्राथमिक नाट्य महोत्सव स्पर्धा २०२५-२६ स्व. भाऊसाहेब लिमये सभागृह सिपना कॉलेज, अमरावती येथे कामगार कल्याण मंडळ राधानगर अमरावती वतीने, २२ वे नाटक 'श्वेतवर्णी श्यामकर्णी' सादर झाले.**

जितेंद्र देशपांडे लिखित व डॉ. श्याम देशमुख दिग्दर्शित या नाटकात चार राजे, ब्रम्हर्षी विश्वामित्र, शिष्य गालव व राजकन्या माधवी या चारित्र्यात नटलेल्या पात्रांचा परिचय म्हणजे समारंभात कार्यक्रम पत्रिका वाचून दाखवणाऱ्या नवख्या सूत्रसंचालकाप्रमाणे.

सतारीचे स्वरात पडदा उघडत तपस्वी विश्वामित्र यज्ञकुंडासमक्ष घोड्यांच्या टापा व स्वप्नाळू हलचल. सहस्त्र अश्वदान प्रियजन स्वीकार करा!! असे आवाहन. पट्यशिष्य गालव गुरुचरणी आराधना करताना विद्यापूर्ती नंतर गुरुदक्षिणा देण्याचा अनुग्रह करतो. अनार्यमुळे दक्षिणी प्रदेशात आर्यवताचे कार्य बाकी असल्याने तिथे काम कर! अशी आज्ञा गुरु देतो, मात्र त्यापेक्षा थोडं आणखी काही मागा असा आग्रह करताना, श्वेतवर्णी! शामकर्णी!! अष्टशती अश्व मागणी गालवापुढे विश्वामित्र ठेवतात. इच्छेत अहंकाराचा दर्प त्यासाठी आग्रह करून अश्वप्राप्तीची दक्षिणा म्हणजे चक्रवर्ती होण्यासाठी सर्व सम्राट आपल्याकडे येऊन राज सत्तेवर धर्मसत्ता आरुढ ठेवण्याच्या मनसुबा, ब्रम्हर्षी विश्वामित्र सुप्तपणे व्यक्त. गुरूआज्ञा घेऊन झोळी व संन्यासवस्त्रात गालव अष्टशती अश्व तेही श्वेतवर्णी! श्यामकर्णी!! या द्वंद्वात विव्हळत. अनुग्रह पूर्ण कार्यासाठी विचारांती राजा ययातीचे स्मरण, लगेच निर्गमन. हस्तीनापुर राजा ययाती विश्वामित्र शिष्य मुनिकुमार गालवचे आदरातिथ्य करून त्यांचा अनुग्रह पूर्ण करताना रूपवान राजकन्या माधवी लाच अश्वाऐवजी अश्वमेध यज्ञाकार्यासाठी गावलचे सुपूर्द करते व अयोध्या नरेश हरेश्वकडे अनुष्ठित अश्व असल्याचे सुचवून माधवीचे मदतीने ते मिळवण्याची मसलत. राजकन्या वेषातून साध्वी वेषात माधवी? गालव सोबत निघते. अष्टशती अश्व प्राप्तीसाठी उभय प्रयास यावेळी रानातून जाताना राजकन्या निसर्गाचा मनसोक्त आस्वाद घेत साध्वी वेषात वनी शास्त्रीय नृत्य. खगथव्यांच दृश्य पाहून मोहून गेलेली माधवी अतिप्रसन्न. तेवढ्यात गालव धावत येतो. रस भंग झालेली राजकुमारी गालववर चिडते. भानावर येत प्रश्नांकित माधवी गालवकडे आपले स्थान निश्चिती वेळी वस्तू की



व्यक्ती? कारण सहवासातून निर्माण झालेल्या ऋणानुबंधाची उकल करताना जडणाराभाव तारुण्य व गालवचे तपस्वीरूप, तारुण्य अशा स्थितीत कर्तव्य पूर्तीसाठी सहयोगी म्हणून गालवचे माधवीला उत्तर. हरेश्व राजाकडे प्रस्थान व अष्टशती अश्वाची मागणी करताना ठरल्याप्रमाणे ययातीकन्या माधवीला चक्रवर्ती सम्राट प्रसूत कार्यस्तव माधवीची कुश वापरण्याचे मोबदल्यात द्विशती अश्व मिळवित, पुढील अश्व तजवीज साठी काशी नरेश दिवोदास कडे निर्गमन. यावेळी माधवीने जन्माला घातलेल्या बाळाला (राजबिंड वगैरे वर्णन) सोडून मातृकुश वात्सल्य व कर्तव्य भावनेतून निर्गमित होताना, माधवीच्या काळजाची होणारी ताटातूट. प्रवासात भावनाशून्य या आरोपाखाली माधवी व गालव संबंधाचे संभाषण अत्यंत हृदयस्पर्शी. गालवाचे आव्हानं आणि माधवीची होरपळ. मात्र कर्तव्यपूर्तीसाठी खंबीर राजकन्या माधवी पुढील नियोजनात औषीनारकडे निघते. येथे उर्वरित अश्व मागणी करताना, पुन्हा द्विशती अश्वच असल्याने माधवी व गालव, त्यांचा स्वीकार करते. पुढे श्वेतवर्णी श्यामकर्णी अश्व या भूतलावर नसल्याचे गालवला कळताच प्रत्यक्ष ब्रम्हर्षी विश्वामित्र यांनी हे रचलेले षडयंत्र का? कारण त्यांच्या वडिलांनी केलेल्या अश्वमेध यज्ञाकार्यावेळी सहस्त्र आश्वापैकी चारशे अश्व पुरात वाहून गेल्याने आता अश्व प्राप्तीचे मार्ग बंद झाले. तेव्हा माधवीला ब्रम्हर्षी विश्वामित्रचे स्वाधीन करण्याखेरीज गालव कर्तव्य मुक्ती नाही. कारण सुमारे तीन अपत्य होई पर्यंतचा सहवास गालवचे सानिध्यात गेलेली माधवी गुरुमाता म्हणून सरतेशेवटी गालवच्या आयुष्यात उरते हा विश्वामित्रचा डबल गेम या नाटकाचा सार आहे.

चक्रवर्ती सम्राट होण्यासाठी संन्यास, तपश्चर्या तूर्त बाजूला सारून, माधवीचा भोग घेण्यासाठीचा योग, घडवून आणणारे विश्वामित्राचे डावपेच, ययाती यदु व पुरु या पुत्राऐवजी साम्राज्य नावलौकिकासाठी माधवीकडून झालेल्या (पौत्र)वंशाचे सामर्थ्य. कारण यौगिक अनुष्ठान करून यौवनकांतीचे आशीर्वादाने माधवीची कुश समृद्ध होत असल्याने ययातीने माधवी कन्यादान व गालवच्या निरागस हेतूचा गैरलाभ. माधवीची मेधा व गालवला वैराग्य, यावेळी स्वयंवर नाकारून निद्रेच्या अभिलाषेत हवनकुंडा समक्ष ध्यानस्थ माधवी वर क्लायमॅक्स. नेपथ्यात शामवर्णी श्वेतकर्णी अश्वदर्शन, हलक्या हरित रंगाने अरण्य दर्शन, राज सिंहासन रॉयल किचन चेअर, चिनीमातीचा कमंडलू, औषिनार वेळी कॉमेन्ट्री, नाटकात विश्वामित्र उत्तरदेशी व दक्षिणी पार्श्वसंगीत, ययाती जडजिव्हा उच्चारण, सोहळ्यात पाय अकडला तो काढतानाचा (बालिश) प्रसंग. दोन राजे अनवाणी, माधवीचे साध्वी वेशातील वर्तन म्हणजे अजानबाहू यत्न, मातृत्व व भावशून्य प्रसंगात अल्पाश्रू, नजरेत वात्सल्य व रोमांच ऐवजी कटाक्ष माधवीने जास्त ठेवला.

ययाती सोडून सर्वांचे पाठांतर ठीक, अयोध्येचा राजा हिंदी मराठीत शब्दोच्चार. अभिनय संहितेनुसार मात्र श्वेतवर्णी शामकर्णी यातून रटाळ दर्प नाटकाला पौराणिकत्वाकडे पूर्ण झुकवू शकला नाही. बालनाट्य सारखे गेले असा दर्शक सूर. भारदस्त वेशभूषा व अल्पशी नेपथ्य रचनेने या नाटकाचा पौराणिक कथेचा सार सारासार संगीतात वादळापेक्षा विमान उडण्याचा भास, विजेच्या ठिकाणी तलवारीचा ढालीवर वार असा तोल. बाकी सारे आलबेल.

विश्वामित्र डॉ. मनोज उज्जैनकर, ययाती ॲड. प्रेमळवार, एड. राजा हरेश्व कपिल गुप्ता, राजा देवदास एड. सतीश उपाध्याय तर गालव किशोर तळोकार आपल्या भूमिकेवर ठाम असताना चारपाच वर्षात थोडा फार बदल वेष रंगभुषेत केला असत, सिद्धी काळेचे उत्तम पाठांतर मात्र संवाद अलवचिकमुळे अभिनयाशी समरस व्हायला दिग्दर्शक मेहनत घेतील? संगीत/प्रकाश योजना आकाश (पांडे) गिरमकर, नेपथ्य खुश श्याम देशमुख, रंग वेशभूषा कीर्ती अभिजित देशमुख सह पौराणिक नाटक प्रा. एम. टी. नाना देशमुख यांच्या मार्गदर्शनात दर्शकांना बघता आले. एक टक नाटक बघताना जे टिपले (समीक्षण) ते छापले.

**कबीर फादर**
मो. ७७९८६४५५६५

# महिला व बालकांच्या पोषणात सुधारणा करण्याचे लक्ष्य- मुख्यमंत्री

## महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन यांच्यात सामंजस्य करार

**मुंबई/ जनमाध्यम**

राज्यातील कुपोषणावर प्रभावी नियंत्रण मिळवून महिला व बालकांच्या आरोग्य आणि पोषणात लक्षणीय सुधारणा घडवून आणण्याच्या दिशेने महाराष्ट्राने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. महिला व बाल विकास विभाग आणि चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशन (CIFF) यांच्यात पाच वर्षांचा सामंजस्य करार (MoU) करण्यात आला असून, या भागीदारीमुळे मातृ व बाल पोषण निर्देशांकात मोठी उंची गाठली जाईल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला आहे.

महिला व बाल विकास विभागाचे सचिव डॉ. अनुपकुमार यादव यांच्या उपस्थितीत हा करार झाला. यावेळी तर्फे चिल्ड्रन्स इन्व्हेस्टमेंट फंड फाउंडेशनच्या कार्यकारी संचालक मंजुला सिंग, डायरेक्टर स्ट्रॅटेजिक इनिशिएटिव्हज अँड पार्टनरशिप्स अखिल पाळीअथ आणि अन्य वरिष्ठ प्रतिनिधी उपस्थित होते. या कराराअंतर्गत कुपोषणावर प्रभावी नियंत्रणासाठी विशेष भर देण्यात येणार आहे. प्रधानमंत्री मातृ वंदना योजना (PMMVY) सारख्या थेट लाभ हस्तांतरण योजनांचा लाभ अधिकाधिक पात्र महिलांपर्यंत पोहोचवून त्यांचा प्रभावी वापर सुनिश्चित केला जाणार आहे. सुरुवातीच्या टप्प्यात पालघर, जालना, नंदुरबार, गडचिरोली आणि अमरावती या जिल्ह्यांमध्ये सघन अंमलबजावणी करण्यात येणार असून राज्यस्तरावरही तांत्रिक सहाय्य दिले जाणार आहे. तसेच, CIFF कडून पोषण व सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांची नियुक्ती करून प्रभावी जनजागृती आणि संदेशवहनाला चालना दिली जाणार आहे. गर्भधारणेपासून बालकाच्या आयुष्यातील पहिल्या १,००० दिवसांदरम्यान योग्य पोषण आणि आरोग्य सवयी रुजवण्यासाठी व्यापक मोहीम राबविण्यात येणार आहे. पुराव्यावर आधारित उपाययोजना, तांत्रिक सहाय्य आणि क्षेत्रीय कर्मचाऱ्यांच्या क्षमता विकासाच्या माध्यमातून सेवा अधिक सक्षम केली जाईल. कार्यक्रमांचे रिअल-टाईम निरीक्षण, डेटा-आधारित निर्णय प्रक्रिया आणि सक्षम मॉनिटरिंग प्रणालीमुळे योजनांची गुणवत्ता आणि परिणामकारकता वाढविण्यात येणार आहे. या भागीदारीमुळे सेवा वितरण यंत्रणा अधिक बळकट होऊन महिला व बाल विकास विभागाच्या योजनांची पोहोच आणि गुणवत्ता वाढेल. परिणामी, महाराष्ट्रातील माता व बालकांच्या आरोग्यपूर्ण आणि सक्षम भविष्यास नवी दिशा मिळणार आहे.

## छोट्या चुका ठरतात मोठ्या नुकसानीचे कारण; शेअर बाजारावर नियंत्रण ठेवा : राहूल कलंत्री

**वर्धा/ जनमाध्यम**

माहेश्वरी नवयुवक मंडळ, वर्धा यांच्या वतीने आयोजित शेअर बाजार विषयक कार्यशाळेत गुंतवणूकदारांना मार्गदर्शन करताना राहूल कलंत्री यांनी शेअर बाजारातील चढ-उतार समजून घेत संयम राखण्याचा सल्ला दिला.



शेअर बाजार एक असा बाजार आहे, जिथे चावी मिळाली तरी ताळे बदलते, असे सांगत त्यांनी गुंतवणुकीतील अनिश्चिततेवर प्रकाश टाकला.

मेहता इक्विटीज लिमिटेड चे उपाध्यक्ष असलेल्या कलंत्री यांनी पॉवर पॉइंट सादरीकरणाद्वारे शेअर बाजाराची कार्यपद्धती, डिमांड-सप्लायचे तत्त्व आणि गुंतवणुकीतील जोखमींचे सोप्या भाषेत विश्लेषण केले. त्यांनी स्पष्ट केले की, बाजारातील नुकसान हे बाजारामुळे नसून गुंतवणूकदारांच्या छोट्या-छोट्या चुका कारणीभूत ठरतात. भगवान विष्णूंच्या शांत मुद्रेचा संदर्भ देत त्यांनी सांगितले की, प्रत्येक घडामोडीची जाणीव असूनही स्थिर राहणे हीच यशाची गुरुकिल्ली आहे. त्याचप्रमाणे शेअर बाजारातील अस्थिरतेतही गुंतवणूकदारांनी संयम गमावू नये, असे आवाहन त्यांनी केले. तंत्रज्ञानामुळे शेअर बाजार आता सर्वसामान्यांसाठी सहज उपलब्ध झाला असून, तो केवळ श्रीमंतांपुरता मर्यादित राहिलेला नाही, असेही त्यांनी नमूद केले. अपूर्ण ज्ञान टाळून तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमाला मंडळाचे अध्यक्ष ऋषभ जाजू, नंदकिशोर भूतडा यांची प्रमुख उपस्थिती होती. संचालन मोहित चांडक यांनी केले, तर आभार हेमंत भूतडा यांनी मानले. कार्यशाळेस व्यापारी, लेखापाल व नागरिकांची उत्स्फूर्त उपस्थिती लाभली.

## महिलांच्या आरोग्याचा जागर; आरोग्य महाशिबीर

**सेलू/ जनमाध्यम**

जागतिक महिला दिन व क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मृती दिनाचे औचित्य साधत सेलू शहरात महिलांसाठी मोफत आरोग्य महाशिबिराचे आयोजन करण्यात आले. उत्कर्ष जनकल्याण शिक्षण संस्था, वर्धा सोशल फोरम आणि कस्तुरबा रुग्णालय, सेवाग्राम यांच्या संयुक्त विद्यमाने दीपचंद विद्यालय येथे पार पडलेल्या या शिबिराला महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



या शिबिरात सुमारे ५०० हून अधिक महिलांनी विविध आरोग्य तपासण्यांचा लाभ घेतला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवीन चौधरी होते. प्रमुख पाहुणे म्हणून शैलेन्द्र दुप्तरी, चूडामण हांडे तसेच डॉ. अभ्युदय मेघे उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ. मेघे यांनी, महिला निरोगी असतील तरच समाज प्रगत होतो, असे सांगत महिलांच्या आरोग्याविषयी जागरूकता वाढविण्याची गरज अधोरेखित केली. मान्यवरांनी ग्रामीण भागात दर्जेदार आरोग्य सेवा पोहोचविण्यावर भर दिला. शिबिरात स्त्रीरोग, हृदयरोग, अस्थिरोग, नेत्ररोग व कर्करोग यांसारख्या आजारांची मोफत तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी महिलांना विविध आजारांबाबत मार्गदर्शन केले. 'आशा' सेविकांचा सन्मान सोहळाही यावेळी पार पडला. तसेच शासकीय योजनांबाबत माहिती देत ऑन-द-स्पॉट नोंदणी सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यामध्ये २०७ कार्डांची नोंदणी करण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजकांनी विशेष परिश्रम घेतले.

## विज्ञानवारीतून संशोधक वृत्तीचा पाया

**आर्वी/ जनमाध्यम**

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा आणि भविष्यात विज्ञान क्षेत्रात ठसा उमटविण्याची प्रेरणा मिळावी या उद्देशाने आर्वी तालुक्यातील २५ विद्यार्थ्यांची नागपूर येथे विज्ञानवारी आयोजित करण्यात आली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (डायट) यांच्या माध्यमातून प्राचार्य डॉ. मंगेश घोगरे यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात आला.

स्थानिक पंचायत समिती आर्वी अंतर्गत पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून जिल्ह्यातील विविध तालुक्यांतील सुमारे २०० विद्यार्थ्यांनी या अभ्यास दौऱ्यात सहभाग घेतला. आर्वी तालुक्यातील विविध शाळांमधील २५ विद्यार्थी २५ मार्च रोजी सकाळी नागपूरकडे रवाना झाले. विद्यार्थ्यांनी नागपूर येथील रमण सायन्स सेंटर व राज्य विज्ञान संस्थेला भेट देत विविध वैज्ञानिक दालनांचा अनुभव घेतला. विशेषतः तारांगणातील थ्रीडी शो आणि विविध प्रयोगांनी विद्यार्थ्यांना विज्ञानाची गोडी लावली. या अनुभवातून विद्यार्थ्यांमध्ये संशोधक वृत्ती विकसित होण्यास मदत होणार असल्याचे मत व्यक्त करण्यात आले. या दौऱ्यात शिक्षक उमेश फुलंबरकर, मारुती वेरुळकर, करुणा सराफ व भारती सानप यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. तसेच गटशिक्षणाधिकारी पंकज तायडे, विस्तार अधिकारी गीता मानमोडे व अजय इंगोले यांनी नियोजनात मोलाची भूमिका बजावली. या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना मोठ्या विज्ञान केंद्रांचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळाल्याने पालकांनी समाधान व्यक्त केले.

## सहकाऱ्यांच्या क्षमतेला दिशा देणारा खरा संघटक : डॉ. वेदप्रकाश मिश्रा

**नागपूर/ जनमाध्यम**

संघटन म्हणजे केवळ कामे करून घेण्याची यांत्रिक प्रक्रिया नसून ती माणसांच्या क्षमतेला योग्य दिशा देत सामूहिक यशाची नवी उंची गाठण्याची एक सर्जनशील कला आहे. सहकाऱ्यांच्या सामर्थ्याला ओळखून त्यातून अपेक्षेपेक्षा अधिक यश संपादन करणारा व्यक्तीच खरा संघटक ठरतो, असे भावपूर्ण प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. वेदप्रकाश मिश्रा यांनी केले.



विदर्भ गौरव प्रतिष्ठानतर्फे ज्येष्ठ पत्रकार स्व. प्रकाश देशपांडे स्मृती प्रित्यर्थ प्रदान करण्यात येणारा कुशल संघटक पुरस्कार यंदा सुधीर दिवे यांना बहाल करण्यात आला. शंकरनगर येथील धनवटे सभागृहात आयोजित समारंभात हा सन्मान सोहळा पार पडला. या प्रसंगी प्रकाश पोहरे, शरद पाटील, डॉ. गिरीश गांधी यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. गेली २१ वर्षे विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना सन्मानित करण्याची परंपरा असलेल्या या प्रतिष्ठानने यंदा २०२६ साठी दिवे यांची निवड केली. डॉ. मिश्रा यांनी आपल्या भाषणात संघटनकलेतील निष्ठा, चिकाटी आणि माणसांना जोडण्याची क्षमता यांचे महत्त्व अधोरेखित केले. तर शरद पाटील यांनी संघटन कौशल्याची परंपरा आणि कार्यपद्धतीवर प्रकाश टाकला. सत्काराला उत्तर देताना सुधीर दिवे यांनी स्व. प्रकाश देशपांडे यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या प्रेरणादायी कार्याचा उल्लेख केला. तसेच केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या मार्गदर्शनामुळे विविध क्षेत्रात काम करण्याची संधी मिळाल्याचे त्यांनी नमूद केले. विशेष म्हणजे, पुरस्काराची संपूर्ण रक्कम संत अच्युत महाराज हार्ट हॉस्पिटलला अर्पण करण्याची घोषणा करत त्यांनी सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडवले. हा पुरस्कार गडकरी, संत अच्युत महाराज आणि सहकाऱ्यांना समर्पित असल्याचेही त्यांनी नम्रपणे सांगितले. कार्यक्रमाचो सूत्रसंचालन शुभदा फडणवीस यांनी केले, तर बाळासाहेब कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले.

## दारूच्या नशेत बुलेटस्वार वाहतूक पोलिसांची कारवाई

**वर्धा/ जनमाध्यम**

दारूच्या नशेत बेफाम वेगाने बुलेट चालवणाऱ्या चालकावर वाहतूक शाखेने कारवाई करत गुन्हा दाखल करून वाहन जप्त केले. ही घटना २६ मार्च रोजी बजाज चौक येथे नाकाबंदी दरम्यान घडली.



पोलीस अधीक्षक सौरभकुमार अग्रवाल यांच्या आदेशानुसार शहरात विशेष तपासणी मोहीम सुरू आहे. तपासणीदरम्यान एक बुलेटस्वार अतिवेगाने व निष्काळजीपणे वाहन चालवताना आढळला. पोलिसांनी त्याला थांबवून विचारपूस केली असता त्याच्या तोंडातून दारूचा वास येत असल्याचे दिसून आले. त्यानंतर वैद्यकीय तपासणी केली असता आशिष बाबाराव सायरे (वय ३४, रा. जामणी, ता. सेलू) हा दारूच्या नशेत असल्याचे स्पष्ट झाले. यावरून मोटार वाहन कायद्या अंतर्गत गुन्हा नोंदवून बुलेट जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलीस निरीक्षक विलास पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पथकाने केली. वाहन चालकांनी दारू पिऊन वाहन चालवू नये, असे आवाहन करण्यात आले आहे.

## श्रीराम नवमी निमित्त शोभायात्रा


**हिंगणघाट/ जनमाध्यम**

श्रीराम नवमी निमित्त शहरात सायंकाळी निघालेल्या भव्य शोभायात्रेने संपूर्ण वातावरण भक्तिमय केले. शहराच्या मध्यवर्ती श्रीराम मंदिरातून सायंकाळी सहा वाजता शोभायात्रेला सुरुवात झाली. ढोल-ताशांचा गजर, जय श्रीरामच्या घोषणांनी शहरातील प्रमुख मार्ग दुमदुमून गेले.

या शोभायात्रेत आमदार समीर कुणावार, बाजार समितीचे सभापती ॲड. सुधीर कोठारी, माजी आ. प्रा. राजु तिमांडे, भाजपचे माजी जिल्हा महामंत्री किशोर दिघे, माजी नगराध्यक्ष प्रेमबाबू बसंत, नगराध्यक्षा डॉ. नयना तुळसकर, उपाध्यक्ष निलेश ठोंबरे यांच्यासह अनेक पदाधिकारी व नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. उत्सव समितीच्या वतीने सादर करण्यात आलेले विविध आकर्षक देखावे हे शोभायात्रेचे मुख्य आकर्षण ठरले. कारंजा चौक, मोहता चौक आणि सुभाष चौक येथे विविध सामाजिक मंडळांनी भाविकांसाठी महाप्रसाद व थंड पेयांची व्यवस्था केली होती. विठोबा चौक मित्र परिवारातर्फे शोभायात्रेत सहभागी मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ व सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. यंदा शहरात प्रथमच एवढ्या मोठ्या प्रमाणावर रामभक्तांची उपस्थिती दिसून आली. मोहता चौक येथे आमदार समीर कुणावार, ॲड. सुधीर कोठारी, डॉ. निर्मेश कोठारी यांनी स्वतः प्रसाद वाटप करत भाविकांशी संवाद साधला. एकूणच, उत्साह, भक्ती आणि एकात्मतेचा संगम अनुभवायला देणारी ही शोभायात्रा हिंगणघाटकरांसाठी संस्मरणीय ठरली.

## नवरगाव (पून.) ग्रामपंचायत 'टीबीमुक्त'

**सेलू/ जनमाध्यम**




तालुक्यात राबविण्यात आलेल्या क्षयरोग नियंत्रण अभियानाला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून नवरगाव (पुनर्वसन) ग्रामपंचायत 'टीबीमुक्त' म्हणून घोषित करण्यात आली आहे. पंचायत समिती सभागृहात आयोजित गुणगौरव सोहळ्यात या ग्रामपंचायतीचा सन्मान करण्यात आला. तालुका आरोग्य विभागाच्या वतीने पार पडलेल्या या कार्यक्रमात गटविकास अधिकारी देवानंद पाणबुडे यांच्या हस्ते ग्रामपंचायत नवरगावचा गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक गटविकास अधिकारी चोपडे, वैद्यकीय अधीक्षक डॉ. खेडेकर, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. वरठी तसेच विस्तार अधिकारी चलाख उपस्थित होते. ग्रामपंचायतीच्या वतीने स्वप्निल पांडुरंग मुजबैले, वैद्यकीय अधिकारी डॉ. आचल ठाकरे, डॉ. श्रद्धा ढगे, आरोग्य सेविका निशिगंधा घोडखांदे व आरोग्य सेवक अमोल ढगे यांचा सत्कार करण्यात आला.

## आई-मुलीची जागतिक झेप
# 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये मानाचा तुरा

**हिंगणघाट/ जनमाध्यम**

कलेच्या सुरेल पंखांवर स्वार होत स्थानिक आई-मुलीच्या जोडीने थेट आंतरराष्ट्रीय व्यासपीठ गाठत 'एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्स'मध्ये नोंद करून मानाचा तुरा रोवला आहे. 'इंडिया बुक ऑफ रेकॉर्ड'नंतर आता जागतिक पातळीवर मिळवलेले हे यश हिंगणघाटच्या सांस्कृतिक क्षितिजावर अभिमानाची सुवर्णरेष उमटवणारे ठरले आहे.



